CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ६ नोव्हेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३६५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





# खासदार बाईंनी केसाने गळा कापला; २५ लाखांची ऑफर दिल्याचा आरोप

## ● आडम मास्तरांचा गौप्यस्फोट ● बिनबुडाचे आरोप करणे चुकीचे; खा. प्रणिती शिंदे यांचे प्रत्युत्तर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघावरून आता चांगलेच घामासान सुरू झाले आहे. एकेकाळी महाविकास आघाडीमध्ये घटक पक्ष असणारे माकपाने काँग्रेसवर आता आग पाखड सुरू केली आहे. लोकसभेमध्ये तुम्ही आमचे काम करा, विधानसभेला आम्ही तुम्हाला जागा देऊ, असे आश्वासन देऊन सुद्धा काँग्रेसने विशेषतः खासदार प्रणिती शिंदे यांनी केसाने आमचा गळा कापला, माकपाचा विश्वासघात केला असा घाणाघात आरोप त्यांनी केला आहे.



यावेळी मास्तर म्हणाले की, पहाटे काँग्रेसचे माणसे येऊन पंचवीस लाखांची ऑफर देतात, पैसे घ्या आणि आमचे काम करा असे सांगतात, असा बॉम्बस्फोट आडम मास्तर यांनी पत्रकार परिषदेत केला. दरम्यान रे नगर वसाहत बनवताना देखील काँग्रेसने सबसिडी कापण्याचे काम केले. १५०० कोटी सबसिडी मिळणार होती, परंतु काँग्रेसमुळे ९०० कोटींची सबसिडी कमी झाली. गरिबांच्या तोंडाचा घास काढला. इतके पातक काँग्रेसने केले आहे. दुसरा आरोप करताना आडम मास्तर यांनी सांगितले की, ४८८ गाळे यांचा विषय अद्यापही प्रलंबित आहे. गळ्याचे कामकाज अद्याप रखडले असून त्यामुळे नागरिक खोक्यात राहत आहेत.


त्याचप्रमाणे तिसरा आरोप करताना मास्तर म्हणाले, कामगार पेन्शनसाठी किमान वेतनासाठी तडफडू लागले आहेत. त्यांचा विषय मार्गी लावला जात नाही. प्रणिती शिंदे यांनी जिनी गिरणी येथे गाळे पाडण्याचा पराक्रम केला परंतु अकरा वर्षे झाले कुदळ मारून त्या ठिकाणी गाळे बांधलेले नाहीत. आडम मास्तर यांना तिकीट दिले तर शहराचा ताबा आपल्या हातून जाईल, अशी भीती शिंदे कुटुंबीयांना वाटते. विशेष करून खासदार



बाईंनी आमचा विश्वासघात केला, असे आरोप करत आमची अडचण त्यांना वाटत असेल त्यामुळे त्यांनी गेम केला आहे. असेही ते यावेळी म्हणाले. या पत्रकार परिषदेस बशीर शेख, एम.एच. शेख, अशोक इंदापुरे, कंदीकटला, युसुफ मेजर शेख, अनिल वासम आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

> **बिनबुडाचे आरोप करून आडम मास्तर यांना काय साध्य करायचे आहे?**
> मी त्यांचा नेहमीचा आदर करते, यापुढे नेहीमच करत राहीन. पण आता या घडीला असे बिनबुडाचे आरोप करून त्यांना काय साध्य करायचे आहे. हेच कळत नाही.
> **- प्रणिती शिंदे, खासदार प्रणिती शिंदे**

> **याबाबत मला काही माहिती नाही**
> आडम मास्तरांनी केलेले आरोप चुकीचे आहेत. याबाबत मला काहीही माहिती नाही. ज्यांनी ऑफर घेऊन आले. त्यांनाच खरे खोटे विचारा.
> **- चेतन नरोटे, उमेदवार शहर मध्य मतदारसंघ**




# यापुढे राज्यसभा लढवणार नाही

## ● शरद पवारांनी दिले निवृत्तीचे संकेत

**तभा वृत्तसेवा, पुणे, ५ नोव्हेंबर**

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मंगळवारी संसदीय राजकारणातून सेवानिवृत्तीचे संकेत दिले. सध्याचा कार्यकाळ संपल्यानंतर राज्यसभेची आणखी टर्म घ्यायची अथवा नाही, याचा विचार करावा लागेल, असे शरद पवार यांनी सांगितले.



नव्या नेतृत्वाचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी कुठेतरी थांबावे लागणार आहे, असे शरद पवार यांनी नातू युगेंद्र पवार यांच्या बारामतीतील सुपा येथे प्रचारसभेला संबोधित करताना सांगितले.

माझ्या राजकीय कारकीर्दीत मी १४ निवडणुका जिंकलो आहे, असे या ज्येष्ठ नेत्याने नमूद केले. तुमच्या पाठिंब्याने मी पहिल्यांदा विधानसभेत पोहोचलो. पहिले मी राज्यमंत्री व नंतर कॅबिनेट मंत्री झालो. चार वेळा मुख्यमंत्री झालो. केंद्रात संरक्षण मंत्री म्हणूनही काम केले. त्यानंतर दहा वर्षे कृषिमंत्री म्हणून काम केले. मी आज राज्यसभेत आहे, असे शरद पवार म्हणाले.

नव्या नेतृत्वाकडे जबाबदारीसोपवण्यासाठी काही वर्षांपूर्वी त्यांनी लोकसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता. स्थानिक राजकारणात गुंतायचे नाही, असे मी ठरवले होते आणि सर्व जबाबदारी अजितदादाला दिली होती. मागील २५ ते ३० वर्षांपासून त्याच्याकडे सर्व जबाबदारी होती. पहिली ३० वर्षे मी तिथे होतो. नंतर अजितदादा तिथे २५ ते ३० वर्षांपासून आहेत आणि आता नवीन नेत्यासाठी व्यवस्था करण्याची गरज येऊन ठेपली आहे. आपल्या कर्तृत्वाची नोंद करताना शरद पवार म्हणाले की, माझी सत्ता असताना काही विकास झाला. मी कित्येक गोष्टी केल्या. मी शेतकऱ्यांची ७० हजार कोटी रुपयांची कर्जे माफ केली. संरक्षण मंत्री म्हणून काम करताना महिलांना सशस्त्र दलात काम करण्याची संधी दिली. मी मुख्यमंत्री असताना महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के प्रतिनिधित्व दिले.

> **नव्या नेत्यासाठी व्यवस्था करायला हवी**
> अजित पवार यांनी बाराम तीसाठी बरेच काही केले. पण आता नवीन नेतृत्व समोर यायला हवे, जे पुढील तीस वर्षे सक्षमपणे काम करू शकेल. यासाठी आपल्याला असा नेता शोधायलाच हवा, असे शरद पवार म्हणाले.

# प्रत्येक खाजगी मालमत्ता सामूहिक संपत्तीचा भाग नाही

## सुप्रीम कोर्टाचा निर्णय

**नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर,**

सरकारला सामान्य हिताकरिता वितरणासाठी खाजगी मालकीची संसाधने ताब्यात घेण्याचा घटनात्मक अधिकार नाही, असा महत्त्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने सोमवारी ७ :२ अशा बहुमताने दिला.

काही प्रकरणांत सरकार खाजगी मालमत्तेवर दावा करू शकते, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेतील नऊ सदस्यीय घटनापीठाने म्हटले. निकालाचा बहुतांश भाग धनंजय चंद्रचूड यांनी वाचून दाखवला. घटनेतील कलम ३९(बी) अन्वये सरकार खाजगी मालमत्ता अधिग्रहित करू शकते, हा न्या. कृष्णा अय्यर यांनी पूर्वी दिलेला निर्णय घटनापीठाने रद्द केला. सरन्यायाधीशांनी स्वतःचा तसेच घटनापीठातील इतर सहा न्यायमूर्तींचा निर्णय लिहिला. यात वादग्रस्त कायदेशीर प्रश्नावर निर्णय देण्यात आला की, खाजगी मालमत्ता ही समाजाच्या भौतिक संसाधनाचा भाग असू शकते. परंतु, एखाद्या व्यक्तीच्या मालकीची प्रत्येक मालमत्ता समाजाच्या भौतिक संसाधनांचा भाग बनली पाहिजे, असे नाही.


सोशलिस्ट विचारातून आलेले काही निर्णय न्यायालयाने रद्दबातल केले आणि सरकार सार्वजनिक हितासाठी खाजगी मालमत्ता ताब्यात घेऊ शकते, असा निर्णय दिला. सरन्यायाधीशांनी लिहिलेल्या निर्णयाला न्या. बी. व्ही. नागरत्ना यांनी अंशतः असहमती दर्शवली, तर न्या. सुधांशू धुलिया यांनी सर्वच मुद्यांवर असहमती दर्शवली.

# ट्रम्प-हॅरिसमध्ये काट्याची टक्कर

**वॉशिंग्टन, ५ नोव्हेंबर**

राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी अमेरिकेत मंगळवारी मतदान सुरू झाले. डोनाल्ड ट्रम्प आणि कमला हॅरिस यांच्यात काट्याची टक्कर असल्याचे सर्वेक्षणात दिसून आले. मात्र, निकालासाठी विलंब होऊ शकतो. २०२० मध्ये निवडणुकीचा निकाल चार दिवस उशिरा लागला होता.

भारतीय वेळेनुसार अमेरिकेत सायंकाळी साडेचारच्या सुमारास मतदान सुरू झाले. सोबतच तिथे मतमोजणीलाही सुरुवात झाली. राज्यांनुसार मतदान सुरू होण्याची वेग वेगवेगळी ठेवण्यात आली आहे. न्यू यॉर्क टाईम्सने केलेल्या सर्वेक्षणानुसार, कमला हॅरिस यांना



ट्रम्प यांच्यापेक्षा १ टक्का जास्त मते मिळण्याचा अंदाज आहे. कमला हॅरिस यांना ४९, तर ट्रम्प यांना ४८ टक्के मते मिळतील, असे दिसत आहे. सुरुवातीला प्रचारात ट्रम्प यांनी आघाडी घेतली होती. नंतर हॅरिस यांनी आघाडी घेतली. पेनसिल्व्हेनिया हे 'स्विंग स्टेट' म्हणून प्रसिद्ध आहे. १२ पैकी १० निवडणुकींत या राज्यातील लोकांनी ज्या उमेदवाराला भरभरून मते दिली, तोच राष्ट्राध्यक्ष झाला. त्यामुळे या राज्यातील मतदानावर दोन्ही उमेदवारांची नजर राहणार आहे. कॅनडाच्या सीमेला लागून असलेल्या न्यू हॅम्पशायरमध्ये मतदानाला सुरुवात झाली, तर न्यू हॅम्पशायरच्या डिक्सविले नॉचमध्ये मतमोजणी सुरू झाली आहे. डिक्सविले नॉचमध्ये बायडेन यांना सर्व मते मिळाली होती. परंतु आता हा आकडा निम्म्यावर आला आहे.

अमेरिकेतील बहुतांश राज्यांत सकाळी सात वाजता मतदान सुरू झाले. काही राज्यांमध्ये ५ वाजेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू झाले. न्यू हॅम्पशायर, टेनेसी आणि वॉशिंग्टनसारख्या काउंटीतील नगरपालिकांच्या आधारे मतदानाची वेळ वेगळी ठेवण्यात आली आहे.

# यूपीएससीची मुख्य परीक्षा डिसेंबरमध्ये

**नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर**

केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात् यूपीएससीच्या नागरी मुख्य परीक्षेचे वेळापत्रक जारी करण्यात आले. ही परीक्षा १८ ते २३ डिसेंबर या कालावधीत होणार आहे.

यूपीएससीच्या तीन टप्प्यांत होणाऱ्या या परीक्षेच्या माध्यमातून भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय विदेश सेवा आणि भारतीय पोलिस सेवेच्या अधिकाऱ्यांची निवड केली जाते. यंदा नागरी सेवेची मुख्य परीक्षा १८ ते २३ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. यावर्षी सुरुवातीच्या परीक्षेत १५,००८ विद्यार्थी यशस्वी ठरले, त्याचा निकाल १२ ऑक्टोबर रोजी आला होता. महत्त्वाचे म्हणजे, यूपीएससी परीक्षेसाठी ९,४५,९०८ उमेदवारांनी अर्ज सादर केले होते. त्यापैकी ४.६३ लाख उमेदवार २३ ऑगस्टला झालेल्या परीक्षेला बसले.

# उत्तरप्रदेश मदरसा कायद्याची घटनात्मक वैधता कायम

## सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी उत्तरप्रदेश मदरसा कायद्याची (उत्तरप्रदेश बोर्ड ऑफ मदरसा एज्युकेशन ऍक्ट २००४ ) घटनात्मक वैधता कायम राहणार असल्याचे स्पष्ट केले.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने २२ मार्च रोजी उत्तरप्रदेश मदरसा कायदा रद्द करण्याचा निकाल दिला होता. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाच्या निकालानंतर उत्तरप्रदेशमध्ये मदरसे चालूच राहणार असून, त्यांना राज्य शैक्षणिक दर्जा देणार असल्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले आहे. यापूर्वी २२ ऑक्टोबर रोजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील न्यायासनाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी घेत निर्णय राखून ठेवला होता. उच्च न्यायालयाने २२ मार्च रोजी दिलेल्या निर्णयात उत्तरप्रदेश मदरसा कायदा



राज्यघटनेच्या विरोधात आणि धर्मनिरपेक्षता तत्त्वाच्या विरोधात असल्याचे म्हटले होते. उच्च न्यायालयाने उत्तरप्रदेश सरकारला मदरशांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमित शाळेत दाखल करण्याचा निर्देश दिला होता. मदरशांमध्ये शिकत असलेल्या १७ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील न्यायासनाने ५ एप्रिल रोजी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली होती.

# २५ नोव्हेंबरपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन

**नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर**

संसदेचे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून सुरू होऊन ते २० डिसेंबरला संपेल.

संविधानाचा स्वीकार केल्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त २६ नोव्हेंबर रोजी संविधान सदनच्या सेंट्रल हॉलमध्ये एक विशेष सोहळा संविधान दिन म्हणून साजरा केला जाईल, असे रिजिजू म्हणाले. भारत सरकारच्या शिफारसीनुसार राष्ट्रपतींनी २५ नोव्हेंबर ते २० डिसेंबर हिवाळी अधिवेशनासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांना बोलवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे, असे रिजिजू म्हणाले.

# सामूहिक बलात्कारप्रकरणी ११ रिक्षाचालकांना शिक्षा

## ● ८ आरोपींना दुहेरी जन्मठेप तर तिघांना २० वर्षे सश्रम कारावास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीवर सामूहिक अत्याचार केल्याप्रकरणी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्र यांनी रिक्षाचालक असलेल्या ११ आरोपींना जन्मठेप व दंडाची शिक्षा सुनावली.



ॲड. प्रदीपसिंह राजपूत

सचिन श्रीकांत राठोड (वय २४), प्रविण श्रीकांत राठोड (वय २२), आनंद उर्फ राजवीर राम राठोड (वय २७), गणेश उर्फ अक्षय विष्णू चव्हाण (वय २२), रोहित शाम राठोड (वय २५), सतीश अशोक जाधव (वय ३०), चेतन राम राठोड (वय २४), दिनेश परशू राठोड उर्फ टिकटॉक किंग (वय १९, सर्व रा. प्रताप नगर तांडा, विजापूर रोड, सोलापूर), राज उर्फ राजकुमार सिद्राम देसाई (वय २३, रा. एस टी कॉलनी, आरटीओ ऑफीस जवळ, विजापूर रोड, सोलापूर), करण विजयकांत भरले (वय १९, रा. वडार गल्ली, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर), गौरव विलास भोसले (वय ३०, रा. निराळे वस्ती, मातंग समाज मंदीराजवळ, सोलापूर) अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहेत. याबाबत पिडीतेने दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.




याप्रकरणातील पिडीता ही सन २०१९ मध्ये विजापूर रोडवरील एका महाविद्यालयात शिक्षण घेत होती. ती महाविद्यालयात ये-जा करण्यासाठी शेअर-ए-रिक्षाचा वापर करीत होती. त्यामुळे पिडीतेची आणि शेअर-ए-रिक्षा चा व्यवसाय करणाऱ्या रिक्षाचालकांची ओळख होती. या ओळखीतून वरील सर्व आरोपी रिक्षाचालकांनी वेगवेगळ्या लॉजवर तसेच ठिकाणी पिडीतेला नेऊन तिच्यावर सामूहिक अत्याचार केला. (उर्वरित वृत्त पान २ वर)

### खटल्यातील ठळक घडामोडी

- घटना घडताना पिडीता ही अल्पवयीन.
- सर्व आरोपी हे रिक्षाचालक असून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सोरेगाव या मार्गावर शेअर-ए-रिक्षा प्रमाणे वाहतूक करणारे.
- घटना सप्टेंबर २०१९ ते फेब्रुवारी २०२० या सहा महिन्याच्या कालावधीतील.
- गुन्हा हा ७ वेगवेगळ्या घटनास्थळावर घडलेला.
- गँगरेप विथ ॲट्रॉसिटीप्रमाणे गुन्हा दाखल.
- गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहायक पोलिस आयुक्त डॉ. प्रिती टिपरे यांनी केला.
- ७ एप्रिल २०२० ला पोलिसांकडून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल.
- पोलिसांकडून ८ वेगवेगळे दोषारोपपत्र दाखल.
- खटल्यात ३८ साक्षीदार तपासले.
- पहिला साक्षीदारत १६ ऑक्टोबर २०२१ ला सरकारपक्षाने तपासला.
- २९ नोव्हेंबर २०२३ ला सरकारी पक्षाचा पुरावा संपला.
- पुन्हा २१ ऑगस्ट २०२४ ला साक्षीदार बोलावून तपासला.
- गुन्ह्यात सर्व आरोपींची ओळख परेड घेण्यात आली.
- एका आरोपीस पकडताना तो पळून जाताना जिन्यावरून पडून त्याचा पाय फ्रॅक्चर झाल्याने त्याची ओळख परेड सिव्हील हॉस्पीटलमध्ये घेतली.
- गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपींना अटक केल्यानंतर सर्व आरोपी हे निकाल लागेपर्यंत जेलमध्येच होते.
- पिडीतेच्या साक्षीवेळी घटना तिला जसजशी आठवत होती, तसतशी ती रडत होती. त्यामुळे न्यायालयीन कामकाज थांबवले जायचे.
- अगोदर निकाल हा दिवाळीच्या सुट्ट्यांपूर्वी लागणार होता. परंतु, सुट्ट्यांनंतर न्यायालयीन कामकाज सुरु होताच न्यायालयाने निकाल दिला.
- निकालावेळी आरोपींच्या नातेवाईकांची न्यायालयात गर्दी.
- न्यायालयात पोलिसांचा चोख बंदोबस्त.
- निकाल देण्यासाठी रात्रीचे आठ वाजले. तरीही न्यायालयात गर्दी होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

पान १ वरुन...

### सामूहिक बलात्कारप्रकरणी ११ रिक्षाचालकांना शिक्षा

म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात सामूहिक बलात्कार व जातीवाचक शिवीगाळ प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर या गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहायक पोलिस आयुक्त डॉ. प्रिती टिपरे यांनी केला. पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास दोन महिन्यात करून न्यायालयात दोषारोपपपत्र पाठवून दिले. सरकारच्यावतीने या खटल्यात ३८ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये प्रत्यक्षदर्शी पिडीता, तिची आई, वैद्यकीय अधिकारी, पिडीतेची मानसिक स्थिती तपासणारे मानसोपचार तज्ज्ञ, मोबाईलचे टॉवर लोकेशन दाखविणारे सायबर तज्ज्ञ पोलिस अधिकारी, सायबर सेलचे अधिकारी यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या.

साक्षी, पुरावा व सरकारी वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीश केंद्रे यांनी सर्व आरोपींना दोषी ठरवून शिक्षा सुनावली. सचिन राठोड, राजकुमार देसाई आणि गौरव भोसले या तिघांना २० वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. तर प्रविण राठोड, आनंद राठोड, गणेश चव्हाण, रोहित राठोड, दिनेश राठोड, चेतन राठोड, करण भरले, सतीश जाधव या आरोपींना दुहेरी जन्मठेप व प्रत्येकी १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. याप्रकरणात सरकारच्यावतीने जिल्हा सरकारी वकिल ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. नागराज शिंदे, ॲड. ईस्माईल शेख, ॲड. सुरेश चव्हाण, ॲड. फिरोज शेख, ॲड. एस एम झुरळे यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलिस हवालदार विक्रांत कोकणे, महिला पोलिस हवालदार सुनंदा घाडगे यांनी काम पाहिले.

# कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांच्या आरोग्य सुविधेसह स्वच्छतेला प्राधान्य द्यावे

## विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून लाखो वारकरी भाविक येतात. दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी कार्तिकी एकादशी असून यात्रेचा कालावधी दि. ०२ ते १५ नोव्हेंबर २०२४ असून, वारी कालावधीत येणाऱ्या वारकरी भाविकांच्या आरोग्य सुविधेसह स्वच्छतेला प्राधान्य देवून आवश्यक उपाययोजना तात्काळ कराव्यात अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या.

कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक




प्रितमकुमार यावल, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले,प्रांताधिकारी सचिन इथापे, व्हीसीव्दारे मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्यधिकारी प्रशांत जाधव, सां.बा. विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निंबकर यांच्यासह संबधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

कार्तिकी यात्रा सोहळा यशस्वी व निविघ्नपणे पार पाडण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. नगरपालिकेने यात्रा कालावधीत स्वच्छतेसाठी जादा स्वच्छता कर्मचारी यांची उपलब्धता, टॉयलेट स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची मुबलक व्यवस्था आदी कामे तात्काळ करावीत. पोलीस प्रशासनाने भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे तसेच मंदीर समितीनेही जादा सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी. मंदीर समिती पत्राशेड, दर्शन रांग तसेच दर्शन रांगेमध्ये उभारलेल्या तात्पुरत्या उड्डाणपुलाचे स्ट्रक्चर ऑडीट, फायर ऑडीट व इलेक्ट्रीक ऑडीट करुन घ्यावे. आषाढी यात्रा कालावधीत भाविकांना ज्याप्रमाणे आवश्यक सुविधा उपलब्ध केल्या होत्या त्याप्रमाणेच कार्तिकी यात्रा कालावधीतही सुविधा उपलब्ध करुन कार्तिकी यात्रा सोहळा पार पाडावा अशा सूचनाही विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, नगरपालिकेने शहरातील खड्डे तात्काळ बुजवावेत चंद्रभागा वाळवंटात अतिक्रमणे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. आवश्यक ठिकाणी बॅरकेंटींग करावे. तसेच अन्न व औषध प्रशासनाने खाद्यपदार्थांची तसेच प्रसादलयाच्या दुकानांची तपासणी करण्यासाठी जादा पथकाची नेमणूक करावी. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी कार्तिकी यात्रा कालावधीत प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती दिली. तर मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांना जलद व सुखकर दर्शन व्हावे यासाठी मंदिर समितीकडून योग्य नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले तसेच नगरपालिका प्रशासनाकडून भाविकांच्या स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता. स्वच्छतेसाठी जादा हंगामी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक, नदी पात्रातील स्वच्छता, तात्पुरते शौचालय व्यवस्था, ६५ एकर येथे आवश्यक सर्व सुविधा भाविकांना उपलब्ध करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी प्रशात जाधव यांनी सांगितले.



## मतदान वाढविण्याच्या प्रक्रियेत सर्व विभागांचा सहभाग आवश्यक

### मुख्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ नोव्हेंबर -**

२० नोव्हेंबरला होणाऱ्या मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्व विभागांनी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या जनजागृतीच्या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी केले.

चोक्कलिंगम यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची मंगळवारी बैठक झाली. अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी पी. प्रदीप, माहिती व जनसंपर्क प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, सामाजिक न्याय विभागाचे सचिव विजय वाघमारे, सह धर्मादाय आयुक्त महेश लंबे, उद्योग विभागाचे सह सचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, महिला व बालविकास विभागाचे उपसचिव आनंद भोंडवे, ऊर्जा विभागाचे अवर सचिव नितीन सुर्वे, सह मुख्य निवडणूक अधिकारी के. सूर्यकृष्णमूर्ती, उपमुख्य निवडणूक अधिकारी शरद दळवी उपस्थित होते.

मतदारजागृतीसाठी येत्या आठ तारखेपासून मतदानाच्या दिवसापर्यंत विशेष मोहीम राबविली जाणार आहे. यामध्ये सर्व विभागांनी सहभागी व्हावे, अशी सूचना .चोक्कलिंगम यांनी केली. राज्यातील कामगारांची मोठी संख्या लक्षात घेता उद्योग विभागाने मतदानासाठी एक दिवसाची सुटी जाहीर केली आहे, तथापि जेथे शक्य नसेल तेथे दोन तासांऐवजी किमान अर्धा दिवस सुटी देण्याचे निर्देश संबंधित आस्थापनांना द्यावेत, मोठ्या उद्योजकांना मतदार जागृतीबाबत आवाहन करण्यास प्रवृत्त करावे, महिला व बालविकास तसेच ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील बचत गटांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यात यावे त्याचप्रमाणे अंगणवाडी सेविका, गावपातळीवरील तलाठी आदींच्या माध्यमातून घराघरात मतदानाचा संदेश पोहोचविण्यात यावा, सामाजिक न्याय तसेच शिक्षण विभागाच्या अधिनस्त संस्थांमधील १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांना तसेच त्याखालील वयाच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात यावे, धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत संस्थांना देखील त्यांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागृती करण्याच्या सूचना देण्यात याव्यात, अशा सूचना चोक्कलिंगम यांनी यावेळी केल्या. गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्र स्थापित करण्यात येत असून मतदान वाढीसाठी याचा चांगला परिणाम दिसून येत असल्याचे सांगून मुंबई शहरातील मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी सर्वांनी विशेष प्रयत्न करावेत आणि येथील मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांचा सांगोल्यात शेकापला पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.५ नोव्हेंबर-**



स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांनी सांगोला तालुक्यात शेकापला जाहीर पाठींबा देत डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या शिट्टी या चिन्हावर मतदान करुन निवडून द्यावे, असे आवाहन केले. यावेळी राजू शेट्टी यांनी पाठिंबा दिल्याबद्दल शेकापचे डॉ.अनिकेत देशमुख यांनी त्यांचे आभार मानत आपल्या विश्वासास पात्र राहून यापुढील काळात काम करु असे आश्वासन दिले.यावेळी बोलताना राजू शेट्टी म्हणाले, सांगोला विधानसभा हा स्व.भाई. गणपतराव देशमुख यांचा हक्काचा मतदार संघ आहे. महाराष्ट्रामध्ये विक्रमी वेळा या मतदार संघातून आबासाहेब निवडून आलेले होते.

## समरसता साहित्य परिषदेतर्फे अहिल्यादेवी होळकर लेखन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

समरसता साहित्य परिषद महाराष्ट्रच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय खुल्या लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समरसता साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रा. माधव कुलकर्णी, महिला आयाम प्रमुख वसुंधरा शर्मा-कुलकर्णी यांनी दिली.



अहिल्यादेवी : न्यायप्रिय आदर्श प्रशासक व समाज सुधारक, अहिल्यादेवींचे धर्मकार्य व राष्ट्रीय दृष्टिकोन, अहिल्यादेवी होळकर भारतीय स्त्री चिंतनाच्या आदर्श, अहिल्यादेवींचे जीवन कार्य, आजच्या युगातील प्रासंगिकता, अहिल्यादेवी व पारंपरिक स्थापत्य आणि कलाविकास असे विषय या स्पर्धेसाठी आहेत.

या राज्यस्तरीय लेखन स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक दहा हजार एक रुपये, द्वितीय पारितोषिक सात हजार एक रुपये, तृतीय पारितोषिक पाच हजार एक रुपये, उत्तेजनार्थ तीन हजार एक रुपये तसेच जिल्हास्तरावर विशेष बक्षिसे आहेत.

या लेखासाठी ८०० ते १००० शब्दांची मर्यादा आहे. कोणत्याही एका विषयावर लेख पूर्ण टाइप करून किंवा सुंदर हस्ताक्षरात लिहावा. त्यावर स्पर्धकाचे नाव, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी आणि जिल्हा लिहून samarasatamahgmail.com या ई-मेलवर १० जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ५ पर्यंत पाठवावा. ई-मेल वर लेख पाठवताना विषयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी खुली लेखन स्पर्धा असा उल्लेख करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## माहीममधील पाठिंबाबाबत आशिष शेलारांचा युटर्न

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.५ ऑक्टोबर-**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहीम विधानसभा मतदारसंघातून उघड पाठिंबा देणाऱ्या मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी आता मात्र यू टर्न घेतला आहे. या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार सदा सरवणकर असून त्यांचा आम्ही प्रचार करणार असल्याचे स्पष्ट केले.

लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्यामुळे त्यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहीम मधून महायुतीने पाठिंबा द्यावा अशी भूमिका भाजपाने घेतली होती. मात्र सरवणकर यांनी उमेदवारी अर्ज मागे न घेतल्याने या ठिकाणी तिरंगी लढत अटळ आहे. ठाकरे यांना उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार महेश सावंत यांच्या बरोबरच सरवणकर यांच्याबरोबरही सामना करावा लागणार आहे.

त्यामुळे राज ठाकरे यांच्याशी वैयक्तिक संबंध असलेल्या आशिष शेलार यांनीही घुमजाव केले आहे. त्यांनी म्हटले की, महायुतीच्यादृष्टीने माहीमचा विषय संपला आहे. महायुतीचे उमेदवार आता सरवणकरच आहेत आणि महायुतीचा उमेदवार तोच आमचा उमेदवार, अशी भूमिका आशिष शेलार यांनी घेतली. मात्र, महायुतीमधील तिन्ही पक्षाच्या नेत्यांनी माहीमबाबत चर्चा करुन वेगळा निर्णय घेतला तर गोष्ट वेगळी, असेही शेलार यांनी म्हटले आहे.

वांद्रे पश्चिम येथे शेलार हे स्वतः उमेदवार आहेत त्यामुळे शिंदे गटाशी पंगा घेतल्याने त्यांना अडचण निर्माण होऊ शकते त्यामुळे त्यांनी आता महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी राहण्याची भूमिका घेतली असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

## सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये मतदार जनजागृती मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे सेमिनार हॉलमध्ये एक मतदाता जागरूकता मोहिम आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना मतदानाचे आणि निवडणूक प्रक्रियेचे महत्त्व समजावून देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.



सहभागी संवादात्मक सत्रे आणि चर्चा करण्यात गुंतले, ज्यामध्ये माहितीपूर्ण मतदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. हा उपक्रम नागरिकांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि युवकांना लोकशाहीत सक्रियपणे सहभागी होण्यासाठी सक्षम करण्याच्या व्यापक प्रयत्नाचा भाग आहे. विद्यार्थ्यांनी मतदान करण्याची शपथ घेतली.

उपशिक्षणअधिकारी (प्राथमिक) रुपाली भावसार तथा नोडेल ऑफिसर हिबारे मॅडम, झोनल ऑफिसर यांच्या मार्गदर्शनाखाली व निवडणूक पर्यवेक्षक सुग्रीव गायकवाड, अनुप मुकटे, सुयोग उठगीकर, संतोष गायकवाड याच्या उपस्थितीत सिंहगड कॉलेज या ठिकाणी विद्यार्थी व मतदारांना प्रतिज्ञा देऊन मतदान करण्याविषयी जनजागृती करण्यात आली. प्राचार्य डॉ. एस. डी. नवले, प्रमुख प्रा. के. एस. पाटील आणि प्रमुख प्रा. एम. टी. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

## सोमनाथ वैद्य यांचा प्रचार शुभारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ५ नोव्हेंबर-**

अपक्ष उमेदवार सोमनाथ वैद्य यांनी ग्रामदैवत सिद्धेश्वर, काळजापूर मारुती, हिरजचे तुळजाभवानी, बेलाटीचे बाळूमामा, पीर साहेब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अभिवादन करून निवडणूक प्रचाराचा नारळ फोडून शुभारंभ केला.

यावेळी देवस्थान अध्यक्ष श्रीराम पाटील, सुनील काटकर, सरपंच प्रशांत साबळे, पिंटू राजमाने, प्रथमेश पाटील, किरण बसवंती,संजय नकाते रविराज पाटील, दत्ता पवार, सद्दाम नाईकवाडी, मेहबूब काझी, नागनाथ कांबळे, पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

## पैसे नाहीत म्हणताच तरुणाने खाल्या झोपेच्या गोळ्या

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

पैशाची मागणी केल्यानंतर पैसे नसल्याचे सांगताच तरुणाने झोपेच्या ३० गोळ्या खालल्या. हा प्रकार विजापूर रस्त्यावरील झोपडपट्टीत सोमवारी रात्री आठच्या सुमारास घडला.महिबूब ईस्माईल शेख (वय २९) असे तरुणाचे नाव आहे. सोमवारी रात्री आठच्या सुमारास महिबूब याने मोठ्या भावाकडे पैशाची मागणी केली. परंतु त्यांनी पैसे नसल्याचे सांगितले. यावर चिडलेल्या ईस्माईलने घरातील झोपेच्या ३० गोळ्या खालल्या. यानंतर त्यास त्रास होऊ लागल्याने सैपन शेख यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## लिंगायत तत्त्वांचा मृत्युंजय महास्वामींकडून प्रचार : देवरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

महात्मा बसवेश्वरांच्या आधीपासून विश्वासात लिंगायत धर्म होता. त्याला वाढविण्याचे काम बसवेश्वरांनी केले. महात्मा बसवेश्वरांनी केलेले कार्य, त्यांची तत्त्वे, दिलेली शिकवण याचा प्रसार, प्रचार किरीटेश्वर मठाचे मठाधिपती श्रीमनिप्र मृत्युंजय महास्वामी यांनी केल्याचे प्रतिपादन पूज्य श्री प्रशांत देवरु कोंडगोळे यांनी केले.


कुंभार वेस येथील श्री किरीटेश्वर संस्थान मठात वेदांताचार्य मृत्युंजय महास्वामींच्या ३५ व्या पुण्यस्मरणोत्सवानिमित्त आयोजित प्रवचनमालेच्या दुसऱ्या दिवशी ते बोलत होते. सकाळच्या सत्रात झालेल्या रक्तदान शिबिरात १५ जणांनी रक्तदान केले. उद्घाटन श्रीमनिप्र स्वामीनाथ महास्वामी, प्रशांत देवरु, चरमूर्ती महास्वामी, जागतिक लिंगायत महासभेचे जिल्हाध्यक्ष शिवानंद गोगाव, पौर्णिमा तोट्टद यांच्या हस्ते करण्यात आले. लिंगायत धर्माला एक स्वतंत्र अधिष्ठान आहे. त्याला एक विचार आणि आधार आहे. विश्वाप्रती आदर ठेवण्याची शिकवण लिंगायत धर्म देते. या धर्माला वाढविण्याबरोबरच तत्त्वांचा प्रसार करण्याचे काम महात्मा बसवेश्वरांनी केले. महात्मा बसवेश्वरांमुळे लिंगायत धर्माची व्यापकता वाढत अखिल विश्वामध्ये हा धर्म पोहोचला. हे बसवण्णांचे कार्य त्यांच्या पश्चात सर्वत्र पोहोचविण्याचे काम मृत्युंजय महास्वामींनी केले.

आता या कार्यासाठी स्वामीनाथ महास्वामी झटत आहेत, असे प्रशांत देवरु यांनी सांगितले. यावेळी हेडगेवार रक्तपेढीच्या जनसंपर्क अधिकारी संगीता मेंथे-कोरे, डॉ. आनंद वैद्य, गीता राठोड, राहुल मस्के, पार्वती कोळी यांच्यासह जागतिक लिंगायत महासभेचे युवा अध्यक्ष शिवराज कोटगी, बसवराज चकई, राजेंद्र होवडे, लक्ष्मण चालगेरी, जयश्री कण्णगी, शिवानंद गंगावती, अनुसया हिरेमठ आदी उपस्थित होते.

## दोन दिवसात सर्वांची समजूत घालून मतदारसंघातील वातावरण पूरक करू : तटकरे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. ५ नोव्हेंबर -**

अपवादात्मक मतदारसंघात अर्ज दाखल झाले आहेत मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अजितदादा पवार यांच्याशी एकत्रित चर्चा झाली आहे. जे - जे मतदारसंघ सोडण्याचे निर्धारित झाले होते त्याठिकाणी एकत्रित काम कसे करता येईल यासाठी युध्दपातळीवर आम्ही प्रयत्न करत आहोत. एक-दोन दिवसात सर्वांची समजूत घालून त्या - त्या मतदारसंघातील वातावरण योग्य पध्दतीने पूरक होईल असा प्रयत्न आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



आज महायुतीच्या प्रचाराचा महालक्ष्मीच्या चरणी नतमस्तक होऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत कोल्हापूर येथे आज संध्याकाळी होणार आहे. त्यामुळे २८८ जागांवर महायुती पूर्ण ताकदीने लढतील , असे सांगून तटकरे म्हणाले, आमच्या अपवादात्मक संख्या एबी फॉर्मसंदर्भात आहेत. अन्य ठिकाणी अपक्ष उमेदवार हे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसचे असतील तर त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न नक्कीच करत आहोत. एक - दोन दिवसात नाराजांची समजूत काढण्यात नक्कीच यशस्वी होऊ असे सांगून सुनिल तटकरे म्हणाले.,देवळाली ही जागा राष्ट्रवादीची असून त्याठिकाणी सरोज अहिरे या आमच्या महायुतीच्या उमेदवार आहेत. हेमंत गोडसे यांच्या ज्या काही भावना असतील. त्याठिकाणी मुख्यमंत्री नक्की ती समजूत काढण्यात यशस्वी होतील.

पवारसाहेबांच्या कुठल्याच वक्तव्यावर मी कोणतीही प्रतिक्रिया देणार नाही ,असे पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देतानाच बारामतीची जनता सूज्ञ आहे. ३० वर्षात अजितदादांनी बारामतीत उभे केलेले प्रचंड काम बारामतीकर नव्हे तर पुणे जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्र विसरू शकत नाही. देशभर बारामती पॅटर्नचे कौतुक होत असते. त्यामधील अजितदादांचा जो सहभाग आहे तो सुज्ञ बारामतीकर ठरवतील की, कुणाला प्रतिनिधीत्व करण्याची संधी देऊ मात्र या विधानसभेत प्रचंड फरकाने ते निवडून येतील, असा विश्वास सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला.

Precision
P·R·I·N·T·S

तातडीने पाहिजेत

सोलापुरातील नामांकित प्रिंटिंग ऑफसेटसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे.

डिटीपी ऑपरेटर :२ पदे

किमान दोन ते तीन वर्षाचा कामाचा अनुभव कोरल ड्रॉ, फोटोशॉप, इन डिझाईन, या मध्ये काम करता आले. पाहिजे आकर्षक पगार. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह कार्यालयात समक्ष भेटावे.

**भेटण्याची वेळ सकाळी** : ११ ते ०६ वा.पर्यत.
**कामाची वेळ** : सकाळी १० ते ६.३० वा.पर्यंत

**संपर्क: ७७७४०४४४५९**
**पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# बंडखोरी, जरांगे फॅक्टरमुळे दोन्ही आघाड्यांना समान आव्हाने, समान संधी !

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई दि.५ नोव्हेंबर-**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यातील राजकीय हवा एका दिशेने वाहत असल्याचे चित्र निर्माण झाले होते. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्याच्या वागण्या बोलण्यातील अतिआत्मविश्वास, कॉँग्रेस व शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांचे एकमेकाला आपणच वरचढ व समोरचा खुजा असल्याचे भासविण्यासाठी परस्पर विरोधी विधाने आणि जागा वाटपात तुटेपर्यंत ताणलेल्या हटवादामुळे आघाडी बॅकफूटवर जात असल्याचे जाणवत होते. त्याउलट लोकसभेतील दारूण पराभवाचा विचार करून महायुती सरकारने अखेरच्या दोन-तीन महिन्यात अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले, पंतप्रधानांच्या उपस्थितीत विकास प्रकल्पाची पायाभरणी ,उद्घाटने आणि मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनासह विविध योजनांचा धडाका लावला होता. राज्याच्या कानाकोपऱ्यात आणि सर्वस्तरातील जनतेपर्यंत त्याची माहिती पोहोचावी, यासाठी हजारों कोटींच्या जाहिराती सर्वच प्रकारची प्रसारमाध्यमे ,डिजिटल व्यासपीठावरून करण्यात आल्या. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत महायुती मोठ्या आत्मविश्वासाने सामोरे जात असल्याचे चित्र काही प्रमाणात उभे राहिले होते. मात्र राजकारणात कधीच काही स्थिर नसते याची प्रचिती तिकीट वाटप व उमेदवारी जाहीर झाल्यानंतर होऊ लागली. दोन्हीं आघाडीत प्रमुख ६ पक्षातील निवडणूक लढवण्यासाठी लंगोट बांधून तयार असलेल्या इच्छुकांना पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाचा आदर, शिस्त ,मर्यादा याचा विचार करण्यासही वेळ नसल्याचे त्यांनी दाखल केलेल्या उमेदवारीवरून दिसून आले आहे. नाराजीचा फटका महाविकास आघाडीपेक्षा सत्ताधारी महायुतीमध्ये अधिक प्रमाणात जाणवत राहिला आहे त्यामुळे त्यांना काही ठिकाणी मैत्रीपूर्ण तर २५वर ठिकाणी मित्र पक्षातील बंडखोराची सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. विदर्भ, मराठवाडा खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मुंबई या सर्व विभागात बंडखोरांची लागण झाली आहे.

### राज ठाकरे-एकनाथ शिंदे मध्ये बेबनाव




निवडणुका जाहीर होईपर्यंत मनसे प्रमुख राज ठाकरे व एकनाथ शिंदे यांच्यात सलोख्याचे संबंध होते मात्र अमित ठाकरे यांनी माहीम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने महायुतीने लोकसभेतील बिनशर्त पाठिंबाच्या बदल्यात त्यांच्या मुलाला समर्थन द्यावे, अशी राज यांची इच्छा होती. मात्र शिंदे गटाने त्यापूर्वीच सदा सरवणकर यांची उमेदवारी जाहीर केली होती. तरीही भाजपाने त्याबाबत उघड भूमिका घेत दबाव वाढवला होता मुख्यमंत्री सुरुवातीला त्याबाबत सकारात्मक होते मात्र एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात राज ठाकरे यांनी पुढील मुख्यमंत्री भाजपाचा असणार असल्याचे जाहीर केल्याने शिंदे नाराज झाले. आणि त्यांनी सरवणकर यांना उमेदवारी कायम ठेवण्यास सांगितले. त्यामुळे राज हे शिंदे यांच्यावर प्रचंड नाराज असून प्रचार सभेत महाविकास आघाडी बरोबरच ते शिंदे-अजित पवार यांच्यावर आपल्या स्टाईलने टीकेची झोड उठवतील, मात्र भाजपा व त्यांच्या नेतृत्वाबाबत सौम्य भूमिका घेतील, हे पहावयास मिळेल,

त्याचबरोबर दुसरीकडे गेल्या दोन वर्षांत मराठा आंदोलनाच्या माध्यमातून उभा राहिलेले मनोज जरांगे -पाटील या नेतृत्वाने अर्ज माघारी येण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत निवडणुकीत आपले उमेदवार उतरविण्याबाबतचा सस्पेन्स कायम ठेवला होता. त्याचा फटका महाविकास आघाडीला तुलनेत जास्त बसणार होता. मात्र अखेरच्या दिवशी जरांगे पाटील यांनी निवडणुकीतून माघार घेत असल्याचे स्पष्ट करीत आपण कोणाला पाठिंबा देणार नाही, किंवा कोणाला पाडा असे सांगणार नसल्याचे जाहीर केले. त्याचा अप्रत्यक्षपणे मोठा लाभ महाविकास आघाडीला होणार आहे. त्यामुळे बंडखोर उमेदवार आणि जरांगे फॅक्टर यांच्यामुळे महाविकास आघाडीला प्रचाराच्या लढाईत बरोबरीत आणून ठेवले आहे. बहुतेक मतदारसंघात तिरंगी- चौरंगी लढती चुरशीच्या होणार असून विजयाचे गणित अवघ्या काही मतावर निश्चित होणार आहे

राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात एकूण ४ हजार १४० उमेदवार रिंगणात आहेत.. त्यामध्ये महायुतीतील मोठा पक्ष असलेल्या भाजपाने १५२, शिवसेना एकनाथ शिंदे ८६ व राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार गट-५५ जागा लढवत आहे तर महाविकास आघाडी मधून कॉँग्रेसने सर्वाधिक १०१ ठिकाणी उमेदवार दिले आहेत तर उद्धव ठाकरे गट ९६ आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गट-८७ जागी उमेदवार दिले असून सपाला २ व शेकापला ३ जागा दिल्या आहेत.

त्याशिवाय युवराज संभाजी राजे यांचा स्वराज्य पक्ष, राजू शेट्टी यांचे स्वाभिमानी शेतकरी संघटना यांची व बच्चू कडू यांची तिसरी आघाडीने जवळपास दीडशे जागी तर मनसे १२५ जागांवर उमेदवार दिले आहेत. तसेच वंचित बहुजन आघाडीनेही १७० वर ठिकाणी उमेदवार उभे केले असून त्याशिवाय



एमआयएम, अपक्ष उमेदवारांचीही मोठी फौज रिंगणात आहे.

महायुती आणि महाविकास आघाडीची जागांची समीकरणे अनेक ठिकाणी बिघडली असून युतीतील मित्र पक्षानी परस्पर विरोधात पक्षाकडून एबी फॉर्म देण्यात आले आहेत.

राज्यात यावेळी सर्वात लक्षवेधी लढत लोकसभेप्रमाणेच बारामतीत होत आहे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात त्यांचा सख्खा पुतण्या युगेंद्र दंड थोपटले आहेत त्याच्या विजयासाठी शरद पवार स्वतः मैदानात उतरले असून लोकसभेप्रमाणे त्यांनीही लढत सुप्रिया सुळे व सुनेत्रा पवार यांच्यातील नणंद भावजय अशी न करता अजित पवार विरुद्ध शरद पवार अशीच करण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे या लढतीकडे पूर्ण देशाचे लक्ष लागून राहिले आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे हे माहीम मतदारसंघातून पहिल्यांदाच निवडणूक रिंगणात उतरल्याने त्यांना महायुतीने पाठिंबा द्यावा अशी उघड भूमिका भाजपाने घेतली. मात्र मुख्यमंत्री शिंदे व त्यांचे उमेदवार सदा सरवणकर यांनी तो दबाव झुगारून मैदानात उतरले आहेत. तर मानखुर्द शिवाजीनगर मतदारसंघातून अजित पवार गटाने भाजपा व शिंदे गटाचा प्रकर विरोध डावलून नवाब मलिक यांना एबी फॉर्म दिला आहे.

विदर्भात रामटेक मध्ये उध्दव ठाकरे यांच्या उमेदवाराने अर्ज कायम ठेवला आहे. बडनेरा मतदार संघातून रवी राणा यांच्या विरोधात भाजपाचे तुषार भारतीय यांनी बंड केले आहे.

पश्चिम महाराष्ट्रात सांगोल्यात तिहेरी लढत होत असून ठाकरे गट व शेकापच्या उमेदवारी महाविकास आघाडीचे दुखणे ठरणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गृह जिल्हा असलेल्या ठाण्यात काही प्रतिष्ठेच्या मतदारसंघात बंडखोरी रोखण्यात शिंदे व फडणवीस यांना अपयश आले. नवी मुंबईतील ऐरोली-बेलापूर व कल्याण पूर्व या तीन जागी शिंदे यांच्या समर्थकांनी बंडखोरी केली आहे.त्यामुळे महायुतीची डोकेदुखी वाढली आहे. ऐरोली विधानसभा मतदारसंघात भाजपाचे गणेश नाईक यांच्याविरुद्ध शिंदे गटाचे विजय चौगुले अपक्ष म्हणून रिंगणात राहीले आहेत. तर बेलापुरात भाजपच्या मंदा म्हात्रे यांनाच पुन्हा उमेदवारी दिली जाणार असल्याचे स्पष्ट होताच गणेश नाईक यांचे पुत्र संदीप यांनी हाती तुतारी घेऊन उमेदवारी मिळविली तर शिंदे गटाचे विजय नाहटा यांनीही दंड थोपटले आहेत

कल्याण पूर्वेत विद्यमान आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांना भाजपने उमेदवारी दिली खरी मात्र शिंदे गटाच्या महेश गायकवाड यांनी बंडखोरी करत आपला अर्ज कायम ठेवला आहे. भिवंडी ग्रामीण आणि कल्याण पश्चिम या मतदारसंघांमध्ये शिवसेनेच्या विद्यमान आमदारांना भाजपचे मोठे आव्हान आहे. भिवंडी ग्रामीणमध्ये शांताराम मोरे यांच्यासमोर कपिल पाटील समर्थक स्नेहा पाटील यांनी बंडखोरी केली आहे.

कल्याण पश्चिम येथे शिवसेनेच्या विस्वनाय भोईर यांच्यासमोर पाटील यांचे निकटवर्तीय वरुण पाटील यांनी बंडखोरी केली आहे

मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार गीता जैन यांनी बंडखोरी कायम ठेवली असून त्या सलग दुसऱ्यांदा भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता यांच्याविरोधात रिंगणात आहे.तर नाशिक जिल्ह्यात

नांदगावमध्ये शिंदे गटाचे सुहास कांदे यांच्या विरोधात छगन भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ अपक्ष उभे आहेत. मराठवाड्यात सर्वच पक्षांमध्ये बंडखोरी झाल्याचे चित्र आहे.

## संक्षिप्त वृत्त

### कुलकर्णी तांड्यावर लाखाची घरफोडी

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

शहरातील कुलकर्णी तांड्यावरील महिलेचे घर फोडून चोरट्याने ९४ हजारांचे दागिने चोरून नेले. याबाबत जयश्री मारूती चव्हाण (वय ४०) या महिलेच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्यांविरूध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ नोव्हेंबर रोजी दुपारी जयश्री चव्हाण यांच्या घराच्या उघड्या घरात चोरट्याने प्रवेश करून लोखंडी कपाट उचकटून कपाटातून १ तोळ्याचे सोन्याचे नेकलेस, ५ ग्रॅमचे सोन्याची बोरमाळ, १ तोळ्याचा सोन्याचा दागिनी हार, ४ ग्रॅमचे सोन्याची झुबे असा ९४ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास विजापूर नाका पोलिस करीत आहेत.

### दुचाकीस्वाराच्या मृत्यूप्रकरणी कारचालकाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

कारचा डाव्या बाजूचा दरवाजा निष्काळजीपणे उघडल्याने दरवाजाला धडकून झालेल्या दुचाकीस्वाराच्या मृत्यूप्रकरणी कारचालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत भास्कर जगन्नाथ माडीकर (वय ५७, रा. मुरारजी पेठ, निर्मल नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन श्रीकृष्ण प्रकाश सुरवसे (रा. माहिती नाही) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविंद्र माडीकर (रा. सोलापूर) असे मरण पावलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. २१ ऑक्टोबर रोजी दुपारी रविंद्र माडीकर हे त्यांच्या दुचाकी क्र. एमएच १३ बीके ३४८० वरुन सोलापूर ते बार्शी रोडने जात होते. त्यावेळी बाळे येथे बार्शीकडे जाणाऱ्या एमएच ०२ सीडब्ल्यू ९९२४ क्रमांकाच्या कारच्या चालकाने निष्काळजीपणे कारच्या डाव्या बाजूचा दरवाजा अचानपणे उघडला. त्यामुळे रविंद्र माडीकर यांची दुचाकी या दरवाजाला धडकून ते खाली पडून गंभीर जखमी होऊन मरण पावले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

### सिव्हील हॉस्पीटलजवळून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

शहरातील सिव्हील हॉस्पीटलजवळून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत इलाही मकबुल शेख (वय ४४, रा. निलम नगर शरण मठाजवळ, गंगा चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इलाही शेख यांनी २२ ऑक्टोबर रोजी त्यांची दुचाकी क्र. एमएच १३ सीवाय ८२४९ ही सिव्हिल हॉस्पीटलजवळ पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार फुटाणे पुढील तपास करीत आहेत.

### भारत नगर येथे रोडवर थांबलेल्या वृध्दाचा मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

भारत नगर येथे रोडवर थांबलेल्या वृध्दाच्या खिशातील मोबाईल चोरट्याने जबरदस्तीने चोरून नेला. याबाबत आंदानेप्पा आबा आटंद (वय ७२, रा. भारत माता नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी आंदानेप्पा आंटद हे विशाल किराणा दुकानासमोर रोडवर उभे होते. त्यावेळी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या शर्टाच्या खिशातून १ हजार रुपये किंमतीचा मोबाईल जबरदस्तीने चोरून नेला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पाटील पुढील तपास करीत आहेत.

### बार्शी रोडवरील कमलेश नगरात पावणे तीन लाखांची घरफोडी

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

शहरातील बार्शी रोडवरील कमलेश नगरातील बंद घर फोडून चोरट्याने २ लाख ७७ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. याबाबत सतिश शिवाजी चवरे (वय ३१, रा. प्लॉट नं. ४१, कमलेश नगर, बार्शी रोड, एमएसईबी सब स्टेशनच्या पाठीमागे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ४ नोव्हेंबर रोजी सतिश चवरे हे सकाळी ९ वाजता घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. ते सायंकाळी परत घरी आले असता त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने चवरे यांच्या बंद घराचे कुलूप कशानेतरी तोडून घरातील किचनमध्ये असलेल्या लोखंडी कपाटातील सोन्या-चांदीचा ऐवज चोरून नेला. यामध्ये १५ ग्रॅमचे सोन्याचे नेकलेस, १५ ग्रॅमचे सोन्याचे ब्रेसलेट, ६ ग्रॅमची कर्णफुले, १० ग्रॅमची सोन्याची अंगठी, ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी, साडेचार ग्रॅमची सोन्याची चैन, कर्णफुले व कानपट्टी, साडेचार ग्रॅमचे मणिमंगळसूत्र, नोकरीची कागदपत्रे, दागिन्यांच्या पावत्या व इतर कागदपत्रे चोरट्याने चोरून नेली. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे पुढील तपास करीत आहेत.

### शेतात अतिक्रमण करून ठार मारण्याची धमकी देणाऱ्यांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

शेतात अतिक्रमण करून ठार मारण्याची धमकी देणाऱ्या चौघांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नितीन औदुंबर ठोकळ (वय ३९, रा. रेल्वे लाईन, देशकवाडी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मिथून बाळू राठोड, त्याची पत्नी, चिथुन बाळू राठोड, त्याची पत्नी (रा. माहित नाही) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नितीन ठोकळ यांची बाळे, शिवाजी नगर येथील सर्व्हे नं. १८/३/ब ही शेतजमिन आहे. २ नोव्हेंबर रोजी दुपारी ठोकळ हे शेतजमिनीमध्ये हजर असताना मिथून राठोड व त्याचे साथीदार हे तिथे आले. त्यांनी ठोकळ यांच्या शेतजमिनीवर अतिक्रमण केले व ठोकळ यांना शिवीगाळ करून ठोकळ यांचे काम थांबविले. राठोड यांनी ठोकळ यांना मारहाण करून ही जमीन आमची आहे, तू इथुन निघून जा, पुन्हा या जमिनीमध्ये पाय ठेवशील तर आम्ही तुला जिवंत ठेवणार नाही, तुझ्या येथेच खांडोळ्या करून टाकू अशी धमकी दिली. तसेच ठोकळ यांनी जमिनीमध्ये रोवलेले सिमेंटचे ६ मार्किंग पोल तोडून टाकून नुकसान केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

## पोलीस महासंचालकपदी संजय वर्मा यांची निवडणूक आयोगाकडून नियुक्ती

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.५ नोव्हेंबर-**

राज्याच्या पोलीस महासंचालक पदावरून रश्मी शुक्ला यांची उचल बांगडी झाल्यानंतर केल्यानंतर आता त्यांच्या जागी ज्येष्ठ आयपीएस अधिकारी संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी त्याबाबतचे आदेश जारी केले



वर्मा हे १९९० च्या तुकडीचे वरिष्ठ अधिकारी असून सध्या कायदा व तांत्रिक विभागाचे संचालक म्हणून कार्यरत होते. ते एप्रिल २०२८ मध्ये निवृत्त होणार आहेत.

रश्मी शुक्ला यांच्याबाबत कॉँग्रेस व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी वारंवार केलेल्या तक्रारीची दखल घेत निवडणूक आयोगाने सोमवारी

रश्मी शुक्ला यांना पदावरून हटवले.त्यांच्याकडील कार्यभार सेवाज्येष्ठतेनुसार मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर देण्यात यावा. तसेच, मुख्य सचिवांनी सेवाज्येष्ठता व योग्यतेनुसार तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांनी नावे मंगळवारी दुपारी एक वाजेपर्यंत निवडणूक आयोगाकडे पाठवावीत, यापैकी एका अधिकाऱ्याची पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती केली जाईल, असे आयोगाकडून कळविण्यात आले होते. त्यानुसार राज्य सरकारने पाठवलेल्या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावातून आयोगाने वर्मा यांची महासंचालकपदी नियुक्ती आहे.

## माध्यमांसाठी विधानसभा पूर्वपिठीका माहिती पुस्तिका उपयुक्त : विभागीय आयुक्त पुलकुंडवार

**विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याहस्ते विधानसभा माहिती पुस्तिकेचे प्रकाशन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा माहिती कार्यालयाने तयार केलेल्या विधानसभा पूर्वपिठीका माहिती पुस्तिकेचे प्रकाशन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते करण्यात आले.



जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमप्रसंगी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद , पोलीस आयुक्त एम.राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार, पोलीस शहर उपायुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी (महसूल ) अमृत नाटेकर , जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांच्यासह सर्व नोडल अधिकारी, सर्व विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या या निवडणूक पूर्वपिठीकेत सन १९९० ते सन २०१९ तसेच सन २०२१ पंढरपूर विधानसभा पोटनिवडणूक या सदंर्भातील माहिती देण्यात आली आहे. विधानसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम, विधानसभा मतदारनिहाय अंतिम मतदारांची आकडेवारी, विधानसभा मतदारनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीसाठी नियुक्त समिती, त्यांची माहिती यामध्ये देण्यात आली आहे. नियंत्रण कक्ष क्रमांक, निवडणूक आचारसंहिता काय करावे, काय करु नये, प्रचार संबंधितच्या सूचना, पेड न्यूज, प्रेस कौन्सिलची मार्गदर्शक तत्वे, समाज माध्यम वापराबाबत निवडणूक आयोगाच्या सूचना आदींची माहिती देण्यात आली आहे.जिल्हा माध्यम कक्षचे नोडल अधिकारी सुनिल सोनटक्के यांनी संपादित केलेल्या या पूर्वपिठीकेसाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद तसेच उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश नि-हाळी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

## जिल्ह्यातील विधानसभा निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडावी

### निवडणूक जनरल निरीक्षकांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑक्टोबर-**

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे त्यानुसार दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्ह्याच्या अकरा विधानसभा मतदारसंघात मतदानाची प्रक्रिया पार पडणार असून दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. तरी या निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त केलेले सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडून ही निवडणूक प्रक्रिया यशस्वी करावी, असे आवाहन अकरा विधानसभा मतदारसंघासाठी नियुक्त करण्यात आलेले निवडणूक जनरल निरीक्षक अफसाना परवीन, निधी निवेदिता, सादिक आलम, रितुराज रघुवंशी, सुबोध कुमार यांनी संयुक्तपणे केले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित विधानसभा निवडणूक २०२४ च्या आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, पोलीस शहर उपायुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी,



उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, स्वीप चे नोडल अधिकारी सुधीर ठोंबरे, सिव्हिलचे नोडल अधिकारी आशिष लोकरे, वाहतूक व्यवस्था नोडल अधिकारी गजानन नेरपगार, लिकर चे नोडल अधिकारी भाग्यश्री जाधव यांच्यासह अन्य नोडल अधिकारी, सर्व विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक जनरल निरीक्षक श्री सुबोध कुमार म्हणाले की, निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण व्यवस्थित होणे हा महत्त्वाचा घटक आहे. त्याप्रमाणे सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्याकडे नियुक्त केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व त्यांना प्रात्यक्षिक चांगल्या पद्धतीने करून घेतले पाहिजेत. मतदानाच्या दिवशी मतदानाची प्रक्रिया वेळेत पार पाडण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवणार नाही याची खात्री सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करून घ्यावी असेही त्यांनी सूचित केले.

जिल्ह्यात स्वीप अंतर्गत सुरू असलेल्या कामकाजाची माहिती जनरल निवडणूक निरीक्षक यांनी घेऊन हा कार्यक्रम अत्यंत काटेकोरपणे राबवून जास्तीत जास्त मतदाराचे प्रबोधन करून मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना केल्या. यावेळी सर्व जनरल निवडणूक निरीक्षक यांनी निवडणूक कामकाजाची माहिती घेऊन सर्व संबंधितांना मार्गदर्शक सूचना दिल्या. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा प्रशासनाने विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात केलेल्या निवडणूक तयारीची सविस्तर माहिती बैठकीत दिली. तसेच सोलापूर शहर पोलीस आयुक्त श्री. राजकुमार व पोलीस अधीक्षक श्री. कुलकर्णी यांनी सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण मध्ये पोलीस विभागाच्या वतीने निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले मनुष्यबळ तसेच कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

## राहुल गांधींच्या उपस्थितीत आज मविआची मुंबईत 'महाराष्ट्र स्वाभिमान सभा'

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी कॉँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे उद्या बुधवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून नागपुरात दुपारी १ वाजता 'संविधान सन्मान संमेलनाला' उपस्थित राहणार आहेत. तर संध्याकाळी ५ वाजता मुंबईच्या वांद्रे कुर्ला संकुलातील एमएमआरडीए मैदानात मविआची 'महाराष्ट्र स्वाभिमान सभा' होणार आहे .

या सभेत कॉँग्रेस पक्षाच्या गॅरंटी जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रदेश कॉँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. ते म्हणाले की, बीकेसीतील सभेला, राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खा. शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, कॉँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य आणि प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुंबई कॉँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख नेते या सभेला उपस्थित राहणार आहेत. कॉँग्रेस पक्ष या गॅरंटी महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरात पोहोचवणार असून महायुतीच्या भ्रष्ट कराभाराबाबत जनजागृती करणार आहे.

एकनाथ शिंदे-भाजपा-अजित पवार युती सरकारने महाराष्ट्राचा स्वाभिमान गुजरातकडे गहाण ठेवला आहे तो मविआ परत आणेल. तसेच भाजपाच्या फेक नेरेटिव्हलाही चोख उत्तर दिले जाईल. कॉँग्रेसने कर्नाटक विधानसभेपासून गॅरंटी जाहीर केल्या असून ज्या जाहीर केल्या त्याची अंमलबजावणी सुद्धा सुरु आहे. तेलंगणातील कॉँग्रेस सरकारने कोणत्या गॅरंटी जाहीर केल्या व त्याची अंमलबजावणी कशी सुरु आहे हे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन स्पष्ट केले आहे. त्यामुळे भाजपाच्या फेक नॅरेटिव्हला राज्यातील जनता बळी पडणार नाही, असेही अतुल लोंढे म्हणाले.

## अग्रलेख...

# उदंड जाहली बंडखोरी

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांचे अर्ज मागे घेण्याचा दिवस होता ४ नोव्हेंबर २०२४. यात प्रामुख्याने बंडखोरांच्या माघारीवर सर्वांचे लक्ष होते. महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी ही निवडणूक होत आहे. अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर चार हजारांवर उमेदवार रिंगणात असून सुमारे तीन हजार उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यातील बहुसंख्य लोक हौसेखातरच उभे झालेले होते. काही मोजके प्रायोजितही होते. राज्याचे एकूण चित्र पाहिले तर दीडशेच्या वर बंडखोरांनी आपली उमेदवारी कायम ठेवलेली आहे. भाजपा, काँग्रेस, शिवसेना-उबाठा, शिवसेना-शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस-अजित पवार असे सहा प्रमुख पक्ष यावेळी मैदानात आहेत. याशिवाय, मनसे, वंचित बहुजन, बसपासारखे छोटे पक्ष आणि मोठ्या संख्येने अपक्षही शड्डू ठोकून आहेत. सहाही प्रमुख पक्षांचे बंडखोर मोठ्या संख्येने रिंगणात कायम आहेत. काहींची बंडखोरी रोखण्यात या पक्षांना यश आले, पण बहुतेकांची मनधरणी यशस्वी ठरलेली नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी बंडखोरांच्या रूपाने स्वपक्षीय उमेदवार अपक्ष म्हणून किंवा अन्य कुठल्या तरी पक्षाचा म्हणून, कुणाचा भाऊ, कुणाचा नातेवाईक, कुणाचा शत्रू, कुठल्या तरी जातीचा नेता अशा विविध रूपाने उमेदवार दिसत आहेत. विदर्भात ६२ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी ३२ मतदारसंघांत बंडखोर कायम आहेत. अशीच परिस्थिती मुंबई, कोकण, पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही आहे. क्षेत्रानुसार जातींचे गणित बदलते, प्रभाव बदलतात, राजकीय समीकरणे बदलतात; पण बंडखोरीचे लोण सर्वत्र कायम दिसते आहे. या बंडखोरीमुळे महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही प्रमुख राजकीय आघाड्यांपुढे मोठे आव्हान उभे राहिले असून महाराष्ट्राच्या राजकारणात अपक्ष आमदारांचा बोलबाला तर दिसणार नाही ना, अशी चर्चा आता सुरू झालेली आहे.

१९९९ पर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात तीनच प्रमुख पक्ष होते. भाजपा-शिवसेना यांची युती होती आणि दुसऱ्या बाजूला काँग्रेस पक्ष होता. छोटे-मोठे पक्ष या दोन प्रवाहांमध्ये सामील झालेले होते. १९९९ मध्ये शरद पवार यांनी सोनिया गांधींच्या नेतृत्वातील काँग्रेसशी काडीमोड घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. हा महाराष्ट्राच्या राजकारणातील चौथ्या पक्षाचा उदय होता. पुढे निवडणुका झाल्या आणि शरद पवारांनी भांडण बाजूला ठेवून काँग्रेसच्या सोबत सत्ता उपभोगली. केंद्रात आणि राज्यातही. त्यानंतर भाजपा-शिवसेना एकीकडे आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस दुसरीकडे, असेच राजकारण दीर्घकाळ चालत राहिले. दरम्यान, शिवसेना व भाजपाचे संबंध ताणले गेले. २०२२ मध्ये उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वातील शिवसेनेची दोन शकले झाली आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात वेगळी शिवसेना स्थापन झाली. त्या पाठोपाठ शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटला आणि अजित पवारांच्या नेतृत्वात वेगळा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन झाला. तीन पक्षांचे अशा तऱ्हेने सहा पक्ष झाले. भाजपा हा न फुटलेला एकमेव पक्ष. भाजपातले काही लोक राजी-नाराजीतून बाहेर गेले, काही परतही आले. पण, भाजपा अद्याप न फुटलेला आणि दमदार असा एकमेव पक्ष आहे. तीच त्याची खरी ताकद आहे. त्यामुळे सर्वांत मोठा पक्ष म्हणून भाजपाचे स्थान यंदाच्या निवडणुकीतही कायम राहील, असे दिसते. तरीही सत्तेची समीकरणे कोणती वळणे घेतात, हे प्रत्यक्षात निकाल लागल्यावर कळेल.

एकाचे दोन पक्ष होतात, तेव्हा दोन प्रवाह आपसूकच त्या पक्षात वाहू लागतात. दोन नेते असतात आणि कार्यकर्त्यांचेही विभाजन होते. आता छोटा असला तरी आपला पक्ष म्हणून अनेकांच्या आशा पल्लवित होतात. प्रत्येकाला आमदार व्हायची घाई असतेच. आमदारकीचे तिकीट मागितले आणि नाकारले गेले तरी नगरसेवक पदाचे तिकीट पक्के होते किंवा विधान परिषद, मंडळ-महामंडळ यांची सोय होते, अशी राजकीय थिअरी आहेच. त्यात भर म्हणून सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांकडे गाजराची गोदामे भरून ठेवलेली असतात. त्यामुळे, आला कार्यकर्ता की दे गाजर, असा कार्यक्रम सुरू राहतो. थोडेसे आठवून पाहा. प्रत्येकाच्या लक्षात येईल की, यंदाच्या निवडणुकीची पृष्ठभूमी अशीच तयार झाली. लोकसभेतील यशामुळे महाविकास आघाडीच्या आशा पल्लवित झाल्या. तिकडे गाजराची मागणी आणि पुरवठा हे दोन्ही वाढले. महायुतीतही थोड्या फार प्रमाणात का होईना, असेच होत राहिले. जे विद्यमान आमदार आहेत, त्यांना आपल्याच युतीतील किंवा आघाडीतील आकांक्षी उमेदवार अडचणीचा वाटू लागला. जे इतके दिवस वाट पाहत होते, त्यांना विद्यमान आमदार नकोसा झालेला. आपले काम सुरू ठेवा, असे अनेकांना त्यांच्या नेत्यांनी सांगितले होते. ते काम करीत राहिले आणि प्रसंग आल्यावर तिकिटावर दावा केला. तिकीट नाकारले गेले तर तो बंडखोर झाला. काही बंडखोरांना असे वाटते की, आपण आपल्या जातीमुळे निवडून येऊ. काहींना असे वाटते की, आपण अपक्ष असलो तरी लोकप्रिय उमेदवार आहोत. काहींचा समज असा आहे की, आपल्याशिवाय देशसेवा करणारे दुसरे कुणीच नसल्यामुळे आपल्याला निवडणूक लढवावीच लागणार. यातही एक मुद्दा लक्षणीय आहे. तो असा की, स्वयंस्फूर्त आणि प्रायोजित अशी दोन्ही प्रकारांची बंडखोरी यावेळी रिंगणात दिसते. काही ठिकाणी बंडखोरांना प्रायोजित करून मत विभाजनासाठी उभे ठेवण्यात आले आहे. ज्यांना छोट्या पक्षांची तिकिटे दिली गेली त्यातील बहुतांशी उमेदवार या रणनीतीचे भाग म्हणून उभे आहेत. पडद्यामागे बराच मोठा व्यवहार झाल्याची चर्चा उगीच होत नसते. काहींची उमेदवारी वरकरणी अपक्ष दिसत असली, तरी त्यांच्या मागे कुठली तरी शक्ती उभी आहे. या साऱ्यांचा परिणाम म्हणून सत्तेची समीकरणे पूर्णपणे बदलतील, असे वाटत नाही. मात्र, अपक्ष आमदारांची संख्या यावेळी अधिक राहील, असा अंदाज वर्तविला जाऊ लागला. तसे झाले तर अपक्ष आमदारांच्या भूमिकेला १९९५ मध्ये आले होते, तसे महत्त्व येईल. त्यात नऊ पक्षांच्या परिवर्तन आघाडीचे उमेदवार आणि मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आवाहनानुसार काही मतदारसंघात पडणारा फरक हेही मुद्दे असतील. एकुणात असे दिसते की, गतकाळातील फोडाफोडीतून उद्भवलेल्या कार्यकर्त्यांच्या महत्त्वाकांक्षांना विविध पक्षांच्या नेत्यांनी दाखविलेली गाजरे त्यांच्याच अंगावर येऊ लागलेली आहेत. त्यांच्या पक्षाचे नुकसान होते आहे. राजकारणात असे होतच असते. राजकारण म्हणून हे सारे ठीक आहे. इच्छा असेल त्याला निवडणूक लढण्याची मुभा आपल्या देशात आहेच. परंतु, इतक्या मोठ्या संख्येने उमेदवारी, इतक्या मोठ्या प्रमाणात बंडखोरी यातून निवडणुकीचा बाज विस्कटतो. लोकांचे प्रश्न चर्चेत येतच नाहीत. राज्यासमोरील प्रमुख मुद्द्यांचीही चर्चा होत नाही. नागरिकांनाही अशा गोंधळाच्या परिस्थितीत त्यांचा विचार करता येत नाही. राजकारणाचे गणित हे प्रामुख्याने जात-धर्म आणि मतविभाजन यांच्या भोवतीच फिरत असते. हे वाईट आहे, पण मतदारही याच विषयावर फोकस करतात. बोलत असतात. खरे तर तसे होऊ नये. उमेदवार कितीही असले, तरी स्वतःच्या आणि राज्य व देशाच्या हिताचा विचार करूनच मतदान केले पाहिजे. मतदानातून बंडखोरीला प्रोत्साहन मिळत नाही. परंतु, निर्धारपूर्वक मतदान झाले नाही तर बंडखोरांची संख्या वाढते आणि मग अस्थिर सरकार येते. हा धोका लोकांनी समजून घेतला पाहिजे. एखादा सन्माननीय अपवाद वगळला तर बहुतांशी बंडखोरांच्या हातून समाजाचे भले होण्याची शक्यता नसते. विजेत्या बंडखोरांना स्वतःच्या फायद्यात अधिक स्वारस्य असते. मंत्रिपद, महामंडळ किंवा अन्य काहीतरी लाभ त्यांना हवे असतात. स्वतःच्या लाभापलीकडे सरकारकडून लोककल्याणाचे ठोस काम करून घेण्यासाठी त्यांच्याकडे इच्छाशक्तीही नसते आणि बहुतेकदा क्षमताही नसते. त्यामुळे मैदानात कितीही बंडखोर दिसत असले, तरी मतदारांनी सुजाणपणा दाखविला पाहिजे आणि आपल्या मताचे दान समाजाच्या व्यापक कल्याणासाठी सत्पात्रीच पडेल, याची काळजी घेतली पाहिजे. उडदामाजीच निवडायचे असतील तर एवढा विवेक मतदारांकडे हवाच!

## प्रासंगिक

# वायनाडमध्ये प्रियांका वढेरांची कसोटी

**राहुल गोखले**

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांबरोबरच काही राज्यांत लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांत पोटनिवडणुका होणार आहेत. त्यातील लक्षवेधी पोटनिवडणूक ही केरळमधील वायनाडची. लोकसभेतील विद्यमान विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी यंदाची लोकसभा निवडणूक अमेठी आणि वायनाड या दोन मतदारसंघांतून लढविली होती. २०१९ सालच्या निवडणुकीतही ते दोन ठिकाणी रिंगणात होते. मात्र, त्यावेळी अमेठीत त्यांचा पराभव झाल्याने वायनाडचे प्रतिनिधित्व करण्यावाचून त्यांच्यासमोर पर्याय नव्हता. यावेळी ते या दोन्ही मतदारसंघांतून विजयी झाल्याने त्यांनी वायनाड मतदारसंघातून खासदारकीचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर तेथून त्यांच्या भगिनी प्रियांका वढेरा पोटनिवडणूक लढवतील, असे जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. प्रियांका वढेरा यांची प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात प्रवेश करण्याची ही पहिलीच वेळ आहे. आजवर त्यांनी पक्ष संघटनेत काम केले आणि निवडणुकांमध्ये पक्षाचा प्रचारही केला; पण त्या स्वतः उमेदवार कधीच नव्हत्या.

वायनाड लोकसभा मतदारसंघ काँग्रेससाठी अत्यंत सुरक्षित मतदारसंघ मानला जातो. कारण तो मतदारसंघ २००९ साली नव्याने अस्तित्वात आल्यापासून तेथे सातत्याने काँग्रेसचाच उमेदवार विजयी होत आला आहे. मतदारसंघ सुरक्षित असला, तरी काँग्रेससमोर तेथे आव्हान उभे राहत नाही, असे मुळीच नाही. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांच्या विरोधात भाजपाने प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन यांना उमेदवारी दिली होती. २०१९ च्या तुलनेत भाजपाला मिळालेल्या मतांचे प्रमाण यंदा सुमारे सात टक्क्यांनी वाढले; परिणामतः राहुल गांधी यांना मिळालेल्या मतांचे प्रमाण जवळपास तितक्याच प्रमाणात घटले. याचाच अर्थ डाव्या आघाडीच्या उमेदवाराच्या मतांच्या प्रमाणात फारसा बदल झाला नाही आणि काँग्रेसची मते भाजपाने खेचून घेतली. पोटनिवडणुकीत भाजपा आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय) या दोन्ही पक्षांनी आपापले उमेदवार बदलले आहेत. सीपीआयने सत्येन मोकेरी यांना उमेदवारी दिली आहे. मोकेरी यांनी याच मतदारसंघातून २०१४ साली निवडणूक लढविली होती. २००९ च्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराचा तब्बल दीड लाखांच्या मताधिक्याने विजय झाला होता; ते मताधिक्य मोकेरी यांनी २०१४ साली २० हजारांवर उतरवले होते. भाजपाने आपल्या तरुण नेत्या नव्या हरिदास यांना उमेदवारी दिली आहे



नव्या हरिदास या सॉफ्टवेअर अभियंता आहेत आणि २०१५ पासून कोझिकोडे महापालिकेत नगरसेवक आहेत. २०१५ साली भाजपाने त्यांना प्रथम उमेदवारी दिली ती दोन कारणांमुळे. एक, तो मतदारसंघ महिलांसाठी राखीव होता आणि दोन, नव्या हरिदास यांचे कुटुंब भाजपाशी निगडित होते. पहिल्याच निवडणुकीत हरिदास यांनी बाजी मारली. प्रतिस्पर्ध्यापेक्षा १२० मते अधिक मिळवून त्या विजयी झाल्या. आपल्या पहिल्या कार्यकाळात त्यांनी आपल्या प्रभागाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. २०२० सालच्या निवडणुकीत त्यांना पुन्हा उमेदवारी मिळाली आणि त्यांनी आपले मताधिक्य ५०० पर्यंत वाढवत विजय नोंदविला. २०२१ साली कोझिकोडे दक्षिण विधानसभा मतदारसंघातून भाजपाने त्यांना उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत जरी त्या तिसऱ्या स्थानावर राहिल्या तरी अगोदरच्या निवडणुकीच्या तुलनेत त्यांनी भाजपाची मत टक्केवारी पाचेक टक्क्यांनी वाढवून दाखविली. आता त्यांना थेट लोकसभा पोटनिवडणुकीत भाजपाने उमेदवारी दिली आहे. त्यांचा मार्ग सोपा नाही हे खरे; मात्र प्रियांका वढेरा आणि पर्यायाने काँग्रेसचा जनाधार काही प्रमाणात तरी भाजपाकडे वळविण्यात त्या यशस्वी ठरल्या तरी त्यांनी पुढील निवडणुकीची पायाभरणी केली, असेच मानले जाईल.

केरळ हा भाजपासाठी नेहमीच आव्हानात्मक प्रदेश राहिला आहे. तथापि अविरत मेहनत, चिकाटी, जिद्द यामुळे भाजपाचा जनाधार तेथे विस्तारत आहे, हेही खरे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या निकालात त्याचे प्रत्यंतर आले. २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा भाजपाला साडेतीन टक्के जास्त मते मिळाली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला केवळ एका विधानसभा मतदारसंघात आघाडी मिळाली होती; तर सात विधानसभा मतदारसंघांत तो पक्ष दुसऱ्या स्थानावर होता. यंदा ते चित्र कमालीचे बदलले आहे. भाजपाने तब्बल ११ विधानसभा मतदारसंघांत आघाडी घेतली; तर तो पक्ष नऊ विधानसभा मतदारसंघांत दुसऱ्या स्थानावर राहिला. अगदी कमी फरकाने भाजपा तिसऱ्या स्थानावर फेकला गेला. अशा विधानसभा मतदारसंघांची संख्या १० इतकी आहे. याचाच अर्थ केरळच्या १४० विधानसभा मतदारसंघांपैकी किमान ३० मतदारसंघ असे आहेत, जेथे भाजपाचे आव्हान काँग्रेसप्रणीत आणि डाव्या आघाडीसमोर उभे राहत आहे. त्यामुळे या दोन्ही आघाड्यांमध्ये अस्वस्थता असणे क्रमप्राप्त. शिवाय त्रिशूर लोकसभा मतदारसंघात भाजपाने विजय नोंदविला. तिरुवनंतपुरम् लोकसभा मतदारसंघात भाजपा दुसऱ्या स्थानावर राहिलाच; पण २०१९ साली काँग्रेसला तब्बल एक लाखाचे मताधिक्य होते; ते यंदा अवघ्या १६ हजारांवर घसरले. या पृष्ठभूमीवर वायनाड पोटनिवडणुकीची उत्सुकता वाढणे अपरिहार्य.

वास्तविक, केरळात काँग्रेसची लढत ही डाव्या आघाडीशी. तथापि, पोटनिवडणूक प्रचारात प्रियांका वढेरा यांनी टीका केली ती भाजपा आणि केंद्र सरकारवर. मणिपूरपासून अनेक विषयांवरून प्रियांका यांनी भाजपाला लक्ष्य केले. वायनाडमध्ये झालेल्या भूस्खलनाच्या आपत्तीनंतर तेथील पुनर्वसनाची जबाबदारी राज्य सरकारचीही असताना प्रियांका वढेरा यांनी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला नाही म्हणून केंद्र सरकारवर म्हणजेच पर्यायाने भाजपावर टीका केली. केरळात भाजपाच्या वाढत्या जनाधाराचा किती धसका काँग्रेसने घेतला आहे, याची कल्पना यातून येऊ शकेल. भाजपाला वायनाडमध्ये मोठा पल्ला गाठायचा असला, तरी त्या पक्षाचे आव्हान आहे, हेच प्रियांका यांनी अप्रत्यक्षपणे कबूल केले आहे, असे म्हटले पाहिजे. मुद्दा तेवढाच नाही; वायनाड मतदारसंघाला आता दोन प्रतिनिधी मिळतील, असे विधान राहुल गांधी यांनी केले आहे. आपण या मतदारसंघाच्या खासदारकीचा राजीनामा दिला असला, तरी आपलेही लक्ष असेल, असे त्यांना सुचवायचे असेलही; पण तसे करताना ते प्रियांका यांना दुय्यम भूमिका देत नाहीत का? असा प्रश्न अप्रस्तुत नाही. केवळ प्रियांका वढेरा निवडून आल्या तर त्या आपल्या राजकीय कारकीर्दीत प्रथमच लोकप्रतिनिधी होतील. पण म्हणून राहुल गांधी यांच्या सवलतीच वावरणे प्रशस्त नाही. लोकसभेत राहुल विरोधी पक्ष नेते आहेत. प्रियांका यांची नेमकी भूमिका काय राहील हा पुढचा प्रश्न. अन्य खासदारांपेक्षा त्यांना विशेष वागणूक देण्यास काँग्रेस नेते आतुर असतीलच. अगदी लोकसभा सभागृहात त्या कोणत्या रांगेत बसतात, याकडेही सर्वांचे लक्ष असेल. कारण, त्यातून काँग्रेसची मानसिकता स्पष्ट होईल. वायनाड लोकसभा पोटनिवडणूक ही अशी अनेक परिणाम घडवून आणणारी आहे. मताधिक्य घटल्याचा अनुभव राहुल गांधी यांना चारच महिन्यांपूर्वी मिळाला होता. ते आणखी घटले आणि भाजपाचा जनाधार वाढला तर प्रियांका वढेरा यांचा विजयदेखील निखळ नसेल.

९८२२८२८८१९

## वेध

**गिरीश शेरेकर**

# दिवाळीपाठोपाठ लग्न खरेदीने डोळे दिपणार!

दिवाळीला सणांचा राजा म्हणून ओळखले जाते. देशाच्या कानाकोपऱ्यात हा सण गरिबातला गरीब आणि श्रीमंतातला श्रीमंत मोठ्या उत्साहात साजरा करतो. आपल्या क्रयशक्तीनुसार प्रत्येक व्यक्ती म्हणा की कुटुंब दिवाळीत काही नवीन वस्तू खरेदी करतात. यंदाच्या दिवाळीच्या पाच दिवसांत बम्पर खरेदी झाली. धनत्रयोदशीच्या दिवशी देशभरातील बाजारपेठांमध्ये कमालीची चमक दिसून आली. लोकांनी जबरदस्त खरेदी केली. सोन्या-चांदीबरोबरच वाहने, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, भांडी, कपडे यासह अन्य उत्पादनांची तुफान खरेदी-विक्री झाली. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या (कॅट) म्हणण्यानुसार, यावर्षी धनत्रयोदशीला सुमारे ६० हजार कोटी रुपयांचा व्यवसाय झाल्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षी सुमारे ५० हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली होती. यंदा त्यात १० हजार कोटींची वाढ झाली. वाहन उद्योग संघटना फाडानुसार दिवाळीत चारचाकी वाहनांच्या विक्रीत १० टक्के तर दुचाकींच्या विक्रीत १५ टक्क्यांची वाढ झाली. ऑल इंडिया ज्वेलर्स अँण्ड गोल्डस्मिथ्स फेडरेशनच्या म्हणण्यानुसार भाव वाढले असले, तरी या धनत्रयोदशीला सोने-चांदीची जोरदार विक्री झाली. देशभरात सुमारे २० हजार कोटींचे सोने आणि सुमारे २,५०० कोटी रुपयांची चांदी खरेदी करण्यात आली. त्यात सुमारे २५ टन सोने व २५० टन चांदीचा समावेश आहे.

दिवाळीच्या पाच दिवसांच्या पर्वावर एकूण ४.२५ लाख कोटींची खरेदी झाल्याने अर्थव्यवस्थेला गती मिळाली आहे. यापूर्वी नवरात्रीच्या काळात १० दिवसांत ५० हजार कोटींपेक्षा जास्त रुपयांचा व्यवसाय झाला होता. दिवाळीत भारतीय वस्तूंची जोरदार खरेदी झाली. ग्राहकांनी देशातील वस्तूंना मोठ्या प्रमाणात पसंती दिली. देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात दिवाळीचे पर्व अत्यंत उत्साहात साजरे करण्यात आले. मोठ्या व्यावसायिकांसोबतच लहान व्यापारी तसेच कुंभार, कारागीर आणि दिवाळीचे साहित्य तयार करणाऱ्यांनीही मोठ्या प्रमाणात विक्री केली. दिवाळीत झालेल्या उलाढालीमुळे लहान व्यापाऱ्यांना मोठा फायदा झाला. खाद्य व किराणा, दागिने, गारमेंट्स, सुकामेवा, मिठाई, घर सजवण्याच्या वस्तू, कॉस्मेटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स साहित्य, मोबाईल, पूजा सामग्री, भांडे, भेटवस्तू, फर्निचर या वस्तूंची चांगली खरेदी झाली. दरवर्षीच्या दिवाळीप्रमाणे यंदाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'व्होकल फॉर लोकल' अभियानांतर्गत केलेल्या आवाहनामुळे भारतीय बनावटीच्या साहित्याची खरेदी मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून आले. गेल्या काही वर्षांपासून नागरिकांनी चिनी वस्तूंना नकार देत भारतात तयार होणाऱ्या वस्तूंना प्राथमिकता दिली. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह वाढला. छोट्या व्यापाऱ्यांसाठी दिवाळीतली मिळकत वर्षभराची पुंजी असते. दिवाळीच्या खरेदीची आकडेवारी पाहिली तर देशातील नागरिकांच्या क्रयशक्तीत वाढ झाल्याचे स्पष्ट होते. प्रत्येकाच्या दरडोई उत्पन्नातही वाढ झाल्याचे यावरून दिसते.

दिवाळी आटोपली. आता लग्नसराईचे वेध लागले आहे. तुळशी विवाहानंतर लग्नाचा धडाका सुरू होणार आहे. व्यावसायिकांच्या नजरा आता त्याकडे लागल्या आहेत. विवाह मुहूर्ताच्या ६० दिवसांत म्हणजे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये ४८ लाख विवाह होतील आणि त्यामुळे सहा लाख कोटी रुपयांचा व्यवसाय होईल, असा अंदाज कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सने (कॅट) व्यक्त केला आहे. यावर्षी विवाहासाठी १८ शुभमुहूर्त आहेत. प्रबोधिनी एकादशी १२ नोव्हेंबरला आहे. त्यानंतर विवाह सुरू होतील. पुढे १६ डिसेंबरपर्यंत विवाह होतील. अंदाजे ४८ लाख विवाह होणे अपेक्षित आहे. वस्तू आणि सेवा या दोन्हीचा समावेश असलेल्या किरकोळ क्षेत्रात सुमारे सहा लाख कोटींची उलाढाल अपेक्षित आहे. गेल्या वर्षी या हंगामात ३५ लाख विवाहांमधून एकूण ४.२५ लाख कोटींचा व्यवसाय झाला होता. यंदा शुभमुहूर्तांच्या तारखांमध्ये वाढ झाल्यामुळे व्यवसायात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. २०२३ मध्ये ११ शुभमुहूर्त होते तर यंदा १८ मुहूर्त असल्याने व्यवसायाला आणखी चालना मिळणार आहे. त्यातही ग्राहक आता परदेशी वस्तूंपेक्षा भारतीय वस्तूंच्या खरेदीला अधिक प्राधान्य देत आहे. लग्नाच्या खर्चाचा तपशील देताना कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया यांनी कोणत्या लग्नावर किती लाख खर्च होतील, याची यादीच दिली आहे. लग्न खरेदीतून आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात होते. अनेकांना त्यातून रोजगार मिळत असल्याने अर्थव्यवस्था गतिमान होते. बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण राहते. प्राप्त होणाऱ्या पैशातून व्यवसायाच्या व रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत मिळते. सण भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, तो आणखी मजबूत व्हावा, ही अपेक्षा आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# भारतीय संस्कारातच खरा आणि सुदृढ भारत!

**प्रा. दिलीप जोशी**

हिंदू संस्कृती संस्कारावर आधारित संस्कृती आहे. गर्भाधानापासून अन्त्यविधीपर्यंत आपण संस्कारच म्हणतो. या संस्कारातून समाजस्वास्थ्य सुदृढ असायचे. आपण एकमेकांच्या सुख-दुःखात सहभाग असायचो. इतरांच्या सुखाने आपल्याला आनंद व्हायचा आणि दुःखाने मन विषण्ण होत असे. शेजार हा धर्म होता. आपल्या घरी विशेष पदार्थ बनला की, शेजारी मुद्दाम भांड्यात घालून पाठवून दिला जायचा. घरातले पीठ संपले की शेजारी पेलाभर मागितले जायचे आणि दळून आणले की आठवणीने परत दिले जायचे. घरातले कोरड्यास म्हणजे घट्ट-वरण किंवा भाजी संपली तर लगेच शेजारच्या काकूकडे वाटी घेऊन जायचे आणि कोरड्यास आणायचे. अचानक पाहुणे आल्यास कपभर दुधाची देवाणघेवाण हमखास असे. इतकेच काय, चहापत्ती-साखर सोबतच आगपेटीच्या काड्यांचीही आदानप्रदान असे. खलबत्ता, कुरडयासाठीचा सोऱ्या, एखादा स्टुल, शिडी, रंग देण्याचा ब्रश अख्ख्या वेटाळात फिरायचा. वर्तमानपत्र गल्लीत एखाद्याच्याच घरी असायचे. तेच वृत्तपत्र मोहल्ल्यात फिरायचे. बऱ्याचदा तर मूळ मालकाकडे ते परततदेखील नसे. सत्यनारायणासाठी चौरंग, प्रवासासाठी सुटकेस, पाच मिनिटांसाठी सायकल, पाव्हणे आल्यावर चहाचे कप, इस्त्री, सतरंजी यांचेही आदानप्रदान निर्भेळ अंतःकरणाने होत असे. थोडीफार कुरकुर असायची, पण वेळ धकविल्या जायची. अहंभाव, अभिमान, गर्व यांना स्थान जवळजवळ नव्हतेच. एकमेकांना मागण्यात कमीपणा वाटत नसे. वाटून खाण्याची वृत्ती म्हणजे एखाद्याच्या घरी गाई-म्हशी व्याल्या तर खरवस सर्व घरी आठवणीने दिला जायचा. ताक सर्वांना मोफत वाटले जायचे किंवा निःसंकोच मागितले जायचे. ताकाला जाऊन भांडे लपवण्याचा प्रकार असेही पण क्वचितच. ही आत्मीयता भारतीय संस्कारामुळे असायची. भुलाबाईची गाणी एकमेकांच्या घरी जाऊन म्हणायची. गणपतीची आरती टोळीने जाऊन म्हणायची. एकत्रित कोजागरी, सामूहिक भजन, महिलांचा धावा, सप्ताह, पंगत यातूनही भारतीय संस्कार आणि सामाजिक स्वास्थ्य निर्माण होत असे.

भारतातून हा भारतीय संस्कार संपला आणि आपण स्व-अर्थी आणि स्व-केंद्रित झालो. शुद्ध अंतःकरणात 'इगो' अहंभाव शिरला. मी आणि माझे हा बद्ध विचार मेंदूत मोठा झाला. हृदय आणि मेंदू म्हणजे मन आणि बुद्धी गौण झाली. पोट आणि पोटाखालचा भाग याचाच विचार सर्वांमध्ये मातला. विवेकाची जागा अविचाराने घेतली. मोठ्यांचा सन्मान नाही, विनम्रता जीवनातून हद्दपार झाली. स्वैराचार बोकाळला. मोठ्यांना नमस्कार करावा लागतो, हे तर नवीन पिढी जवळ जवळ विसरली. मर्यादा पाळणे तर माहीतच नाही. सर्वजण बंदद्वार बसू लागले. एकमेकांच्या घरी जाणे, अडचणीत मदत मागणे कमीपणा आणि मदत देणे म्हणजे झंझट वाटायला लागली. महिला मंडळी आठवड्याला भाजी बाजारात एकत्रित जायच्या, साडी खरेदीसाठी एकमेकांसोबत जायच्या, वटसावित्रीला जत्थ्याने जाणे असायचे, मरणधरणात चहा-बेसन-पोळी अख्ख्या वेटाळातून यायचे. या सर्व बाबी जवळ जवळ संपल्या.

भारतीय संस्कार आपण सोडले. इंग्रजाळलेपणा अंगीकारला आणि आपले हृदय पाषाण आणि मेंदू बोथट झाला. त्यामुळे नको त्या गोष्टीत वाहावत जाणे राजमान्य होऊ लागले. खरं म्हणजे लग्न हा संस्कार होता, पण त्याचे महत्त्वच कमी झाले. मुलामुलींनी प्रेमविवाह केल्यास मायबापांना हायसे वाटते. 'सुटलो बुआ' म्हणून सुटकेचा निःश्वास घेणारेही आहेत. लग्नात दोन घरांचा परिचय, त्यानंतर मुलगा-मुलगी एकमेकांना बघत असत. पसंतीनंतर साखरपुडा, त्यानंतर लग्न. लग्न ठरल्यावरही मर्यादा असायच्या. त्याची जागा पूर्ण व्यापून टाकली ती विवाहपूर्व छायाचित्रणाने. 'प्री-वेडिंग शूट' हा प्रकार सर्वात घातक. या छायाचित्रणानंतर कित्येक लग्न मोडलीत. हा बीभत्स प्रकार केवळ संस्काराच्या अभावाने होतो. लग्नात मंगलाष्टकानंतर वर-वधूंना वर उचलून घ्यायचे, हार घालण्यात अडथळा आणायचा हे सर्व कर्मदरिद्री लक्षण. वाढदिवसाला जीव गुदमरेल इतका केक फासायचा तोंडाला. यात अनेकांचे जीव गेलेत. कसला हा राक्षसी प्रकार. कपल चॅलेंज, बाप-मुलगी चॅलेंज अशा नावावर विनाकारण फोटो टाकायचे आणि त्यातून निर्माण होतात भयानक प्रसंग. भ्रमणध्वनी तर सर्वव्यापी झाला आणि सर्व समस्यांचे मूळही तोच झाला. 'जीवीचा जिव्हाळा' कमजोर करण्यात भ्रमणध्वनीचा मोठा हात आहे. फेसबुकवर मित्र हजारो आहेत, पण हृदयाचे नाते म्हणाल तर शून्य. भारतीय समाजरचना भारतीय संस्कारावर आधारित होती. सामाजिक सौहार्द, एकोपा आणि आनंदी समाज अशा छोट्या छोट्या गोष्टीतून भारत एकसंध उभा असतो. स्वार्थी आणि बरबटलेल्या वातावरणात देव-देश-धर्म मूर्खपणा वाटू लागला. अशा चिंताजनक आणि भयावह स्थितीत बदल फक्त भारतीय संस्कारच घडवू शकतात. भारतीय संस्कारच भारतीयत्व टिकवू शकतात. भारतीयत्व जेव्हा मनामनांत रुजेल तेव्हाच भारतीय समाजाचे स्वास्थ्यही सुदृढ राहील. भारतीय संस्कार देशाला पुढे नेणारे आहेत. उपभोग आणि ऐहिक सुखासाठी वाटेल ते करणाऱ्या पिढीला लगाम घालण्यासाठी भारतीयत्वाचे संस्कार महत्त्वाचे आहेत. प्रत्येकाला जाती-पातीचा अभिमान आणि आपली जातपातच आपला परिचय वाटतो. किराणा दुकानात तेल, तिखट, मीठ असे पदार्थ असतात. नाव किराणा दुकान, पण त्या दुकानात किराणा नावाची गोष्टच नसते तसेच इथे प्रत्येक माणूस जातीपातीत वाटल्या गेल्यामुळे देशाचे नाव भारत पण इथे भारतीय कोणीच नाही. अशी अवस्था टाळायची असेल तर भारतीयत्वासाठी भारतीय संस्कार महत्त्वाचे. भारतीय संस्कार पुन्हा रुजविणे म्हणजे मागे जाणे नसून उज्ज्वल भारतासाठीचा सर्वोत्तम उपाय आहे. याच संस्कारातून कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, पर्यावरण त्यामुळे भारत समृद्ध बनेल म्हणूनच भारतीय संस्कारातूनच खरा भारत घडेल, हा विश्वास.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे


### नशिबाचा शिल्पकार

आपले आयुष्य आपणच घडवायचे असते. दुसऱ्यावर अवलंबून राहिल्याने किंवा दुसऱ्याचा हेवा केल्याने आपले नशीब घडत नसते. आपणच आपल्या आयुष्याचे शिल्पकार असतो हे कदापि विसरता कामा नये. आपल्या सुख व दुःखाचा कर्ता हा व्यक्ती स्वतःच असतो. दुसऱ्यांना दोष देण्यात अर्थ नसतो. व्यक्तीचे सौख्य हे त्याच्या विचारशैलीवर अवलंबून असते. जसा विचार, तसाच आचार व तसाच संचार असतो. आपल्या भाग्याचे विधाते आपण स्वतःच असतो. व्यक्ती मनावर कोणताही अशुद्ध संस्कार होऊ नये. अशुद्ध संस्कार हे जीवनाला वाईट मार्गाकडे नेतात तर सुसंस्कार हे विधायक व रचनात्मक मार्गाकडे नेतात. यासाठी सदैव विधायक, रचनात्मक व शुद्ध विचार करावा. व्यापक दृष्टिकोन ठेवावा, सर्वांचे हित चिंतावे. थोडक्यात स्वतः बदलून जावे म्हणजे जग आपोआप बदलेल.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### डॉक्टर-रुग्ण संवाद आवश्यक

डॉक्टर, रुग्ण आणि रुग्णाचे नातेवाईक यांच्यातील वाढता विसंवाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. डॉक्टरांविरुद्धच्या बोगस खटल्यांमध्ये वाढ होत आहे. अशा खटल्यांमागे पैसे उकळण्याचा उद्देश असतो. डॉक्टरांना संरक्षणाची गरज



न्यायालयाने प्रतिपादित केली. न्यायालयाने एका गंभीर प्रश्नाला हात घातला आहे. त्यात न्यायालयाला नक्कीच तथ्य आढळले असण्याची शक्यता राहू शकते. म्हणूनच कदाचित त्यांनी संरक्षणाची बाबही समाज आणि सरकारच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. खोटी कारणे पुढे करून केली जाणारी फसवणूक दंडनीयच आहे. डॉक्टर आणि रुग्ण सामाजिक आरोग्याचे दोन प्रमुख खांब मानले जातात. त्यांच्याबाबतीत असे प्रकार उघडकीस येणे ही अतिगंभीर आणि चिंताजनक बाब आहे. त्याची दखल तातडीने घेण्याची गरज आहे. ते करताना समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न संबंधित जाणत्यांना सर्वांकडून अपेक्षित आहे. या दोन घटकांतील बहुसंख्य समस्यांचे डॉक्टर-रुग्ण आणि रुग्णाचे नातेवाईक यांच्यातील वाढता बेबनाव हे प्रमुख कारण आहे. जो मानसिक आरोग्याचा पाया मानला जातो. संवाद निर्माण आणि बळकट झाला तर अनेक समस्या कदाचित निर्माण होणार नाहीत. रुग्णाचा अचानक मृत्यू झाल्यास जमाव आक्रमक होतो. दुर्लक्ष केल्याचा आरोप डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांवर केला जातो. प्रसंगी मारहाण आणि तोडफोडी होताना आढळते. असे झाले की संबंधित दोन्ही घटक परस्पर आरोप आणि खुलासे करताना आढळतात. दोन्ही घटकांमध्ये सामंजस्य अपेक्षित आहे. डॉक्टर जीवनदाते असले तरी ते परमेश्वर नाहीत. अनेकदा रुग्णाला अत्यवस्थ अवस्थेत आणले जाऊ शकतात, हे रुग्णाच्या नातेवाईकांनी लक्षात घेण्याची गरज आहे. डॉक्टरांनी वेळ काढून रुग्णाच्या नातेवाईकांशी संवाद राखणे आवश्यक आहे. या विषयावर माध्यमात अनेक तज्ज्ञ काही सूचना सुचवतात. त्यांची दखलदेखील सरकारने तातडीने घ्यायला पाहिजे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### अन् रोही काळ बनून आला!

२५ ऑक्टोबर २०२४ ची घटना. एक मध्यमवयीन मनुष्य (वय वर्षे ५५) मोटारसायकलने अंजनगावहून दर्यापूरकडे येत असताना लेहगाव (रेल्वे) ते इटकीदरम्यान दुपारी साडेचार ते पाचच्यादरम्यान बाजूच्या शेतामधून रोही हा वन्यप्राणी गाडीवर धडकला. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, त्या प्राण्याची धडक इतकी जबर होती की, ते जागेवरच आडवेतिडवे गाडीसह पडले व बेशुद्ध झाले. त्यांना दर्यापूरच्या ग्रामीण रुग्णालयात भरती केले; तेथेच ते गतप्राण झाले. ही दगावणारी व्यक्ती म्हणजे माझे साडभाऊ रवींद्र रमेश देशपांडे (अकोला) होते. ही बातमी ऐकून मन हेलावले. आता प्रश्न येतो की, यामध्ये दोष कोणाला द्यायचा? नाईलाजाने अंगुलिनिर्देश वन खात्याकडे जातो. या रोही प्राण्यांच्या धडकेने कितीतरी अपघात झाल्याचे आपण नेहमीच वाचतो. लोक बातम्या वाचतात आणि तेथेच सोडून देतात. आज जेव्हा माझ्या जवळच्या व्यक्तीचा असा अपघात झाला तेव्हा कळले की, तो अपघात किती भयानक होता. वन खात्याला कळकळीची विनंती आहे की, त्यांनी या व्यक्तीच्या कुटुंबीयांना म्हणजेच त्या व्यक्तीची पत्नी, मुलगी व वृद्ध आई यांना त्वरित नुकसान भरपाई द्यावी. तसेच यापुढे अशा दुर्घटना होणार नाही याची खबरदारी घ्यावी. अशा दुर्घटना टाळण्यासाठी वन खात्यांनी अशा रस्त्यांवर जागोजागी 'वन्य प्राण्यांपासून सावधान' असे सचित्र फलक लावावेत. वाहनांच्या वेग मर्यादेचे फलक लावावेत तसेच जागोजागी सायरन व गार्डची (रक्षक) व्यवस्था करावी. रस्त्याच्या दुतर्फा जाळीचे कम्पाऊंड करावे. जेणेकरून भरल्या संसारातून कोणी इतक्या तडकाफडकी जाणार नाही.

**प्रशांत राजहंस हनवाडीकर**/९५६१६९०३५९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# हातभट्टीची वाहतूक पकडली

## पावणे तेरा लाखांचा मुद्देमाल जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने हातभट्टी दारू तयार करणाऱ्या तसेच हातभट्टी दारूची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करीत १२ लाख ७७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सोलापूर शहराजवळ असलेल्या घोडा तांडा. भोजाप्पा तांडा याठिकाणी असलेल्या



हातभट्टी दारू तयार करणाऱ्या ठिकाणांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई करीत ५३०० लिटर गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट करून ७०० लिटर तयार हातभट्टी जप्त केली. तसेच हातभट्टी दारूची वाहतूक करणारी दोन वाहनेदेखील जप्त करण्यात आली. या कारवाईत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने १२ लाख ७७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत सहा गुन्हे नोंदविण्यात आले असून तीन आरोपींना पकडण्यात येऊन तीन आरोपी फरार आहेत.

ही कारवाई अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस आर पाटील, निरीक्षक आर एम चवरे, जे एन पाटील, ए व्ही घाटगे, दुय्यम निरीक्षक आर एम कोलते, धनाजी पोवार, सम ाधान शेळके, सुखदेव सिद, अंजली सरवदे, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, जवान अनिल पांढरे, आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगम पूरे, वसंत राठोड, चेतन व्हनगुंटी, इस्माईल गोडीकट, विनायक काळे, रशीद शेख, दीपक वाघमारे यांनी केली.

# चारचाकीच्या धडकेने दुचाकीवरील एक ठार

## कुंभारीजवळील अपघात

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

सोलापूर ते अक्कलकोट रोडवरील कुंभारी येथे भरधाव जाणाऱ्या चारचाकी वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीवरील एक जण गंभीर जखमी होऊन मरण पावला. तर अन्य एकजण गंभीर जखमी झाला. हा अपघात मंगळवारी दुपारी दीडच्या सुमारास झाला.

राकेश भारत रणदिवे (वय ३६, रा. गंज पेठ, पुणे) असे मरण पावलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. तर शंभूराज प्रभाकर गायकवाड (रा. बुधवार पेठ, सोलापूर) असे जखमीचे नाव असून त्याच्यावर कुंभारीच्या अश्विनी हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु आहेत.मंगळवारी दुपारी एकच्या सुमारास राकेश रणदिवे व शंभूराज गायकवाड हे दोघे दुचाकीवरून अक्कलकोटकडे देवदर्शनासाठी जात होते. कुंभारीजवळ एका अनोळखी चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीस पाठीमागून जोरदार धडक दिली. यामध्ये दुचाकीवरील राकेश रणदिवे हा गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावला. याची नोंद वळसंग पोलिस ठाण्यात झाली असून हवालदार एस व्ही कुंवर तपास करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### पावणे चार लाखांचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

शहरातील एस टी स्टॅन्डवर एस टी बसमध्ये चढणाऱ्या दोन म हिलांच्या पर्समधील ३ लाख ७५ हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरट्यांनी लंपास केले. ही घटना सोमवारी दुपारी घडली असून याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आसमा आयाज पठाण (वय २४, रा. कणगरा टाकळी, मन्सुरिया मशिदजवळ, धाराशिव) या महिलेच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिवाळीचा सण असल्यामुळे एस टी स्टॅन्डवर प्रवाशांची मोठी गर्दी आहे. सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास आसमा पठाण व दिपाली सतिश मोकाशी या दोघी सोलापूर एस टी स्टॅन्ड येथे सोलापूर ते मंगळवेढा जाणाऱ्या एस टी बसमध्ये चढत होत्या. यावेळी असलेल्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने आसमा पठाण व दिपाली मोकाशी यांच्या पर्समधील सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. यामध्ये आसमा पठाण यांच्या १२ ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस, १० ग्रॅमचे मंगळसूत्र, ६ ग्रॅमचे कानातील टॉप्स, १० ग्रॅमचे सोन्याचे गलसर, २५ तोळे चांदीचे पैंजण असा १ लाख ४३ हजार रुपये किंमतीच्या दागिन्यांचा समावेश आहे. तर ३३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे साखळीचे गंठण, १० ग्रॅमचे मंगळसूत्र, ९ ग्रॅमची सोन्याच्या बदामासह चैन, ५ ग्रॅमची सोन्याची चैन, ४ ग्रॅमची चैन, ५ ग्रॅमची अंगठी, अडीच ग्रॅमची अंगठी, १ ग्रॅमची अंगठी, ३ तोळ्याचे चांदीचे पैंजण असा २ लाख ३२ हजार २०० रुपये किंमतीचे सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा समावेश आहे. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे पुढील तपास करीत आहेत.

## निधन वार्ता

### मधुसूदन व्हटकर



**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

जनता बँकेचे माजी संचालक, अध्यक्ष मधुसूदन (अण्णा) व्हटकर (वय ७६) यांचे अल्प आजाराने इस्लामपूर येथे निधन झाले. त्यांच्या पश्च्यात एक मुलगा व दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. त्याची अंत्ययात्रा बुधवारी (दि. ६) त्यांच्या निवासस्थानापासून सकाळी १० वाजता निघून रुपाभवानी येथील स्मशानभूमीत अंत्यविधी होणार आहेत.

### डॉ. आर. बी. सिंह



**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

राज्यातील महाविद्यालयीन व विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे नेते डॉ. आर. बी. सिंह (वय ७५) यांचे कल्याण येथे मंगळवारी (दि.५) पहाटे २च्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, एक मुलगा, २ मुली, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर कल्याण येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस तर अखिल भारतीय महाविद्यालय व विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे ते अध्यक्ष होते.

### उमेश सावंत



**पिलीव, दि. ५ नोव्हेंबर-**

कोळेगांव (ता. माळशिरस) येथील उमेश आनंदराव सावंत (वय ५२ ) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन भाऊ, भावजय असा परिवार आहे.

### नागमणी म्हेत्रे



**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

महावीर चौक, लष्कर येथील रहिवासी नागमणी अरुण म्हेत्रे यांचे मंगळवारी अकस्मात निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा बुधवार, दि. ६ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वा राहत्या घरातून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा सून आणि नातू असा परिवार आहे.

# हनी ट्रॅपमध्ये बँक कर्मचाऱ्याला अडकविण्याचा प्रकार उघड

## बँक कर्मचाऱ्याला खंडणी मागणाऱ्या पती-पत्नीविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

शहरातील एका बँकेतील कर्मचाऱ्यास हनी ट्रॅपमध्ये अडकावून त्याच्याकडून २ लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या पती-पत्नीविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आकाश सुभाष गायकवाड (वय ३०, रा. काटी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सोनाली अभिजित राजकर आणि अभिजित राजकर (दोघे रो. विजापूर रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आकाश गायकवाड हे सोलापुरातील एका बँकेत कर्मचारी आहेत. १५ ऑक्टोबर रोजी सोनाली राजकर ही महिला गायकवाड यांच्या बँकेत गेली व तिने गायकवाड यांना बँकेत खाते उघडायचे आहे असे सांगून गायकवाड यांच्याबरोबर ओळख करून घेतली. यावेळी गायकवाड व राजकर या दोघांनी एकमेकांना मोबाईल नंबर दिले. त्यानंतर दोघांनी वॉटसअॅपवर एकमेकांशी चॅटींग करण्यास सुरुवात केली. यावेळी चॅटींगच्या ओघात गायकवाड



यांनी पाठविलेल्या मेसेजचा फायदा घेत राजकर दाम्पंत्याने गायकवाड यांना ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली.

हा प्रकार मिटविण्यासाठी राजकर दाम्पंत्याने गायकवाड यांना एका हॉटेलमध्ये बोलावून त्यांच्याकडे १० लाख रुपयांची मागणी केली. तडजोडीअंती २ लाख रुपयांची मागणी करून पैसे नाही दिले तर तुला जेलची हवा खायला पाठवतो अशी धमकी देऊन दमदाटी केली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आला असून सहायक पोलिस निरीक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.

### प्रा. तुकाराम सरडे यांचे निधन

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

येथील ज्येष्ठ पत्रकार तथा, साप्ताहिक सूर्यपुत्रचे संस्थापक-संपादक आणि धरणग्रस्त संघटनेचे ज्येष्ठ नेते प्रा. तुकाराम मारुती सरडे (वय ८७ ) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचे परिवारांसह नातेवाईक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांचे पश्चात पत्नी, मुलगा, सुना, मुली, जावई, नातवंडे, नातसुना व परतुंडे असा परिवार आहे.





### जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः जि. सोलापुर तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि.व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु.पल. हद्दीतील जुना गट नं. ८४१/२ त्याचा नवीन गट नं. ८४७/२ यापैकी प्लॉट नं. याचे क्षेत्र १४४.०० चौ. मी. यासी चतुः सिमा पुर्वेस - २५ फुटी रोड, दक्षिणेस प्लॉट नं. २. पश्चिमेस गट नं. ८४२. उत्तरेस तुकाराम गोंदील येणे प्रमाणे चतुः सिमा पुर्वक मिळकत आतील तदंगभुत वस्तुहक्कासह याचे पाणी व वागणुक पुर्वबाजुने जाते व आहे वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह श्री उदय जंयत कुलकर्णी यांचे मालकी कब्जे वहीवाटीची आहे त्यांनी त्यांचे घरबांधकामासाठी व इन्शुरन्स प्रीमीयरसाठी कर्ज आमचे अशिल सागंली अर्बन को-ऑप. बँक लि. सागंली, शाखा बार्शी या बँकेकडे मागणी केली आहे व त्यानंतर रक्कम रुपये १६,१५,०००/- (सोळा लाख पंधरा हजार मात्र) चे कर्ज मंजुर झाले आहे. वर नमुद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकत ही कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे.

सबब वर नमुद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, साठेखत खरेदीखत कर्जबोजाचे, बक्षिस वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन (८) आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेद निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणचीही तक्रार चालणार नाही, कोणचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली आहे ता. ०१/११/२०२४

सही/-
**अॅड. श्री. प्रसाद जा. कुलकर्णी**
**सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी**
**बी.एस.एल.एलएल.बी**
**अॅडव्होकेट, बार्शी**
**मो. ९४२३३३२०४८**

### भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३चे कलम ११ (१) नुसार अधिसुचना

उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ११, सोलापूर
क्र.२०२४/उमुर्स/११/कावि-३/आरआर/ ८९
दिनांक १८/१०/२०२४

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाची अधिसूचनाक्र, मिस-११/२०१४/ सी.आर.७७ (पार्ट-२) / ए-२ दि.११ सप्टेंबर, २०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भूमी संपादन पुनर्वसन व पुनस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा वापर करुन असेल अधिसूचीत केले आहे की सदर अधिनियमाच्या कलम ३(झ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादना बाबत १०.००० हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत भूसंपादना संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी. समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल,

त्याअर्थी, सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन आहे. त्याअर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजना बाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्याअर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्याअर्थी, परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आघात निर्धारणा बाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्याअर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्याअर्थी, सदर कायदद्याच्या कलम ११ उपकलम ४ अन्वये असे जाहिर करण्यात येते की. सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणतीही व्यक्ती, प्राथमिक अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार हस्तांतर करणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही,

परंतु जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमिन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतूदीचे जाणीव पूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकलम ५ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २००४ चे कलम ५० उपकलम ३ अन्वय जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

आणि ज्याअर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन असल्याने सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ११. सोलापूर यांना जिल्हाधिकारी यांचे वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

**परिशिष्ट १**
**जमिनीचे वर्णन**

| अ. क्र. | गावाचे नांव | तालुका | गट नंबर | क्षेत्र | भूसंपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | हुलगेवाडी | करमाळा | ७१ | ४५२०० चौ.मी. | कुकडी प्रकल्पाच्या डावा कालव्यावरील पोंधवडी शाखा कालवा कि.मी. ६ ते ८ करिता |

**परिशिष्ट २**

**प्रकल्पाचे नावः-** कुकडी प्रकल्पाच्या डावा कालव्यावरील पोंधवडी शाखा कालवा कि.मी. ६ ते ८ करिता
**प्रकल्पाचे विवरणः-** कुकडी प्रकल्पाच्या डावा कालव्यावरील पोंधवडी शाखा कालवा कि.मी. ६ ते ८ करिता
**सामाजिक फायदे** :-जलसिंचन (सामाजिक, आर्थिक व इतर फायदे)

**परिशिष्ट ३**
**पुनर्वसन विषयक बाबींचे विवरण**

गावाचे नाव : हुलगेवाडी तालुकाः-करमाळा जि. सोलापूर

| अ. क्र. | स. नं. गट नं. | क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| | लागू नाही | |

**परिशिष्ट-४**
**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा**

भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १० (क) अन्वये महाराष्ट्र शासन व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दि. १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्या पासून सूट देण्यात आली आहे.

**परिशिष्ट ५**
**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

१) **प्रशासकाचे पदनाम** : लागू नाही
२) **प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता** : लागू नाही
३) **ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमूद करावे**:-लागू नाही

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम १ खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ११. सोलापूर यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

सही/-
**(प्रमोद गायकवाड)**
**सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,**
**भूसंपादन क्रमांक ११, सोलापूर**

**स्थळ - सोलापूर**
**दिनांक - १८/१०/२०२४**



### पांडुरंग भगत



**नातेपुते, दि. ५ नोव्हेंबर-**

पांडुरंग शंकर भगत (वय ७९) यांचे सोमवारी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ५ पुतणे, २ विवाहित मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नातेपुते येथील श्रीराम, श्रीकृष्ण व गणेश मनोहर भगत महाराज यांचे चुलते होत.

### सुमन वैद्य



**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

श्रीराम नगर शाहीर वस्ती येथील नामदेव शिंपी सम ाजाच्या सुमन (लक्ष्मीबाई) मोतीलाल वैद्य यांचे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. समाजसेवक व स्वामीभक्त अनंतमाऊली वैद्य यांच्या त्या मातोश्री होत.


Classifieds

**नोकरीविषयक**

**सुदत्त नर्सिंग होम,**
**गांधी नगर चौक**
**सोलापूर ४१३००३**
**भरती करणे आहे.**
**ANM आणि GNM**
**स्टाफ नर्स**
**भेटण्याची वेळः- दु. ३ ते ४**
**फोन नेः (०२१७)२३१२६६५**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील उत्तर कसबा येथील मिळकत यासी सि.स.नं. १८२८ याचे क्षेत्र ९३.०० चौ.मी. पैकी माझ्या मालकीची १/६ अविभक्त हिस्साची मिळकत म्हणजेच १५.५ चौ.मी. यासी संपूर्ण मिळकतीचे चतुः सिमा पूर्वेस- सि.स.नं. १८२८ बी व १८२९ सी, दक्षिणेस रस्ता, पश्चिमेस सि.स.नं. १७८४ बी व १८३२ व उत्तरेस टी.पी. सि.स.नं. १९६.

येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही शिवकुमार चंद्रशेखर आळंद यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदरहु मालकांनी सदरहु मिळकत विक्रीस काढली असता, आमचे अशिलांनी चालू बाजार भावाप्रमाणे मागणी केली असता, सदरहु मिळकत ही आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून, आमचे अशिलांकडून इसारा दाखल रक्कम स्विकारुन रितसर आमचे अशिलांच्या नांवे दि. ०५/११/२०२४ रोजी इसारा पावती लिहुन दिलेली आहे.

तरी परंतु मिळकतीवर अन्य कोणाचा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री व इतर स्वरुपाचे करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत आपले हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर आणून देऊन खात्री करुन द्यावी. जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरील मिळकत ही निर्वेधं व निजोखमी आहेत असे समजून आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली ता. ०५/११/२०२४.

सही/-
**अॅड. रेशमे एस. आर.**
**१०४१/ब, उत्तर कसबा, सोलापूर**
**मो. नं. ९४२३३३२४६२**
**अशिलातर्फे अॅडव्होकेट**

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate** : **Sambhaji Diliprao Patil Nilangekar**
**Old Balaji Temple, Aurad (Shah.) Tahsil Nilanga. Dist. Latur**

**Name of political party** : **Bharatiya Janata Party**

**Name of Election** : **Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of Constituency** : **238-Nilanga**

**I Sambhaji Diliprao Patil Nilangekar,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | J.M.F.C. Court, Nilanga | S.C.C. No. 119/2022 | Pending For Recording Plea | I.P.C. u/s 188 & u/s 135 of Maharashtra Police Act. |
| 2. | District Judge 1st & Session Court At Latur | SPL. Case 12/2015 | For Framing of Charge | u/s 120 (B), 420, 467, 468, 471 & u/s 13 (2) R.W. 13 (1)(D) Prevention of Corruption Act. |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |
| 2. | Nil | Nil | Nil |
| 3. | Nil | Nil | Nil |

**(Sambhaji Diliprao Patil Nilangekar)**

## इति-उवाच...



विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्रात काय होईल, हे सांगता येत नाही. महाराष्ट्रात सध्या वेगळेच काहीतरी सुरू आहे. नवाब मलिक यांनी भविष्य सांगू नये, त्यांचा व्यवसाय पोपटाचा नाही.

**आशिष शेलार,** भाजपा नेते



सरवणकर समोर असते-नसते, तरी मी निवडणूक माझ्या पद्धतीनेच लढवली असती. मी प्रामाणिकपणे निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहे. मला मतदान करायचे की नाही हे लोकांच्या हातात आहे, तर जिंकणार की नाही, हे देवाच्या हातात आहे.

**अमित ठाकरे,** मनसे नेता



राज ठाकरे आता देवेंद्र फडणवीस, अमित शाह आणि नरेंद्र मोदी यांना आपले नेते मानतात. त्यांनीच ही बाळासाहेब ठाकरेंची प्रॉपर्टी बेकायदेशीरपणे एकनाथ शिंदे यांना दिली आहे. राज ठाकरे यांना बाळासाहेब ठाकरे कधीही माफ करणार नाहीत.

**संजय राऊत,** उबाठा खासदार



लोकसभेत भुजबळ सांगत होते, माझी उमेदवारी केंद्रातून जाहीर झाली आणि आता ते रणांगण सोडून पळून गेले. शिवसैनिक पळून गेले नाही. लोकसभेत आपल्यासोबत राहिले आणि हातावर लिहिले ३ 'वाजे' ला मतदान करा आणि माझ्या पाठीत खंजीर खुपसला.

**हेमंत गोडसे,** शिवसेना नेता

# सयाजी शिंदेंनंतर आता भाऊ कदम करणार घड्याळाचा प्रचार

◆ **मुंबई, ५ नोव्हेंबर**

ज्येष्ठ अभिनेते संयाजी शिंदे यांच्यानंतर आता प्रसिद्ध विनोदी अभिनेता भाऊ कदम राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार करताना दिसणार आहे.

संयाजी शिंदे यांनी काही दिवसांपूर्वीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यानंतर त्यांच्यावर पक्षाचे स्टार प्रचारक म्हणून जबाबदारी देण्यात आली. अशातच 'चला हवा येऊ द्या' या विनोदी मालिकेतून घराघरात पोहोचलेला विनोदी अभिनेता भाऊ कदम देखील राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार करणार आहे. लोकांना खळखळवून हसवण्यात भाऊ कदम तरबेज आहेत. त्यामुळे त्याला प्रचार रॅलीत सहभागी करून लोकांपर्यंत पोहोचण्याचा अजित पवारांचा प्रयत्न आहे. याशिवाय, अर्थसंकल्पात अजित पवार यांनी लाडकी बहीण योजना आणली. ही योजना महिलांपर्यंत पोहोचली आहे. मात्र, आता विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर लाडकी बहीण योजनेसह विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभरात भाऊ कदम यांच्या प्रचार रॅलीचे आयोजन केले जाणार आहे.

(तभा वृत्तसेवा)



### गोविंदाही शिवसेनेचा स्टार प्रचारक

निवडणुकीची घोषणा होण्याआधीच प्रख्यात अभिनेता तसेच माजी खासदार गोविंदाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर शिवसेनेच्या स्टार प्रचारकाऱ्च्या यादीत गोविंदाच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे. आता गोविंदा शिवसेना उमेदवारांचा प्रचार करणार आहे. त्यामुळे मनोरंजन विश्वासतील तारे-तारका निवडणुकीच्या प्रचारात ग्लॅमरचा तडका देताना दिसणार आहेत.



# 'करून करून भागले, देवपूजेला लागले'

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर**

महाराष्ट्राच्या राजकारणातील दिग्गज नेते राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राजकारण संन्यासाचे संकेत दिले आहे. पवार खरोखरच राजकीय संन्यास घेणार की नेहमीप्रमाणे त्यांची ही घोषणा मतदारांना कात्रजचा घाट दाखवणार, हे लवकरच समजणार आहे.



आतापर्यंत १४ वेळा निवडणुका लढवल्या आणि जिंकल्या, आणखी किती निवडणुका लढवायच्या, कधी तरी तर थांबावेच लागेल, असे पवार म्हणाले. विशेष म्हणजे, वयाच्या ८४ व्या वर्षी सत्तेची सर्व पदे उपभोगून पवारांनी तरुणांना संधी देण्यासाठी राजकारण संन्यासाची घोषणा केली नाही, तर फक्त संकेत दिला. 'करून करून भागले आणि देवपूजेला लागले', असे पवारांच्या या निर्णयाचे वर्णन करता येईल.



### शरद पवारांच्या संन्यासाची कथा

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुरू झाला असताना शरद पवार यांनी ही घोषणा करून निवडणुकीला भावनात्मक वळण देण्याचा प्रयत्न केला, असे म्हणायला हरकत नाही. पवारांनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात आलेले अनेक नेते काळाच्या प्रवाहात संपले, पण पवार कायम आहे. पंतप्रधान तसेच राष्ट्रपतिपद वगळता अन्य बहुतांश महत्त्वाची पदे त्यांनी उपभोगली. कधी काय बोलायचे, निवडणूक कशी फिरवायची, चर्चेत कसे राहायचे, हे पवार यांना चांगल्या प्रकारे माहिती आहे.



जवळपास सहा दशकांपासून पवार महाराष्ट्राच्याच नाही तर, देशाच्या राजकारणातही सक्रिय आहे. पवारांना पराभव माहिती नाही. पवारांनी आतापर्यंत जेवढ्या निवडणुका लढवल्या, त्यातील एकाही निवडणुकीत त्यांना पराभवाचे तोंड पहावे लागले नाही. १९६७ मध्ये शरद पवार यांनी बारामती मतदारसंघातून विधानसभेची पहिली निवडणूक लढवली आणि जिंकली. पहिल्यांदाच आमदार झालेल्या पवार यांचा वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झाला. १९७२ आणि १९७८ च्या विधानसभा निवडणुकीतही त्यांनी विजय मिळवला. १९७८ मध्ये वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात असताना पवार यांनी काँग्रेसच्या १२ आमदारांसह बाहेर पडत विरोधी पक्षांसोबत हातमिळवणी केली व वसंतदादांचे सरकार पाडले. जनता पक्षाच्या मदतीने त्यांनी पुलोदचे सरकार स्थापन करीत मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. २९ वर्षांचे पवार देशातील सवार्ंत तरुण मुख्यमंत्री होते. १९८० मध्ये इंदिरा गांधी सत्तेत आल्यावर त्यांनी विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त केली, त्यात पवारांचे सरकारही बरखास्त झाले.

१९८४ ची लोकसभा निवडणूक पवारांनी लढवली आणि जिंकली. पण, राष्ट्रीय राजकारणात ते तेव्हा रमले नाही. १९८५ ची विधानसभा निवडणूक त्यांनी लढवली आणि जिंकली. लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. यावेळी विरोधी पक्षनेते म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी आली. ९ वर्षे विरोधी पक्षात राहिल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या उपस्थितीत पवार यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राजीव गांधी यांनी शंकरराव चव्हाण यांचा मंत्रिमंडळात अर्थमंत्री म्हणून समावेश केल्यानंतर रिक्त झालेल्या जागी मुख्यमंत्री म्हणून पवार यांची निवड झाली. पवार दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. १९९० च्या निवडणुकीत पवारांच्या नेतृत्वात काँग्रेसला राज्यात स्पष्ट बहुमत मिळाले नसले तरी, काँग्रेस सर्वांत मोठा पक्ष ठरला. १२ अपक्ष आमदारांच्या पाठिंब्याने पवार यांनी तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पवारांच्या मंत्रिमंडळातील विलासराव देशमुख, सुरुपसिंग नाईक आणि अन्य मंत्र्यानी पवारांविरुद्ध बंड पुकारले आणि हटवण्याची मागणी राजीव गांधींकडे केली, पण राजीव गांधींनी ती फेटाळली.

# डॉ. हीना गावित यांचा भाजपाला रामराम

◆ **मुंबई, ५ नोव्हेंबर**

नंदूरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघाच्या भाजपाच्या माजी खासदार तसेच राष्ट्रीय प्रवक्त्या हीना गावित यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केल्यानंतर पक्षाला रामराम ठोकला आहे. प्राथमिक सदस्यत्वासह पक्षाच्या इतर पदांचाही त्यांनी राजीनामा पाठवला आहे.

बंडखोरीमुळे पक्षाची प्रतिमा मलिन होऊ नये म्हणून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले आहे. हीना गावित या राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांच्या कन्या आहेत. विजयकुमार गावित नंदुरबार विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार आहेत. तर, अक्कलकुवा मतदारसंघातून हीना गावित महायुतीच्या विरोधात निवडणूक लढवत आहेत.

येथे हायव्होल्टेज लढत पाहायला मिळत आहे. अक्कलकुवा अक्राणी विधानसभा मतदारसंघात बंड केल्याने हीना गावित यांनी शिवसेनेचे विधान परिषदेचे आमदार आमश्या पाडवी आणि काँग्रेसच्या ॲड. के. सी. पाडवी यांच्यासमोर आव्हान उभे केलं आहे.

(तभा वृत्तसेवा)



# छत्रपती शिवाजी महाराजांचे सुरतमध्ये मंदिर बांधणार

### उद्धव ठाकरेंची कोल्हापुरात घोषणा

◆ **कोल्हापूर, ५ नोव्हेंबर**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामात तुम्ही भ्रष्टाचार केला. केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यासाठी घाईघाईने पुतळा उभारून महाराजांचा अवमान केला. आम्ही केवळ पुतळे उभे करणार नाही तर, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभे करू तसेच महाराष्ट्रातच नाही तर सुरतमध्येही छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभारणार असल्याचे उबाटा गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी सांगितले.



इंग्रजांना विरोध करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली होती. त्याच सुरतेमध्ये महाराष्ट्राच्या पाठीत वार करून तुम्ही गद्दार घेऊन गेला होता. त्याच सुरतमध्ये शिवाजी महाराजांचे मंदिर बांधू. ५० खोके घेऊन तुम्ही महाराष्ट्र विकत घेऊ शकत नाही. तुमचे कितीही जन्म गेले तरी, माझा महाराष्ट्र तुमच्या खोक्यात मावू शकणार नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

**राज्यात आघाडीचे सरकार येणारच**

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार म्हणजे येणारच. आताची लढाई महाराष्ट्र प्रेमी विरुद्ध महाराष्ट्र द्रोही अशी आहे. आज मी साथ मागायला आलो आहे. राधानगरीची जनता गद्दाराला गाडल्याशिवाय राहणार नाही. मी उमेदवारी दिली, मान सन्मान दिला, प्रेम दिले. सगळे देऊन शिवसेनेसारख्या आईवर वार कसा काय करू शकता, असे म्हणत शिवसेना सोडलेल्यांवर ठाकरेंनी जोरदार टीका केली. सतेज पाटील आमच्यासोबत आहेत, हे पाहून मला आणखी बरे वाटले. येथील विजयाची जबाबदारी सतेज पाटील यांच्यावर टाकतो. शाहू महाराज आहेत, सतेज पाटील आहेत, असे वातावरण असले की मन भरून येत असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले.

(वृत्तसंस्था)




महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी मुंबईत मंगळवारी आयोजित जाहीर सभेत सहभागी झालेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थितांना अभिवादन करताना

# उद्धव ठाकरेंची जाहीर सभेत माफी

◆ **कोल्हापूर, ५ नोव्हेंबर**

महाविकास आघाडीचे उमेदवार के. पी. पाटील यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरे यांची पहिली जाहीर सभा पार पडली. येथील जबाबदारी सतेज पाटील यांच्यावर टाकली असल्याचे त्यांनी सभेत सांगितले. याच सभेत उबाठाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी हात जोडून जाहीर माफी मागितली.

मधल्या कळात जे ग्रहण लागले होते, त्याची जबाबदारी माझी असल्याचे सांगत त्यांनी माफी मागितली. माझ्याकडून चूक झाली होती. पण, तुम्ही फार मोठ्या मनाचे आहात. त्याला सर्व काही दिले, आमदार केले, तुम्ही माझे ऐकले होते. पण, सर्व काही देऊनही तुमच्या पाठीवर वार करून आता छातीवर वार करण्यासाठी उभे राहिले आहेत. आमदारकी, मान सन्मान, प्रेम सर्व काही दिले. शिवसेना नावाच्या आईवर वार करणारा माणूस तुमचा होऊ शकतो का? पण सतेज पाटील सोबत आहेत, याचा आनंद आहे. येथील विजयाची जबाबदारी आता सतेज पाटील यांच्यावरच टाकली आहे, असे उद्धव ठाकरेंनी सांगितले.

(वृत्तसंस्था)

# एकाच राज्यासाठी काम करायचे असल्यास मुख्यमंत्री व्हा!

### शरद पवार यांचा मोदींना टोला

◆ **पुणे, ५ नोव्हेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी केवळ गुजरातच्या विकासाचा विचार करतात. गुजरातशिवाय त्यांना इतर राज्ये दिसत नाहीत. म्हणूनच आपल्या महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला नेण्यात येत असल्याचे सांगत, ज्येष्ठ नेते शरद पवारांनी मोदींवर नाव न घेता हल्लाबोल केला.

पुण्यातील जाहीर सभेत ते बोलत होते. ते म्हणाले, माझ्याकडे जेव्हा राज्य होते, तेव्हा मी पुण्याचा विचार केला होता; कारण फक्त शेतीवर सगळे होणार नाही. पण, या सरकारने काय जादू केली, माहिती नाही. टाटा एअरबसचा कारखाना नागपूरवरून गुजरातमध्ये नेला. सेमी कंडक्टरचा एक कारखाना ज्याचे नाव वेदांता फॉक्सकॉन आहे, तो सुद्धा गुजरातमध्ये गेला. एकाच राज्यासाठी काम करीत असाल, तर तुम्ही पंतप्रधान का होता, राज्याचे मुख्यमंत्री व्हा, अशा शब्दांत शरद पवारांनी पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल केला.

महाराष्ट्रात सत्ता बदलायला हवी. सत्ता बदलल्याशिवाय पर्याय नाही. तुम्हाला असा आमदार पाहिजे, जो अधिक लोकांच्या हाताला काम देईल. मतदारसंघातील पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्या खोलात मी आता जात नाही. ज्यांच्याकडून झाले नाही, त्यांनासुद्धा विश्वासात घेत युगेंद्र यांच्या पाठीशी मी आणि माझे सहकारी उभे राहू, मला काही नको, आमदारकी नको, खासदारकी नको. मला फक्त तुमची राहिलेले कामे पूर्ण करायची आहेत, असे म्हणत शरद पवार यांनी युगेंद्र पवारांच्या पाठीशी राहण्याचे आवाहन बारामतीकरांना केले.

(वृत्तसंस्था)

### अजित पवारांना टोला

राज्याचे नेतृत्व कोणीही करेल, त्याच्या पाठीशी आम्ही भक्कमपणे उभे राहू. काही सांगतात, मी लोकांना सांगेल, भावनिक आवाहन करेल, पण त्याची काही गरज नाही. मी माझ्या लोकांना ओळखतो, असे म्हणत शरद पवारांनी अजित पवारांना टोला लगावला. आपल्या विचारांचे सरकार आले तर, युगेंद्र इथले प्रश्न सोडवेल, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला.



ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मंगळवारी बारामती येथील एका निवडणूक सभेत संबोधित केले

### उद्धव ठाकरे, शरद पवारांचा इशारा केराच्या टोपलीत

◆ **मुंबई, ५ नोव्हेंबर**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची वेळ सोमवारी दुपारी तीन वाजेपर्यंत होती. बंडखोरी टाळण्यासाठी महाविकास आघाडीतील तिन्ही घटक पक्षांच्या राज्य नेतृत्वाकडून बंडखोरांशी संपर्क करून उमेदवारी मागे घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यात काही प्रमाणात यश आले तरी, सर्वाधिक बंडखोरांची संख्या मविआतच दिसून येत आहे.

रामटेक विधानसभा क्षेत्रात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मुळक यांनी उद्धवसेनेचे उमेदवार विशाल बरबटे यांच्याविरोधात बंड कायम ठेवले आहे. यासोबतच अनेक मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत पाहायला मिळेल, असे दिसते. बंडखोरांना नियंत्रणात आणण्यासाठी उद्धव ठाकरे आणि शरद पवारांनी एकत्रितपणे फोनाफोनी केली. त्यात पवारांना काही प्रमाणात यश आले तरी दोघांनी दिलेल्या इशाऱ्यांना काही बंडखोरांनी केराची टोपली दाखवल्याचे दिसून आले.

(वृत्तसंस्था)

# आता कुठे गेली महाराजांची प्रतिष्ठा?

### सतेज पाटलांनी छत्रपती घराण्याची इज्जत काढली

◆ **मुंबई, ५ नोव्हेंबर**

छत्रपती शिवाजी महाराजांप्रती भाजपा किंवा महायुतीतील कोणीही काही बोलले तरी हा महाराजांचा अपमान झाल्याचे सांगत नेहमी अंगावर येणारे मविआचे नेते आता सतेज पाटलांनी 'दम नव्हता तर अर्ज कशाला भरला' अशा शब्दांत छत्रपती घराण्याची इज्जत काढली. मात्र, मविआतील कोणीही ब्र उच्चारताना दिसले नाही. मधुरीमा राजे यांनी शेवटच्या क्षणी कोल्हापूर उत्तर मतदारसंघातून उमेदवारी अर्ज परत घेतला. त्या काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार होत्या. त्यांनी अचानक उमेदवारी अर्ज परत घेतल्यानंतर काँग्रेस नेते सतेज बंटी पाटील यांनी प्रचंड आगपाखड केली. खासदार छत्रपती शाहू महाराजांना वाट्टेल तशे बोलले. त्यानंतर महाराजांच्या कार्यकर्त्यांना दम दिला. उपस्थित जनतेसमोर सार्वजनिकपणे 'दम नव्हता तर अर्ज कशाला भरला' अशा शब्दांत छत्रपती घराण्याची इज्जत काढली. पण, याचा कोणी निषेध केला नाही आणि सतेज पाटलांची कानऊघाडणी केली नाही. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी अपमान केला नसताना, अपमान केल्याचे सांगणारे, नैसर्गिक आपत्तीने पुतळा पडला तर महाराजांचा अपमान केल्याचे सांगत आकांडतांडव करणारे आता छत्रपतींच्या घराण्याचा, छत्रपतींच्या गादीचा, वंशजांचा प्रत्यक्ष अवमान केल्यानंतर देखील शरद पवार, सुप्रिया सुळे, उद्धव ठाकरे, संजय राऊत, आदित्य ठाकरे, नाना पटोले आदी काँग्रेसी मंडळी आता मुग गिळून बसली आहे. त्यांच्या एका नेत्याने महाराजांच्या वंशजाचा थेट अपमान केल्यानंतरही यांना महाराजांचा अपमान वाटला नाही.



भाजपाच्या एखाद्या नेत्याने किंवा सर्व सामान्य समर्थकाने कोल्हापूरच्या गादी विरोधात काही लिहिले तरी, धमक्या द्यायला तथाकथित शिवप्रेमी व मविआचे समर्थक अग्रेसर असतात व त्यांच्या खानदानाचा उद्धार करतात. पण, इथे तर सतेज पाटलांनी त्याच राजघराण्यातील सूनेचा जाहीर अपमान केलाच, पण खुप खालच्या दर्जाची आक्षेपार्ह भाषा वापरली.

राजघराण्यातील सूनेविषयी आतापर्यंत वापरली गेलेली ही सर्वांत गलिच्छ भाषा आहे आणि यातून पुरोगामी महाराष्ट्रात स्त्री सन्मान व महिलांचा आदर केला जातो, ही जी काही पुडी सोडली जाते, ती पूर्णतः पोकळ आहे, हे संपूर्ण महाराष्ट्राने आज बघितले आहे. या ठिकाणी एखादा भाजपा नेता असता, तर महाचर्चा झाली असती आणि त्या नेत्याला जाहीर माफी मागायला लावून राजीनाम्याची मागणी केली असती व भाजपा विरोधात संपूर्ण महाराष्ट्रात एक वेगळाच नॅरेटीव्ह सेट केला असता. हाच काँग्रेस, ठाकरे गट, शरद पवार गटाचा खरा चेहरा आहे.

(तभा वृत्तसेवा)

**पालघरमधील वसई, नालासोपारा आणि बोईसर या तीन मतदारसंघांमध्ये बहुजन विकास आघाडीचे आमदार आहेत. पालघरमध्ये शिवसेनेचे श्रीनिवास वनगा, विक्रमगडमध्ये शरद पवार गटाचे सुनील भुसारा आणि डहाणू मतदारसंघामध्ये विनोद निकोले हे आमदार आहेत. स्थानिक पक्ष असूनही 'बविआ'ने या मतदारसंघांवर वरचष्मा ठेवला आहे; मात्र या मतदारसंघामध्ये लोकसभा निवडणुकीत हेमंत सावरा निवडून आल्याने भाजप समोरील आव्हान वाढले आहे; परंतु शिवसेनेच्या शिंदे आणि ठाकरे गटात नाराजी उफाळून आली. त्याचा फटका महाविकास आघाडी आणि महायुतीलाही बसण्याची शक्यता आहे.**

# प्रमुख पक्षांमध्ये नाराजीनाट्य

'बविआ'साठी ही अस्तित्वाची लढाई आहे, तर युती–आघाडी पालघर जिंकण्यासाठी जोर लावणार आहे. वसई हा जवळपास तीन लाख ५१ हजार मतदार असलेला मतदारसंघ मुख्यतः नायगावपासून वसई ते अर्नाळा असा पश्चिम पट्ट्यात पसरला आहे. या मतदारसंघामध्ये पूर्वीपासून राहणाऱ्या स्थानिक मतदारांची संख्या मोठी आहे. या भागात कोळी, आगरी, वाडवळ, भंडारी, ख्रिस्ती, मुस्लिम आणि गुजराती असे विविध जाती–धर्माचे मतदार असून त्यांची मते निर्णायक आहेत. वसई मतदारसंघ 'बविआ'चा बालेकिल्ला समजला जातो. या मतदारसंघामधून १९९० पासून पक्षाध्यक्ष तथा विद्यमान आमदार हितेंद्र ठाकूर निवडणूक लढवत आहेत. पक्षाने हा मतदारसंघ सातपैकी सहा वेळा हातात ठेवला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये विजय मिळाल्यानंतर, 'ही माझी शेवटची निवडणूक असेल', असे ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते; मात्र २०२४ च्या निवडणुकीआधी पुन्हा निवडणूक लढवणार असल्याचे सांगत ते रिंगणात उतरले आहेत. वसईतून महाविकास आघाडीने दिलेला उमेदवार पाहता त्यांनी बविआला पुढे चाल दिली आहे. शरद पवार आणि बाळासाहेब थोरात यांनी ठाकूर यांच्यांशी चर्चा केली होती. नालासोपारा जिल्ह्यातील सर्वाधिक म्हणजे जवळपास पाच लाख ९८ हजार मतदार असलेला मतदारसंघ आहे. या मतदारसंघाची वैतरणापासून ते बरफ पाडा, विरारमधील समेळपाडा, बोळींज, तुळींज, वलई पाडा, मनवेलपाडा अशी हद्द आहे. या मतदारसंघात सर्वाधिक म्हणजेच ४६ टक्के इतके परप्रांतीय मतदार आहेत. तेथील समस्यांवर 'बविआ'कडून तोडगा काढण्याचा नेहमी प्रयत्न केला जातो. शिवाय महापालिकेमध्ये सत्ता असल्यामुळे या भागातील प्रत्येक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न पक्षाकडून केला जात असल्याने 'बविआ'ला मानणारा मोठा वर्ग आहे. पक्षाचे क्षितिज ठाकूर सलग तीन वेळा निवडून आले असून यंदाही ते रिंगणात आहेत. हा मतदारसंघ भाजपने शिवसेनेकडून पुन्हा मिळवला आहे. यामध्ये भाजपने महायुतीतर्फे राजन नाईक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मनेसेने विनोद मोरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे 'बविआ' हा गड राखणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.




पालघर जिल्ह्यातील बोईसर विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. या मतदारसंघाचा निम्मा म्हणजेच ५० टक्के भाग वसई–विरार महापालिकेमध्ये, तर निम्मा भाग पालघर जिल्ह्यामध्ये मोडतो. या मतदारसंघामध्ये वसई पूर्वेच्या गोखिवरे, वालीव नालासोपारामधील संतोष भुवन, पेल्हारपासून मांडवीपर्यंतचा भाग, तर पालघरमधील सफाळे, मनोर आणि बोईसर शहरांचा समावेश होतो. यात उत्तर भारतीय मतदारांची संख्या २५ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. बोईसर हा औद्योगिक पट्टा आहे. येथील बहुतांश कामगार वर्ग उत्तर भारतीय आहे. तर मनोर, तारापूर हा मुस्लिमबहुल भाग आहे. या मतदारसंघामध्ये २००९पासून 'बविआ'चाच आमदार निवडून येत असून यंदाही पक्षातर्फे विद्यमान आमदार राजेश पाटील हे रिंगणात आहेत. २०१९च्या निवडणुकीत राजेश पाटील यांचा निसटता विजय झाला होता. यंदा महायुतीसोबत महाविकास आघाडीचेही आव्हान त्यांच्यापुढे असणार आहे. २०१९मध्ये सेना–भाजप युतीमधील शिवसेनेच्या विलास तरे यांचे आव्हान पाटील यांच्यासमोर होते; मात्र तेव्हा भाजपतर्फे तिकीट न मिळाल्याने संतोष जनाठे यांनी बंडखोरी केली. ही बंडखोरी 'बविआ'च्या पथ्यावर पडली. आता पुन्हा तरे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करून उमेदवारी मिळवली आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटातून डॉ. विश्वास वळवी यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. डॉ. वळवी हे सामाजिक कार्यकर्ते असून विश्वास फाऊंडेशनच्या माध्मयातून त्यांचे काम चालू असते. या मतदारसंघामध्ये तिरंगी लढत बघायला मिळणार आहे. दुसरीकडे ठाकरे गटातर्फे येथे डॉ. वळवी यांचे नाव उमेदवार म्हणून जाहीर झाल्यानंतर पालघर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य कमलाकर दळवी हे नाराज झाले आहेत. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत अविभक्त शिवसेनेचे उमेदवार असलेले कमलाकर दळवी यांनी त्या निवडणुकीत सुमारे ५६ हजार मते मिळवली होती. पराभूत झाल्यानंतरही पक्ष संघटनेत कार्यरत राहून ग्रामीण भागात पक्ष वाढवण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु ठेवले होते. शिवसेना पक्षफुटी दरम्यान अनेक मातब्बर नेते शिंदे गटात सामील होत असताना,त्यांनी ठाकरे गटात राहून आपले काम सुरू ठेवले होते. लोकसभा निवडणुकीत पालघर लोकसभा मतदार संघाच्या ठाकरे गटाच्या उमेदवार भारती कामडी यासाठी प्रचंड मेहनत घेतली होती. या पार्श्वभूमीवर डॉ. वळवी हे बोईसर विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मिळवण्यात यशस्वी झाल्यामुळे ठाकरे गटातील अनेक जण नाराज झाले आहेत.

**रण तापले**

पालघर हा एकेकाळी समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला असणारा मतदारसंघ. दोन वेळा काँग्रेस आणि त्यानंतर अविभाजित शिवसेनेकडे आला. त्यामुळे आत्तापर्यंत हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून, तब्बल पाच वेळा या पक्षाचे अविनाश सुतार, मनीषा निमकर, कृष्णा घोडा, अमित घोडा आणि श्रीनिवास वनगा हे प्रत्येक वेळी भरघोस मतांनी निवडून आले आहेत. या मतदारसंघातून शिवसेनेच्या ठाकरे गटाकडून जिल्हा परिषदेतील गटनेते जयंत दुबळा यांना उमेदवारी मिळाली आहे. या मतदारसंघामध्ये २०१९ ला श्रीनिवास वनगा निवडून आले; मात्र महाविकास आघाडीचे सरकार पडल्यानंतर ते शिवसेनेच्या शिंदे गटासोबत गेले. त्या वेळी शिंदे यांनी त्यांना विधानसभेत तिकीट देण्याची ग्वाही दिली होती; मात्र वनगा यांना उमेदवारी न देता ती भाजपतून राजेंद्र गावित याना आयात करून त्यांना देण्यात आली. त्यांनी शिंदे यांचा विश्वासघातकी असा उल्लेख करताना ठाकरे यांचे कौतुक केले.

विक्रमगड विधानसभा मतदारसंघातील राजकीय गणिते वेगाने बदलत आहेत. विधानसभेत खरी लढत दुहेरी होत असली तरी सध्या येथे सर्वच पक्षांची उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू आहे. शरद पवार गटाने विद्यमान आमदार सुनील भुसार यांना पुन्हा तिकीट दिले आहे, तर भाजपने हरिश्चंद्र भोये यांना उमेदवारी दिली आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम येथून इच्छुक होते. भाजपने लोकसभेला त्यांना थांबवून विधानसभेला विचार करू, असे सांगितले होते; परंतु शिवसेनेच्या शिंदे गटाला हा मतदारसंघ सुटला नाही. त्यामुळे निकम यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. विक्रमग–मोखडा या दोन तालुक्यांत शिंदे गटाची ताकद जास्त आहे. या मतदारसंघात कुपोषण, बेरोजगारी या मुद्द्यांवर निवडणूक लढवली जात असून, यात जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गटांचा समावेश आहे. भाजपला मागील निवडणुकीत पराभवाची धूळ चाखावी लागली असली तरी पराभूत उमेदवार हेमंत सवरा सध्या विद्यमान खासदार असून विक्रमगड विधानसभा क्षेत्रातून त्यांना घसघशीत मते मिळाली आहेत. जिजाऊ संघटना आपला उमेदवार उभा करण्याची चाचपणी करीत असून, निकम यांना त्यांची उमेदवारी मिळाली, तर तिरंगी लढतीत पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराचा फायदा होण्याची शक्यता आहे.

डहाणू विधानसभा मतदारसंघ हा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. २००९ साली मतदारसंघ पुनर्रचनेत डहाणू आणि तलासरी तालुक्यांचा समावेश झाला. हा मतदारसंघ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला मानला जातो. या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून माकपचे विद्यमान आमदार विनोद निकोले यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. महायुतीकडून हा मतदार संघ भाजपला सुटला आहे. वाढवण बंदर, मुंबई–अहमदाबाद रस्त्याची दुरवस्था अशा अनेक प्रश्नांवर निकोले लढले आहेत. त्यांचा साधेपणा, विधानसभेत सर्वाधिक प्रश्न मांडणारा आमदार म्हणून ओळख या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. लोकसभा निवडणुकीत पालघर मतदारसंघामध्ये भाजपने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले, तरी सहापैकी डहाणू विधानसभा मतदारसंघात भाजपचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तेव्हापासून निकोले यांची विधानसभेसाठी उमेदवारी पक्की समजली गेली. माकपच्या राज्य समितीने त्यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर महाविकास आघाडीने पाठिंबा दिला.


■■■

**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे यांच्याविरोधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खासदार मिलिंद देवरा यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. उद्धव यांच्यापेक्षाही आदित्य यांनी शिवसेनेतील बंडानंतर शिंदे यांच्यावर अधिक कडवी टीका केली होती. आदित्य यांच्या पराभवासाठी शिंदे यांनी आता मिलिंद यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले असले, तरी त्यांचा हा डाव मुंबईकर किती यशस्वी होऊ देतात, हा प्रश्नच आहे.**

# वरळीच्या 'हॉट सीट'वर काय होणार?

आदित्य ठाकरे वरळी मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. गेल्या वेळीही ते याच जागेवरून निवडून आले होते; मात्र या वेळी त्यांचा मार्ग गेल्या वेळेइतका सोपा दिसत नाही. त्यांच्या विरोधात शिंदे यांच्या शिवसेनेने मिलिंद देवरा यांना उमेदवारी दिली आहे. वरळी मतदारसंघ्घ ही 'हाय प्रोफाईल' जागा आहे. २०१९ मध्ये आदित्य या जागेवरून विजयी झाले होते. त्या वेळी शिवसेना एक होती आणि शिवसेनेची भाजपशी युती होती. त्यांना ८९,२४८ मते मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सुरेश माने २१,८२१ मतांनी दुसऱ्या क्रमांकावर राहिले. आदित्य जवळपास ६७ हजार मतांनी विजयी झाले होते. त्यानंतर राजकारणाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. शिवसेनेत दोन गट पडले आहेत. वरळी विधानसभेची जागा मुंबई दक्षिण लोकसभेत येते. हा परिसर देवरा घराण्याचा गड मानला जातो. आदित्य यांना कोंडीत पकडण्यासाठी शिंदे यांनी देवरा यांच्यासारख्या तगड्या चेहऱ्याला रिंगणात उतरवले आहे. राष्ट्रीय राजकारणात मिलिंद यांचे उत्तम वजन आहे. शिवसेनेत येण्यापूर्वी ते काँग्रेसमध्ये होते. १४व्या आणि १५व्या लोकसभेतही त्यांनी मुंबई दक्षिण लोकसभेचे प्रतिनिधित्व केले आहे. आदित्य यांच्याविरोधात मिलिंद यांना उभे करून शिंदे यांनी मोठा राजकीय जुगार खेळला आहे; मात्र मिलिंद आदित्य यांना पराभूत करू शकणार का, मिलिंद निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यास आदित्यला वॉकओव्हर मिळेल का, असे प्रश्नही राजकीय वर्तुळात उपस्थित केले जात आहेत.


आदित्य ठाकरे


मिलिंद देवरा

मिलिंद देवरा हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुरली देवरा यांचे चिरंजीव. गांधी घराण्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी यांच्यांशी संबंध असताना देवरा यांना दक्षिण मुंबईची जागा न सोडल्याने त्यांनी पक्षांतर केले. मिलिंद यांनी २००४ मध्ये राजकारणात प्रवेश केला. काँग्रेसने त्यांना मुंबई दक्षिण मतदारसंघातून उमेदवारी दिली. २००४ आणि २००९ मध्ये या मतदारसंघामध्ये विजयी होऊन मिलिंद देवरा संसदेमध्ये पोहोचले. २०११ मध्ये मिलिंद यांना डॉ. मनमोहन सिंग सरकारमध्ये राज्यमंत्री करण्यात आले. मिलिंद हे मुंबई काँग्रेसचे अध्यक्षही राहिले आहेत. तसेच ते राहुल गांधींच्या जवळचे मानले जात होते; मात्र २०२४ च्या निवडणुकीपूर्वी मिलिंद यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेने त्यांना राज्यसभेवर पाठवले. देवरा यांनी २००९, २०१४ आणि २०१९ मध्ये दक्षिण मुंबईतून लोकसभा निवडणूक लढवली होती. २००९ सोडल्यास, मिलिंद देवरा २०१४ आणि २०१९ मध्ये दक्षिण मुंबईतून पराभूत झाले. मिलिंद यांना २००९ मध्ये वरळीतून ३९ हजार, २०१४ मध्ये ३५ हजार आणि २०१९ मध्ये ४१ हजार मते मिळाली होती. २००९ वगळता दोन्ही निवडणुकांमध्ये शिवसेनेच्या उमेदवाराला मिलिंद याच्यापेक्षा जवळपास दुप्पट मते मिळाली. लोकसभेच्या निवडणुकीत वरळीच्या जागेवर उद्धव यांच्या उमेदवाराला सात हजारांची आघाडी मिळाली होती. येथून अरविंद सावंत हे उद्धव यांचे उमेदवार होते. शिंदे यांच्या शिवसेनेने दक्षिण मुंबईतून यामिनी जाधव यांना उमेदवारी दिली होती.

**वलयांकित**

२०१९ च्या आकडेवारीनुसार वरळीमध्ये सुमारे दोन लाख ७१ हजार मतदार आहेत. एके काळी येथे मनसेची स्थिती भक्कम होती; पण २०१९ मध्ये आदित्य रिंगणात आल्याने मनसेने येथे उमेदवार दिला नाही. जातीय समीकरणाबद्दल बोलायचे झाले तर वरळीमध्ये अकरा टक्के दलित आणि नऊ टक्के मुस्लिम आहेत. याशिवाय २.७ टक्के पाटील, दोन टक्के जाधव आणि दोन टक्के कांबळे असे मतदार या भागात आहेत. वरळीतील सर्व मतदार शहरी समाजातील आहेत. १९९० पासून शिवसेनेने फक्त एकदाच ही जागा गमावली आहे. २००९ मध्ये राष्ट्रवादीचे सचिन अहिर यांनी शिवसेनेच्या आशिष यांचा पराभव केला होता. मिलिंद यांचा ट्रॅक रेकॉर्ड खराब आहे. मिलिंद २०१४ पासून एकही निवडणूक जिंकू शकलेले नाहीत; मात्र त्यांच्यासाठी दिलासा देणारी एक बाब आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये या जागेवर शिंदे यांचे उमेदवार अवघ्या सहा हजार मतांनी मागे पडले. दुसरे म्हणजे उद्धव ठाकरे यांनी माहीमच्या जागेवर राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित यांच्याविरोधात उमेदवार उभा केला आहे. राज आदित्य यांच्याविरोधात प्रचार करू शकतात. या साठमारीमध्ये नक्की कोणाची सरशी होते हे पाहायचे.

■■■




# अजितदादांच्या खेळीमुळे निवडणूक अवघड

**आर. आर. पाटील यांचा मतदारसंघ ही तासगाव–कवठे महांकाळची ओळख. येथे आर. आर. पाटील यांच्या पत्नी सुमनताई आमदार आहेत. या वेळी त्यांचे पुत्र रोहित पाटील यांना येथून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्यासाठी निवडणूक अवघड नव्हती; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी खासदार संजयकाका पाटील यांना निवडणुकीत उतरवले आणि अजित घोरपडे–संजयकाकांचे मनोमिलन घडवून आणले. त्यामुळे रोहित यांच्यासमोर तगडे आव्हान उभे राहिले आहे.**

अजित पवार यांनी पुढाकार घेऊन तासगाव – कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात माजी खासदार संजय पाटील आणि माजी आमदार अजित घोरपडे यांच्यात समेट घडवून आणला आहे. पवारांच्या या खेळीमुळे दिवंगत आर. आर. पाटील यांचे पुत्र रोहित पाटील यांच्या समोर तगडे आव्हान निर्माण झाले आहे. लोकसभा निवडणुकीत संजयकाका यांचा पराभव झाला. त्यात त्यांचा स्वभाव तापट. कवठेमहांकाळमध्ये नुकत्याच झालेल्या एका मारामारी प्रकरणात ही ते अडकले. त्याविरोधात आमदार सुमनताई आणि रोहित यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला. रोहित सध्याच्या युवा पिढीचे


रोहित पाटील
संजयकाका पाटील

प्रतिनिधित्व करतात. त्यांचे वक्तृत्वही चांगले आहे. रोहित पाटील गेल्या तीन – चार वर्षांपासून विधानसभेची तयारी करत आहेत. त्यांचा जनसंपर्क चांगला आहे. प्रबळ विरोधक नसल्यामुळे यंदाची विधानसभा निवडणूक रोहित पाटीलांसाठी काहीशी सोपी जाईल, असे वाटत होते; पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पडलेल्या फुटीमुळे रोहित पाटील त्यांची कोंडी झाली आहे. महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून रोहित पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. दुसरीकडे महायुतीच्या जागा वाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या वाट्याला गेली आहे. अजित पवारांनी ही जागा निवडून आणण्याचा चंग बांधला असून संजयकाका यांनाच उमेदवारी दिली आहे. रोहित पाटील यांचे पारडे काहीसे जड दिसत होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत तासगाव–कवठेमहांकाळ मतदारसंघामध्ये भाजपचे उमेदवार असलेले संजय पाटील पिछाडीवर होते. त्यामुळेच अजित पवार यांनी पुढाकार घेऊन माजी आमदार अजित घोरपडे आणि संजय पाटील यांच्यातील वाद मिटवून समेट घडवून आणला आहे. घोरपडे– पाटील यांच्यात झालेल्या समेटामुळे रोहित पाटील यांच्यासमोर तगडे आव्हान निर्माण झाले आहे. प्रारंभी रोहित पाटील यांच्यासाठी सोपी वाटणारी निवडणूक आता चुरशीची होणार आहे. १९९० पासून तासगाव – कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघावर दिवंगत आर. आर. पाटील कुटुंबीयांचे वर्चस्व आहे. आर. आर. पाटील यांनी तासगाव विधानसभा मतदारसंघातून १९९०, १९९५, १९९९ आणि २००४ ची निवडणूक जिंकली होती. मतदारसंघांच्या फेररचनेनंतर तासगाव – कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघातून २००९ आणि २०१४ ची निवडणूकही पाटील यांनी जिंकली होती. त्यांच्या निधनानंतर झालेली पोटनिवडणूक आणि २०१९ ची विधानसभा निवडणूक पाटील यांच्या पत्नी सुमन पाटील यांनी मोठ्या मताधिक्याने जिंकली होती. त्यामुळे या मतदारसंघात रोहित पाटील यांचा पराभव करून विजय खेचून आणणे संजयकाका पाटील यांच्यासाठी फारसे सोपे असणार नाही. आर. आर. पाटील – संजय पाटील यांच्यातील चुरशीच्या लढती राज्याने पाहिल्या आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचे उमेदवार असलेले संजय पाटील यांच्या विरोधात अजित घोरपडे यांनी खासदार विशाल पाटील यांचा प्रचार केला होता. जाहीर सभांमधून जोरदार आरोप–प्रत्यारोप झाले होते. संजय पाटील ही जिल्ह्याला लागलेली कीड आहे, अशी जहरी टीका करणारे अजित घोरपडे आता विधानसभा निवडणुकीत त्यांचाच प्रचार करणार आहेत. वरिष्ठ पातळीवरील तडजोडीतून समेट झाला खरा; पण नेत्यांमध्ये झालेले मनोमिलन कार्यकर्त्यांच्या पचनी पडेल का, कार्यकर्ते एकजुटीने काम करणार का, हे लवकरच दिसून येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय संजयकाका पाटील यांनी जाहीर केला. याचवेळी माजी राज्यमंत्री अजित घोरपडे यांनीही संजय पाटील यांना साथ देण्याची भूमिका जाहीर केली.

**लक्षवेधी लढत**

जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात हा निर्णय धक्कादायक आणि अनपेक्षित मानला जात आहे. तासगाव–कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघ महायुतीत कोणत्या पक्षाला जाणार आणि उमेदवार कोण असणार, याबाबत सातत्याने चर्चा होत होती. या चर्चेवर पडदा पडला. हा मतदारसंघ अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला जाणार असल्याचे शिक्कामोर्तब झाल्यानंतर राष्ट्रवादी पक्षातून भाजपचे माजी खासदार संजयकाका पाटील यांना विधानसभेच्या आखाड्यात उतरविण्याचा निर्णय झाला. तासगाव तालुक्यात तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील आणि संजयकाका पाटील यांचे २००८ साली मनोमिलन झाले होते. त्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजयकाका सहा वर्षे विधान परिषद सदस्य होते. २०१४ ला त्यांनी राष्ट्रवादीपासून फारकत घेत भाजपमध्ये प्रवेश केला. तब्बल दहा वर्षांनंतर पुन्हा त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्यामुळे संजयकाकांचे एक राजकीय वर्तुळ पूर्ण झाले आहे.

■■■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महायुतीत भाजपा तर महाआघाडीत शरद पवारांची राष्ट्रवादी मोठा भाऊ

- जागा वाटपात महायुतीत ओके, आघाडीत ठिणगी
- महायुतीचा ६-३-२ चा फॉर्म्युला; महाविकास आघाडीत चार जागांवर आहे बिघाडी

**तभा वृत्तसेवा। किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात आता लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. प्रचाराचा धुम धडाकाही सुरू झाला आहे. जागा वाटपात महायुतीमध्ये अपवाद सोडता सर्वकाही ओके आहे तर महाविकास आघाडीमध्ये साधारणतः चार ठिकाणी बिघाडीचे दर्शन घडले आहे. जिल्ह्यात भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रत्येकी सहा जागा लढवत दोघेही मोठे भाऊ ठरले आहेत.

विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे. काल अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर अंतिम उमेदवारांना चिन्हही वाटप करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यात एकूण ११ विधानसभा मतदारसंघ आहेत. या ११ मतदारसंघात एकूण ३३४ उमेदवारांनी अर्ज भरले होते तर १५० जणांनी माघार घेतली. यामुळे आता १८४ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. दरम्यान, जिल्ह्यात या सर्वच मतदारसंघात प्रचाराचा धूम धडाका सुरू आहे. रॅली, पदयात्रा यासह मतदार भेटीवर जोर दिला जात आहे. दरम्यान, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यामध्ये विघटन झाले त्यानंतर राज्यातील सर्व राजकीय समीकरणे बदलली. महायुती अंतर्गत भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि इतर मित्र पक्ष आहेत. महाविकास आघाडी अंतर्गत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आदी प्रमुख पक्ष आहेत. मागील २०१९च्या निवडणुकीत सोलापूर



जिल्ह्यात मूळ राष्ट्रवादी पक्षाने सात जागा लढविल्या होत्या. तर भाजपाने पाच जागा लढवल्या होत्या. २०१९ च्या निवडणुकीत भाजपकडे दोन खासदार आणि सहा आमदार निवडून आले. दरम्यानच्या काळात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे विघटन झाले. यामुळे मोठा बदल झाला. सोलापूर शहर मध्य सोडून इतर ठिकाणी जिल्ह्यात महायुतीचे आमदार आहेत. यामध्ये भाजपा सहा, शिवसेना शिंदे गटाचा एक, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे दोन आणि अपक्ष असे आमदारांचे गणित आहे. आता २०२४ च्या या विधानसभा निवडणुकीच्या रण मैदानात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात जंगी सामना रंगणार असल्याचे राजकीय चित्र आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी मधील जागा वाटपाचा लेखाजोखा पाहिला असता भाजपा आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने प्रत्येकी सहा जागा लढविल्या आहेत. यामुळे जिल्ह्यात हे दोन्ही पक्ष निवडणूक रिंगणात अधिक जागा लढविणारे पक्ष ठरले आहे. सोलापूर जिल्ह्यात महायुती अंतर्गत भाजपा - सहा जागा, शिवसेना शिंदे गट - तीन जागा, राष्ट्रवादी अजित पवार गट- दोन जागा लढवीत आहे. शहर उत्तर मतदार संघात भाजपात माजी महापौर शोभा बनशेट्टी यांनी बंडखोरी केली आहे. हा अपवाद वगळता भाजपा सह महायुतीमध्ये सर्वकाही ओके असल्याचे चित्र आहे तर दुसरीकडे महाविकास आघाडी अंतर्गत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष- सहा जागा, काँग्रेस- तीन जागा आणि शिवसेना ठाकरे गट - तीन जागा लढवीत आहे मात्र जिल्ह्यात साधारणतः चार मतदारसंघात आघाडीत बिघाडी झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. कुरघोड्याचे राजकारण दिसून येते.

### या ठिकाणी आघाडीत बिघाडी

महाविकास आघाडीत बिघाडी असल्याचे चित्र आहे. यामध्ये शहर मध्य मतदार संघात काँग्रेसचे चेतन नरोटे तर माकपाकडून माजी आमदार नरसय्या आडम हेही एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत.तर पंढरपूर - मंगळवेढा मतदारसंघात काँग्रेसचे भगीरथ भालके आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून अनिल सावंत हेही निवडणूक रिंगणात आहेत. दक्षिण सोलापूर मतदार संघातही शिवसेना ठाकरे गटाकडून अमर पाटील यांना उमेदवारी दिली तर दुसरीकडे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून इच्छुक असलेले धर्मराज काडादी हे अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्याचबरोबर सांगोला मतदार संघात शिवसेना ठाकरे गटाकडून माजी आमदार दीपक साळुंखे पाटील तर दुसरीकडे शेकापचे बाबासाहेब देशमुख हेही निवडणूक लढवीत आहेत. प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. अशा पद्धतीने चार ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत असल्याचेच चित्र आहे.

महायुती अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात भाजपाकडून शहर उत्तर मधून आमदार विजयकुमार देशमुख हे निवडणूक रिंगणात आहेत. याच मतदारसंघात माजी महापौर शोभा बनशेट्टी यांनी बंडखोरी केली आहे. शहर मध्य मतदार संघात माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांना संधी दिली असून सोलापूर दक्षिण मध्ये आमदार सुभाष देशमुख, अक्कलकोट - आमदार सचिन कल्याणशेट्टी, माळशिरस राखीव - आमदार राम सातपुते , पंढरपूर - मंगळवेढा - आमदार समाधान आवताडे यांना भाजपने निवडणूक रिंगणात उतरवले आहे. सर्व विद्यमान आमदारांना भाजपने मैदानात उतरवले आहे.

महायुती अंतर्गत शहर मध्य मतदारसंघ शिवसेना शिंदे गटाला सुटेल अशी शक्यता होती मात्र हा मतदारसंघ भाजपने स्वतःकडे ठेवला तर बार्शी मतदारसंघ शिवसेना शिंदे गटासाठी सोडण्यात आला. शिवसेना शिंदे गटाकडून बार्शी- आमदार राजेंद्र राऊत, करमाळा - दिग्विजय बागल, सांगोला आमदार शहाजी पाटील तर राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून माढा - मीनल साठे , मोहोळ राखीव- आमदार यशवंत माने हे निवडणूक रण मैदानात आहेत. माढा मतदारसंघातून विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून संधी नाकारण्यात आली. महाविकास आघाडी अंतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून शहर उत्तर - महेश कोठे, करमाळा - नारायण पाटील, माढा - अभिजीत पाटील, माळशिरस राखीव - उत्तम जानकर, पंढरपूर - मंगळवेढा - अनिल सावंत, मोहोळ - राजू खरे निवडणूक मैदानात आहेत. काँग्रेसकडून शहर मध्य - चेतन नरोटे, अक्कलकोट - माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, पंढरपूर - मंगळवेढा - भगीरथ भालके तर शिवसेना ठाकरे गटाकडून दक्षिण सोलापूर- अमर पाटील, बार्शी - माजी आमदार दिलीप सोपल, सांगोला - माजी आमदार दिलीप सोपल, तर सांगोला मधून माजी आमदार दीपक साळुंखे पाटील हे रण मैदानात उतरले आहेत.



## स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून तब्बल २० वर्षानंतर झाल्या गाठीभेटी

**तभा वृत्तसेवा**
**सांगोला, दि. ५ नोव्हेंबर -**

सांगोला येथील न्यू इंग्लिश स्कूल व ज्यू.कॉलेजमध्ये सन २००४ मध्ये उच्च माध्यमिक शिक्षण पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी स्नेह मेळावा मोठ्या आनंदात व उत्साहात संपन्न झाला.

सदर स्नेह मेळावा सांगोला येथील वासुद रोडवरील हॅपी पार्क येथे आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या सुरुवातीला एकमेकांना गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. स्वागत सोहळ्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने आपापली ओळख करून दिली व मनोगत व्यक्त केले. मनोगतात प्रत्येकाने प्राथमिक व माध्यमिक शाळेतील आपापले अनुभव व चालू वाटचालीबद्दल मनोगत कथन केले. त्यानंतर संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आली. यावेळी स्नेहभोजन झाल्यानंतर उपस्थित डॉक्टर यांनी चालू वयात शरीराची काळजी कशी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती दिली. अशाप्रकारे अत्यंत खेळीमेळीच्या, आनंदमय व उत्साहवर्धक वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.यावेळी माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

## सोलापूर बाजार समितीत कांद्याची आवक घटली

### प्रति क्विंटलमागे २,२०० रुपये दरवाढ, चांगल्या मालाला ४ हजारापर्यंत मिळतोय दर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ नोव्हेंबर -**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची आवक घटली आहे. तब्बल ४०० ट्रक कांद्याची आवक कमी झाली. चांगल्या प्रतीच्या कांद्यासह - आवक कमी झाल्याने सरासरी दरात मात्र प्रति क्विंटल २२०० रुपयांनी वाढून ३ हजार - रुपयांपर्यंत स्थिर राहिले आहेत. सोमवारी बाजार समितीत उच्चांकी आवक होईल, असा अंदाज होता. परंतु केवळ ३१३ ट्रकमधून ३१ हजार ३७६ क्विंटल कांद्याची आवक झाली. उच्चांकी दर ६२२५ रुपयांपर्यंत पोहोचले सरासरी दर प्रतिक्विंटल ३००० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. एकूण ९,४१,२८,००० कोटींची एकाच दिवशी उलाढाल झाली.

दरम्यान उशिराने झालेली खरीप हंगामातील नव्या कांद्याची आवक बाजार समितीत सुरू झाली आहे. खरीप हंगामात सोलापूर जिल्ह्यात ५५ हजार हेक्टर कांद्याची लागवड झाली होती. तो कांदा सध्या विक्रीसाठी येत आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर ३ दिवस बाजार समितीतील कांद्याचे लिलाव बंद ठेवण्यात आले होते. शिवाय हवामान खात्याने ऐन दिवाळीत सलग ३ दिवस पावसाचा अंदाज हवामान शाळेने वर्तवला होता. त्याचवेळी बाजार समितीत ७०३ ट्रकमधून तब्बल ७० हजार क्विंटल कांद्याची आवक होऊन सरासरी दर प्रति क्विंटल १८०० रुपयांपर्यंत खाली कोसळले होते.



### चांगल्या प्रतिचा कांदा आला

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार बाजार समितीत मागील महिनाभरापासून पावसात भिजून नुकसान झालेल्या कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळेच दर घसरले होते. सोमवारी चांगल्या प्रतिच्या कांद्याची आवक अधिक झाल्याने दरात सुधारणा झाली.''

**- सादिक नदाफ, कांद्याचे आडत व्यापारी**



## डोणजच्या ए.एम. स्पोर्टस्‌ला विजेतेपद

### जिल्हा किशोर गट खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

डोणजच्या ए. एम. स्पोर्टस् क्लबने जिल्हा किशोर गट खो-खो स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

कै. अंबिर मुलाणी यांच्या दहाव्या पुण्यस्मरणार्थ जि. प. प्रा. शाळा डोणज येथे ही स्पर्धा पार पडली. अंतिम सामन्यात ए. एम स्पोर्ट्स, डोणजने छत्रपती खो-खो क्लब मरवडे संघास हरविले. दीनबंधू मंद्रूप क्लबने तृतीय तर आदर्श खो-खो क्लब शेवतेने संघाने चतुर्थ स्थान संपादिले. डोणजच्या वैभव कोळी व रोहन आनंदपुरे यांनी संरक्षण तसेच तुषार कोरे, विनायक स्वामी, रघुवीर मंटूर, चन्नवीर मंटूर, कट्टीमनी यांनी धारदार आक्रमण केले. मरवडे संघाकडून समर्थ कुंभार व संकेत बावचे यांची लढत अपुरी पडली. खो-खो असोसिएशनचे निरीक्षक विजय दत्तू, कृष्णा कोळी, दामाजी शुगर संचालक अशोक केदार, चेअरमन शशिकांत बुगडे, श्रीमंत केदार, रमेश केदार, दुर्योधन पुजारी, यांनी संघाचे अभिनंदन केले.

## पदयात्रेत महेश कोठे यांचे चौकाचौकात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

मविआचे अधिकृत उमेदवार महेश कोठे यांनी प्रचाराला जोरदार सुरूवात केली असून, त्यांनी आज प्रभाग क्रमांक १मधून पदयात्रा काढली. यावेळी त्यांचे घरोघरी, चौकाचौकातून जोरदार स्वागत करण्यात आले.

ही पदयात्रा सकाळी ८ वाजता निघाली होती. या प्रभागातील बंदपट्टे मेंबर घरापासून निघालेली ही पदयात्रा रविवार पेठ, भद्रावती पेठ कविता नगर, गवई पेठ, २५६ गाळा, गांधीनगर भाग १,२,३ ते अंबादास तडगोपूल घराजवळ दुपारी २ वाजता आली आणि या पदयात्रेचा समारोप करण्यात आला. ही पदयात्रा उत्साह पूर्ण व जल्लोषपूर्ण वातावरणात निघाली. या पदयात्रेत राष्ट्रवादीसह इतर मित्रपक्षाचे अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी पदयात्रेत महेश कोठे, प्रथमेश कोठे, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश पलमारी, माजी नगरसेवक बंदपट्टे, उदय चाकोते, जनार्दन कारमपुरी, मादास काका, शशिकांत केंची, संतोष सोमा, उमेश मामड्याल, सर्फराज शेख, वाकसे, विठ्ठल कोटा, श्रीकांत गुर्रम, श्रीकांत कोंडा, मारुती नल्ला, अंबादास तडगोपुल, दिनेश अक्कल तसेच शेकडो नागरिक या पदयात्रेत सहभागी होते. विविध ठिकाणी महिलांनी अण्णांचे औक्षण करून स्वागत केले. यावेळी कोठे यांनी या भागातील कार्यकर्त्यांशी, स्थानिक नागरिकांशी हितगुज करीत प्रभागातील समस्याही जाणून घेतल्या.



## आ.विजय देशमुख यांच्या पदयात्रेस जोरदार प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर उत्तर भारतीय जनता पार्टी शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय, रयत क्रांती संघटना महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार विजय देशमुख यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्रमांक दोन जुना बोरामणी नाका येथे मंगळवारी सकाळी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेस महिलांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला.

आमदार विजय देशमुखसाहेब आगे बढो हम तुम्हारे साथ है भारतीय जनता पार्टीचा विजय असो, वच्छा रे वच्छा कमळ वच्छा अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. प्रभाग क्रमांक दोन जुना बोरामणी नाका येथील मातंग समाजाच्या देवीची पूजा करून या पदयात्रेस सुरुवात झाली. जोशी गल्ली, वडार गल्ली, सातपुते वस्ती, चिराग भवन येथे या पदयात्रेचा समारोप करण्यात आला. पदयात्रेत ठिकठिकाणी फुलांची उधळण, फटाक्यांची आतिषबाजी करत नागरिकांनी आमदार विजय देशमुख यांचे औक्षण करत त्यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पदयात्रेत भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस प्रा. नारायण बनसोडे, भाजपा नेते किरण देशमुख, माजी नगरसेविका शालन शिंदे, हरिकांत नाना सरवदे, कल्पना कारभारी, ज्ञानेश्वर कारभारी, शंकर शिंदे प्रवीण कांबळे बाबुराव जमादार, सोमनाथ रगबल्ले, विरेश उबंरजे, बसवराज इटकळे, बिपिन धुम्मा, राजकुमार माने, भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे शहराध्यक्ष जाकीर सगरी, राहुल घोडके यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते





## मराठी रंगभूमी दिनानिमित्त यलगुलवार, साळुंखे, दासरी यांना जीवनगौरव पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

मराठी रंगभूमी दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ सोलापूरतर्फे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, उपनगरीय शाखेचे अध्यक्ष विजयकुमार साळुंखे, महानगर शाखेचे अध्यक्ष प्रा. अजय दासरी यांना लायन्स जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष दिनेश बिराजदार यांनी दिली.

बुधवारी (दि.६) सायंकाळी ७.३० वाजता रंगभवन शेजारील हॅच फ्रि मेसॉनिक हॉल येथे प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा सुहासिनी शहा यांच्या शुभहस्ते लायन्स जीवन गौरव पुरस्कार समारंभ संपन्न होत आहे. सोलापुरातील नाट्य चळवळीस अमूल्य योगदान देणारे ज्येष्ठ रंगकर्मी प्रकाश यलगुलवार, आपल्या प्रकाश योजनेद्वारे नाट्य सादरीकरणात भव्यता आणणारे विजयकुमार साळुंखे व राजकीय क्षेत्रात वावर असूनही एक सशक्त कलावंत, गुणवंत दिग्दर्शक अशी ओळख असणारे प्रा. अजय दासरी यांना त्यांच्या नाट्य चळवळीतील योगदानासाठी व सोलापूरात नुकतेच झालेले १०० वे नाट्य संमेलन यशस्वी केल्याबद्दल शहा यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, हार व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. याप्रसंगी नांदी, नाट्यगीते व विविध नाट्यप्रवेश यांचे सादरीकरण होणार आहे. रसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेवाकार्य प्रमुख सुरेखा गंभिरे यांनी केले आहे. याप्रसंगी क्लब सचिव सचिन पाटील, कोषाध्यक्ष विकास पाटील व अण्णासाहेब कोतली आदी उपस्थित होते.

## डॉ. लालासाहेब तांबडे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**

येथील कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब रावसाहेब तांबडे यांना त्यांच्या कृषी विस्तारातील नावीन्यपूर्ण योगदाना बद्दल तसेच शेती आणि शेतकऱ्यांसाठी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल लाईफ टाईम अचीवमेंट २०२४ (जीवन गौरव पुरस्कार २०२४) हा मानाचा पुरस्कार नवी दिल्ली येथे आज दि. ५ नोव्हेंबर २०२४ रोजी नैसर्गिक शेतीवरील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभामध्ये सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

सदरील पुरस्कार तांत्रिक सतराच्या समारोप कार्यक्रमामध्ये कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकारचे कृषी आयुक्त सन्माननीय प्रभात कुमार व भारत सरकारच्या राष्ट्रीय माहिती केंद्राचे माजी महानिर्देशक, डॉ. आर पी सिंग व इंडियन सोसायटी ऑफ जेनेटिक्स अँड प्लांट ब्रीडिंग, भारतीय कृषी संशोधन संस्था नवी दिल्ली चे सचिव मा. डॉ. संजय कुमार सिंग यांचे हस्ते सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास देशभरातून अनेक मान्यवर उपस्थित होते.



खास कमी केलेल्या तिकिट दरात फक्त १०० रु
भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
हाऊसफुल्ल गर्दीत





12.30PM 09.30 PM
03.30 PM 06.30 PM
Book The Ticket At BookMyShow तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दोरीने गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या



**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**
राहत्या घरातील किचन खोलीतील लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेऊन तरुणाने आत्महत्याा केली. हा प्रकार सोलापुरातील भाररत्न इंदिरा नगरात सोमवारी रात्री ९.१५ च्या सुमारास घडला. बसवराज लशेप्पा पुरतगेरी (वय ३३) असे तरुणाचे नाव आहे. बसवराज हा राहत असलेल्या घरातील किचन खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. याबाबत नातेवाईकांनी पोलिसांना माहिती दिली. यानंतर सदर बझार पोलीस ठाण्यातील हवालदार इनामदार यांनी नातेवाईकांच्या मदतीने खाली उतरवून बसवराज यास बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच बसवराज मृत पावला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

# शहर मध्य, पंढरपूर, शहर उत्तरला चौरंगी लढत, बार्शी व माळशिरस दुरंगी तर दक्षिणमध्ये पंचरंगी

## करमाळा, माढा, सांगोला, अक्कलकोट, मोहोळमध्ये तिरंगी चुरशीचा सामना रंगणार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. ५ नाव्हेंबर-**
उमेदवारी अर्ज माघारीची प्रक्रिया संपल्यानंतर आता विधानसभा निवडणुकीत कोणत्या राजकीय पक्षात लढती होणार आणि कोणत्या मतदारसंघात कशा लढती होणार हे स्पष्ट झाले आहे. बार्शी व माळशिरस या दोन मतदारसंघात दुरंगी, करमाळा, शहर उत्तर, माढा, सांगोला, अक्कलकोट, मोहोळ या सहा विधानसभा मतदारसंघात तिरंगी, शहर मध्य आणि पंढरपूर-मंगळवेढा या दोन मतदारसंघात चौरंगी तर दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात पंचरंगी लढत रंगणार आहे. यंदा चांगल्या पावसाने जसा पाण्याचा सुकाळ आहे तसे विधानसभा निवडणुकीत देखील उमेदवारांचा सुकाळ पहावयास मिळत आहे. भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुती आणि काँग्रेस-शरद राष्ट्रवादी-उबाठा महाविकास आघाडीसह मनसे, वंचित, बसपा, रासप, रिपाई, प्रहार, स्वराज्य या प्रमुख राजकीय पक्षांसह अनेक अपक्ष देखील विधानसभा निवडणुकीच्या मैदानात नशिब आजमवात आहेत.

**जिल्ह्यातील कोणत्या विधानसभा मतारसंघात कशा लढती रंगणार हे पुढील प्रमाणे चित्र स्पष्ट आहे.**



**बार्शी दुरंगी लढत -** बार्शी या संवेदनशील मतदारसंघात एकनाथ शिंदे सेनेचे उमेदवार आ. राजेंद्र राऊत आणि ठाकरे शिवसेनेचे उमेदवार माजी मंत्री दिलीप सोपल यांच्यात मुख्य दुरंगी लढत होत आहे. या व्यतिरिक्त इतर पक्ष व अपक्ष असे एकूण २० उमेदवार मैदानात आहेत.



**माळशिरस दुरंगी लढत -** या राखीव मतदारसंघात भाजपाने पुन्हा आमदार राम सातपुते यांनाच संधी दिली आहे. तर शरद राष्ट्रवादीने उत्तम जानकर यांच्या हाती तुतारी देवून मैदानात उतरवले आहे. येथे या दोघांमध्ये प्रमुख लढत असली तरी इतर पक्ष व अपक्ष असे एकूण १२ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात आहेत.

प्रशांत माने
मो. ९८८११९१४४३



**अक्कलकोट तिरंगी लढत -** भाजपाचे सचिन कल्याणशेट्टी, काँग्रेसचे सिध्दाराम म्हेत्रे आणि मनसेकडून मल्लिकार्जुन पाटील अशी प्रमुख तिरंगी लढत आहे. तर इतर पक्ष व अपक्ष मिळून एकूण १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.



**माढा तिरंगी लढत-** या मतदारसंघात शरद पवार राष्ट्रवादीकडून अभिजित पाटील, अजित राष्ट्रवादीकडून ॲड. मिनल साठे तर रणजित शिंदे अपक्ष अशी तिरंगी लढत आहे. या व्यतिरिक्त इतर पक्ष व अपक्ष असे एकूण १३ उमेदवार मैदानात नशिब आजमावत आहेत. विशेष म्हणजे या मतदारसघात अभिजित पाटील नावाचे एकूण ४ तर रणजित शिंदे नावाचे एकूण २ उमेदवार निवडणुकीत आहेत. सेम नावामुळे मतदारांमध्ये संभ्रम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



**मोहोळ तिरंगी लढत-** मोहोळ या राखीव विधानसभा मतदारसंघात अजित राष्ट्रवादीकडून आ. यशवंत माने, शरद पवार राष्ट्रवादीचे राजू खरे नागनाथ क्षीरसागर हे रासपकडून मैदानात असल्याने येथे तिरंगी लढत होत आहे. या प्रमुख उमेदवारांसह इतर पक्ष व अपक्ष मिळून एकूण १० उमेदवार रिंगणात आहेत.



**करमाळा तिरंगी लढत -** शरद पवार राष्ट्रवादीचे नारायण पाटील, शिंदे सेनेचे दिग्विजय बागल आणि अपक्ष संजयमामा शिंदे अशी करमाळ्यात तिरंगी लढत आहे. या व्यतिरिक्त करमाळ्यात इतर पक्ष व अपक्ष मिळून एकूण १५ उमेदवार मैदानात आहेत. करमाळ्यात संजय शिंदे नावाचे दोन उमेदवार रिंगणात असून नाव सारखे असल्याने मतदार बुचकाळ्यात पडण्याची शक्यता आहे.



**सांगोला तिरंगी लढत -** येथे शिंदे सेनेचे शहाजीबापू पाटील, उबाठाचे उमेदवार दिपकआबा साळुंखे आणि शेकापचे बाबासाहेब देशमुख अशी तिरंगी लढत होत आहे. तीनही उमेदवारांचा राजकीय इतिहास मोठा असल्याने सांगोल्याच्या तिरंगी लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रमुख उमेदवारांसह इतर पक्ष व अपक्ष मिळून एकूण १३ उमेदवार निवडणुकीत लढत देत आहेत.



**शहर उत्तर चौरंगी लढत-** भाजपाचे आमदार विजयकुमार देशमुख, शरदचंद्र पवार राष्ट्रवादीचे महेश कोठे, मनसेकडून प्रशांत इंगळे यांच्यात तिरंगी लढत आहे. या प्रमुख उमेदवारांसह इतर पक्ष व अपक्ष मिळून एकूण २० उमेदवारही टक्कर देत आहे. अपक्ष शोभा बनशेट्टी या भाजपाचे माजी महापौर आहेत.



**शहर मध्य चौरंगी लढत-** भाजपाचे देवेंद्र कोठे, काँग्रेसचे चेतन नरोटे, माकपचे नरसय्या आडम, एमआयएमचे फारूक शाब्दी असे चौरंगी लढतीचे सध्याचे चित्र आहे. या व्यतिरिक्त इतर पक्ष व अपक्ष असे एकूण २० उमेदवार शहर मध्य मतदारसंघात निवडणुकीच्या मैदानात आहेत.



**पंढरपूर-मंगळवेढा चौरंगी लढत-** भाजपा समाधान आवताडे, काँग्रेस भगिरथ भालके, शरद राष्ट्रवादी अनिल सावंत, मनसेकडून दिलीप धोत्रे हे प्रमुख पक्ष आणि इतर पक्ष व अपक्ष मिळून एकूण २३ उमेदवार येथे नशिब आजमावत आहेत.



**दक्षिण सोलापूर पंचरंगी लढत-** अर्धा शहरी व अर्धा ग्रामीण अशी भौगोलिक रचना असलेल्या दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात भाजपाकडून सुभाष देशमुख, उबाठाचे अमर पाटील, मनसेकडून महादेव कोंगनुरे, वंचितकडून संतोष पवार आणि अपक्ष धर्मराज काडादी अशी पंचरंगी लढत या मतदारसंघात आहे. या प्रमुख उमेदवारांसह या मतदारसंघात इतर पक्ष व अपक्ष मिळून एकूण २३ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत.

## ▶▶क्राईम वृत्त...

### जागेच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**
जागेच्या वादातून तरूणास मारहाण करून जखमी करण्यात आले. सागर राजेंद्र पवार (वय ३२, रा. न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ४ नाव्हेंबर रोजी सकाळी पावणे दहाच्या सुमारास सागर पवार हा बोल्ली मंगल कार्यालय येथील महाराष्ट्र मिरजी दुकानसमोर असताना जागेच्या वादातून मैनोद्दीन बागवान व त्याच्या मुलांनी आणि इतर दोघां-तिघांनी ळिन लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांने मारहाण करून सागर यास जखमी केले. त्यामुळे सागर यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### फटाका फुटून सात वर्षाचा बालक जखमी

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**
फटाका फुटून सात वर्षाचा बालक जखमी झाला. हा प्रकार धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील बिजनवाडी येथे तीन नोंव्हेबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास घडला. संस्कार श्रीमंत सगट (वय ७) असे जखमी बालकाचे नाव आहे. दिवाळी सणानिमित्त संस्कार तीन नोंव्हेबर रोजी सायंकाळच्या सुमारास घरासमोर फटाके उडवत होता. त्यवेळी अचानक एक फटाका उडून चेह-याला भाजले. त्याानंतर धाराशिव येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून काका श्रीरंग यांनी येथील शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले आहे.

### मंद्रुपमधील तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथील तरुणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार सोमवारी सायंकाळी ६.३० च्या सुमारास उघडकीस आला. अंबादास गोपाळ व्हनमारे (वय ३१) असे तरूणाचे नाव आहे. अंबादास हा शेतातील वस्तीवर राहण्यास आहे. सोमवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास त्याने अज्ञात कारणातून पिकावर मारण्याचे औषध प्राशन केले. त्यानंतर त्याचा घसा कोरडा पडून त्यास उलटीचा त्रास होऊ लागल्यने मंद्रुप येथील रुग्णालयात उपचार करण्यात आले. यानंतर बहिण जगदेवी यांनी रात्री ८.२५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद झाली आहे.

### शेतात काम करणाऱ्या तरुणाला सर्पदंश

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**
शेतात काम करताना सर्पदंश झाला. हा प्रकार सोमवारी दुपारी २.४५ च्या सुमारास घडला. रामलिंग विठ्ठल भुरे (वय २१, रा. वाघोली, ता. मोहोळ) असे तरुणाचे नाव आहे. रामलिंग हा सोमवारी स्वत:च्या शेतात काम करत होता. त्यावेळी घोणस जातीचा सापाने त्याच्या उजव्या पायाच्या तळव्याला दंश केला. यानंतर रामलिंगच्या पायाला मुंग्या येत असल्याने मित्र यशवंत बेडगे यांनी दुपारी ४.४५ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### रिक्षाच्या धडकेंत ५० वर्षीय व्यक्ती जखमी

**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर -**
सैफुल चौकात रिक्षाने धडक दिल्याने एकजण जखमी झाला. हा प्रकार सोमवारी दुपारी ३.४० वाजता घडला.संजय बाबाराव नरुटे (वय ५०, रा. कोळेगाव, ता. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. संजय हे दुचाकीवरून सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास सोलापुरात आले होते. साहित्य घेण्यासाठी ते सैफुल चौकातील दुकानासमोर थांबले होते. त्यावेळी तेथून जाणा-या अज्ञात रिक्षाचालकाने त्यांना धडक दिली. यात चेहरा, नाक व हनुवटीला जखम झाली तसेच छातीला मुक्कामार लागल्याने सायंकाळी ५.४० वाजता बळवंत नरुटे यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले.

# मालमत्तेत विजयकुमार देशमुख नंबर वन

### सोलापूर शहर उत्तर निवडणुक : २४ कोटीची मालमत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**
महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ साठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. छाननी झाली आणि सर्व उमेदवारांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांमध्ये आपल्या संपत्तीचा लेखाजोखा देखील सादर केला आहे.

सोलापूर शहर उत्तरमध्येही स्थावर व जंगम मालमत्तेबाबतीत भाजपाचे उमेदवार आ. विजय देशमुख हेच नंबर वनवर दिसून येतात.आ. देशमुख यांच्या नावे जंगम मालमत्ता ७२ लाख ८३ हजार २९१ तर स्वत: संपादित मालमत्ता ६ कोटी ४५ लाख २७ हजार ७८७ इतकी आहे. यामध्ये सोने, चांदी, विविध बँकांतील ठेवींचा समावेश आहे. तर वारसाप्राप्त १६ कोटी ८२ लाख ०१ हजार १४२ इतकी मालमत्ता आहे. वरील मालमत्तेमध्ये कार, सोनेचांदीचा व इतर समावेश आहे.

### कोठेंकडे दीड कोटी, बनशेट्टींकडे २ कोटी

आ. विजय देशमुख यांच्या पाठोपाठ माजी महापौर महेश कोठे यांनीही आपली संपत्ती जाहीर केली असून, त्यांची स्थावर आणि जंगम मालमत्ता १ कोटी ३० लाख ३८ हजार ६१० इतकी आहे. या संपत्तीमध्ये त्यांच्याकडे कार, अंगठी, चेन, छोट्या कंपन्या, हॉटेल आदींचा समावेश केला आहे. तर त्यांच्या पत्नीकडे २९ लाख ८६ हजार ६५६ इतकी मालमत्ता असून, यामध्ये सोने-चांदीचा वगैरे समावेश आहे. मनसेचे उमेदवार परशुराम नागनाथ इंगळे यांची संपत्ती स्थुल मुल्य ६९ हजार ६०० इतकी आहे. तर पत्नीच्या नावे ३ लाख ४ हजार इतकी रक्कम आहे. तर माजी महापौर शोभा बनशेट्टी व त्यांच्या पतीच्या नावे २ कोटी २५ लाख ०७ हजार ११८ इतकी स्थावर व जंगम प्रापर्टी असून, यामध्ये सोने-चांदी आदींचाही समावेश आहे.

# काँग्रेसचे नेते महादेव चाकोतेंचे टिकास्त्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**
दहा वर्षांपूर्वी निवडणूक लढवून शहर उत्तरकडे पाठ फिरवलेले महेश कोठे यांचा शहर उत्तरमध्ये काय संबंध? कोण आहेत ते? असा प्रश्न काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाजार समितीचे माजी सभापती महादेव चाकोते यांनी उपस्थित केला. रेवणसिद्धेश्वर मंगल कार्यालय येथे सोलापूर शहर उत्तर मधील निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर काँग्रेसचे माजी अध्यक्ष प्रकाश वाले, माजी स्थायी समिती सभापती केदार उंबरजे, माजी नगरसेवक दत्तू बंदपट्टे, सिद्धाराम चाकोते, अशोक कलशेट्टी, उदय चाकोते, चक्रपाणि गज्जम,भारती ईपलपल्ली, संघमित्रा चौधरी, संध्या काळे आदींची उपस्थिती होती. खा. प्रणिती शिंदे यांच्या विरोधात शहर मध्य मध्ये दोन वेळा निवडणूक लढविणारे महेश कोठे यांना तिकीट देताना शरद पवार आणि सुशीलकुमार शिंदे यांनी विचार करायला हवा होता. जो माणूस शिंदे साहेबांना धोका देऊ शकतो; तो शरद पवारांना पण धोका देऊ शकतो. असा आरोपही चाकोते यांनी केला. यावेळी सुनील रसाळे व इतर पदाधिकाऱ्यांनी आपले विचार मांडले. यावेळी शहर उत्तर मधील काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाब्दी ४४ कोटी तर देवेंद्र कोठेंकडे ८ कोटींची संपत्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ नोव्हेंबर -**
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख संपल्यानंतर निवडणुकीचे खरे चित्र आता स्पष्ट झाले आहे. निवडणुकीच्या रिंगणात कोणते उमेदवार आहेत. याची यादी जाहीर करण्यात आली असून, त्यासोबतच त्यांच्या स्थावर व जंगल मालमत्ता देखील प्रसिद्ध करण्यात आले आहेत. एकंदर सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात एम.आय. एम, भाजप, काँग्रेस, माकप, आणि अपक्ष शेख यांच्यातच खरी पंचरंगी लढत होणार असून, सध्या मालमत्या बाबतीत एम.आय.एम पक्षाचे फारुख शाब्दी यांनीच मैदान मारल्याचे दिसत आहे.

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून एम.आय.एम.चे उमेदवार फारूक शाब्दी यांनी स्थावर व जंगम मलमत्ता संपादित करण्यात एक नंबर गाठला आहे. त्यांची सुमारे ४४ कोटींची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. तर त्यांच्या पत्नीकडे ३ कोटी ३१ लाख इतकी एकूण मालमत्ता आहे. त्यांच्याकडे एक रिवाल्वर आणि एक रायफल सुद्धा



आहे. यांची किंमत सुमारे ३ लाख इतकी आहे. फारूक शाब्दी यांच्याकडे सुमारे ४५ तोळे सोने आणि त्यांच्या पत्नी जुलेखा शाब्दी यांच्याकडे ४० तोळे सोने आहे. तसेच दीड किलो चांदी आहे. याशिवाय बीएमडब्ल्यू कंपनीच्या दोन कार त्यांची किंमत सुमारे ७४ लाख इतकी आहे. तसेच फोर्ड कंपनीची कर -३१ लाख फॉर्च्यूनर कंपनीची कर-३७ लाख आणि महिंद्रा कंपनीची थार कार-१५ लाख इतकी किंमत आहेत. त्याचप्रमाणे स्थावर मालमत्ता मध्ये मैंदर्गी, सोलापूर आणि मुंबई येथे स्वयंसंपादित केलेल्या जमिनी तसेच एक्सपोर्ट, हॉटेल्स, पार्टनरशिप व्यवसाय, शाब्दी रियालिटी, शाब्दी इंटरनॅशनल इत्यादी व्यवसाय आहे.

### चेतन नरोटे पावणे चार कोटी

काँग्रेस उमेदवार चेतन नरोटे यांच्याकडे देखील स्थावर मालमत्ता एकूण ३ कोटी ८७ लाख ९९ हजार इतकी आहे. तर जंगम मालमत्ता ही सुमारे १७ लाख ६४ हजार ५३४ इतकी आहे. त्यामध्ये टोयोटा कंपनीची इनोव्हा कार अंदाजे किंमत १२ लाख १४ हजार असून ३ तोळे सोने चैन अंदाजे किंमत २ लाख ५० हजार अंगठी १ लाख ६० हजार इतकी एकूण स्थावर व जंगम मालमत्ता विवरण निवडणूक कार्यालयात दाखल केली आहे. अपक्ष उमेदवार तौफिक शेख यांची एकूण मालमत्ता ही ३९ लाख ६६ हजार ७८० इतकी आहे. तर स्थावर मालमत्ता ही सुमारे ३६ लाख ४७ हजार ७०१ इतकी आहे. आणि त्यांची पत्नी सुफीया शेख यांची एकूण मालमत्ता ४ लाख १७ हजार इतकी आहे.

### आडम मास्तर ६६ लाख

दरम्यान देवेंद्र कोठे यांच्याकडे स्थावर व जंगम मालमत्ता सुमारे ८ कोटी ५१ लाख १९ हजार इतकी आहे. तर त्यांच्या पत्नी मोनिका कोठे यांच्याकडे ४ कोटी ४१ लाख ४०७ एकूण मालमत्ता आहे. देवेंद्र कोठे यांच्याकडे चैन व अंगठी २२४ ग्रॅम इतके सोने असून त्याचे एकूण मूल्य १७ लाख ७१ हजार २०० आहे. तसेच त्यांच्या पत्नीकडे नेकलेस गंठण व बांगड्या असे एकूण १८ लाख १० हजार ५६० इतक्या मूल्याचे सोने आहे. इतकी आहे. तसेच जंगम मालमत्ता एकूण १ कोटी ५ लाख ३६ हजार इतकी आहे. स्थावर व जंगम असे दोन्ही मालमत्ता मिळून एकूण मूल्य ११ कोटी ९७ लाख ६२ हजार ५०३ इतकी स्वयंसंपादित एकूण मालमत्ता आहे. त्याच पद्धतीने माकपाचे उमेदवार माजी आमदार आडम मास्तर यांच्याकडे एकूण ६६ लाख २७ हजार ३५२ इतकी मालमत्ता आहे. त्यामध्ये ९ लाख २७ हजार ३५२ इतकी जंगम मालमत्ता आहे. तर ८ लाखांची ईनोव्हा कार आहे. त्याचपद्धतीने स्थावर मालमत्ता ही सुमारे ५७ लाख इतकी आहे. त्यांच्या पत्नीकडे कामिनी आडम यांच्याकडे देखील १०० ग्रॅम वजनाचे सोने त्याची किंमत सुमारे ८ लाख इतकी आहे. तसेच स्थावर व जंगम मलमत्ता एकूण १४ लाख ३७ हजार ६५१ इतकी आहे. तसेच त्यांच्यावर एकूण ४५ गुन्हे दाखल आहेत. तर त्यापैकी अनेक गुन्हे हे न्यायप्रविष्ठ आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९३५

**तुका म्हणे भीड खोटी ।**
**लाभ विचाराचे पोटीं ।।**

माणूस हा चुकीचा पुतळा आहे. हे जरी खरे असले तरी त्याच्याकडून होणारी चूक ही जाणूनबुजून होते की अजाणतेपणी होते, हे विचारात घ्यावे लागते. त्याचबरोबर कोणाच्या दडपणाखाली किंवा भीडेखाली चूक होते, हे पण विचारात घेणे महत्वाचे असते. सद्सद्विवेक बुध्दीने काम करतांना व कसलाही अहेतू नसतांना जर एखादी चुक झाली तर त्याचा विशेषत्वाने पश्चात्ताप करण्याचे कारण नसावे असे वाटते. पण केवळ दुसऱ्याला बरे वाटावे किंवा स्वार्थ साधला जावा म्हणून जर चूक केली असेल तर त्याबाबत कर्त्याला दोषी ठरवावे लागेल. इतरांनी दोषी ठरविण्यापेक्षा कर्त्याने स्वत:च तो दोष मान्य करायला हवा. मूळात जे वाईट असते ते जाणून-बुजून केले काय? किंवा दुसऱ्याच्या भीडेपोटी केले काय? शेवटी त्याची फलनिष्पत्ती ही वाईटच असणार आहे. अशी वाईट गोष्ट भीडेपोटीसुध्दा करु नये. त्याचबरोबर अशी वाईट गोष्ट करण्याचा विचारही मनात येऊ देऊ नये. प्रेमापोटी, भीडेपोटी किंवा स्वार्थापोटी वाईट गोष्ट करण्याचा विचार मनातून सद्विचाराने काढून टाकावा. अर्थात, कोणत्याही कारणास्तव वाईट कृती करण्याच्या विचाराचा मनाने त्याग करावा. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणें भीडखोटी । लाभ विचाराचे पोटीं ।।



वाईट गोष्ट करण्याविषयीची भीड खोटी असल्याने विचाराने अशा भीडेचा त्याग करण्यातच लाभ असल्याचे महाराजांनी म्हटले आहे. संसारात माणसांकडून अशा अनेक वाईट गोष्टी घडून जातात की ज्या केवळ भीडेपोटीच्या असतात. आम्ही कोणाची भीड-भाड ठेवित नाही. असे माणूस म्हणतो फक्त. पण कृती करतांना मात्र भीड धरीत असतो. मनात नसतांनाही केवळ दुसऱ्याच्या आग्रहाला बळी पडणे म्हणजे भीड होय. दुसऱ्यांच्या आग्रहापोटी आपण काय-काय करतो, याचा विचार आपण केला म्हणजे आपल्याकडून घडलेल्या चुका आपणाला आठवतील. या चुकांची आठवण होऊनही माणूस पुन्हा भीडेपोटी त्या चुकांची पुनरावृत्ती करतो हे विशेष. मुळात अशा चुकाच होऊ नयेत म्हणून महाराजांनी भीडेचाच त्याग करण्याचा सल्ला दिला आहे. भीड ही मानवाला चांगले करण्यास जसे प्रवृत्त करते तसे वाईट करण्यासही प्रवृत्त करते. केवळ दुसऱ्याला बरे वाटावे किंवा समोरच्याची मर्जी राखली जावी म्हणून केलेले वाईट कृत्य कालांतराने का होईना पण कर्त्याला पश्चात्ताप करण्यास भाग पाडते. अशी पश्चातापाची वेळ येऊ द्यायची नसेल म्हणजेच स्वत:च्या नजरेतून स्वत:ला उतरु द्यायचे नसेल तर भीडेपोटीसुध्दा दुष्कृत्य न करणेच योग्य होय. वाईट ते वाईटच असल्याने मुलाबाळांच्या, पती-पत्नीच्या आग्रहापोटी बाहेर लोकांशी खोटे बोलणे, त्यांचे लाड पुरविण्यासाठी चोरी करणे, कोणाची फसवणूक करणे, पत्नीच्या किंवा पतीच्या आग्रहापोटी आई-वडीलांशी चुकीच्या पध्दतीने वागणे, अशा प्रकारची कृत्य अनेकांकडून केवळ भीडेपोटी घडत असतात. मी तर असे म्हणेन की, समोरच्यांच्या आग्रहापोटी वाईट कृत्य तर करुच नये. पण पोट भरलेले असतांना जेवणसुध्दा स्विकारु नये. कारण पोट भरलेले असतांना प्रेमापोटी जरी जेवण स्विकारले तरी ते अजिर्ण होऊन त्रासदायक ठरते. यावरुन आपण विचार करायला हवा की, मनात नसतांना केवळ दुसऱ्याच्या भीडेपोटी कांहीही करणे योग्य नसते. म्हणून अयोग्यतेस कारणीभूत ठरणारी ही भीडच आपण मूळात नष्ट करणे योग्य आहे. चांगल्या बाबी स्वीकारण्यात टाळाटाळ न केलेलीच बरी असते. उशीरा का होईना पण चांगल्या बाबी आपल्याबरोबर इतरांनाही चांगली फलश्रुती देत असतात. अशाने आनंदलहरी वाढताम हे खरे आहे. कारण चांगले ते चांगलेच असते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | काशिविश्वेर यात्रा, जेऊर |
| दि. ६ नोव्हेंबर २०२४ | ता. अक्कलकोट |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. पंचमी (२४.४०) | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मूळ (१०.५९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सुकर्मा (१०.४९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१२.३२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| दिनविशेष - पांडव पंचमी | |

### राशीभविष्य

**मेष :** व्यापारातील विचार सार्थक ठरतील. कार्यकुशलता, परिश्रमचे मिळेल. उत्तरदायित्वाची पूर्तता करु शकाल.

**वृषभ :** नोकरीत अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभेल. सहचरणी सोबतच्या संबंधात गोडवा येईल.

**मिथुन :** उद्योग-धंद्यात निष्काजीपणा, उतावळेपणा करु नका. डोके शांत ठेवावे लागेल. आर्थिक स्थिती चिंता वाढवणारी होऊ शकते. आईच्या प्रकृतीची काळजी घ्यावी लागेल.

**कर्क :** धैर्य आणि सहनशीलता राखा. तसेच बुद्धिमतेने कामे हताळा. नवीन योजना तयार होतील. उधारी मिळेल.

**सिंह :** अनेक दिवसांपासून रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. धार्मिक आस्था वाढेल. संपत्तीच्या खरेदी-विक्रीतून फायदा होईल.

**कन्या :** विश्वासाचे वातावरण राहिल. कुटूंबात योग्य ती कामे होतील. कामाच्या प्रशंसतेचे योग संभवतील. उतावळपणाने कोणतेही काम करु नका.

**तुळ :** कष्टाला यश मिळेल. कामातील अडचणी दूर होण्याचे योग आहेत. मोठया लोकांशी भेटी होतील.

**वृश्चिक :** विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष दिले पाहिजे. विनाकारण एखाद्याशी वाद होऊ शकतो. कामकाज साधारण राहील.

**धनु :** कठिण तसेच जबाबदारीच्या कामात विशेष सावधानतेचा परिचय द्यावा लागेल.

**मकर :** लाभाच्या संधी येतील. कामाविषयी उत्साह काय राहिल.

**कुंभ :** कामकाजात वाढ होईल, परंतू कामाचे योग्य फळ पदरात पडेल. कौटूंबिक परिस्थिती सम धानी राहील.

**मीन :** महत्तवाकांक्षा पूर्ण होतील. कामकाजात विस्तार होऊ शकेल. वेळेचा दुरुपयोग करु नका. मोठया लोकांशी भेटी-गाठी वाढतील.

# शहरात साचला कचरा; मक्ताच रद्द करा

### महापालिका कामगार संघटना कृती समितीचे उपायुक्तांना निवेदन

## महापालिका यंत्रणेमार्फतच पूर्वीप्रमाणे कचरा संकलन करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

शहरात रस्त्यावर अनेक ठिकाणी कचरा साचत असल्याने कचरा संकलनासाठी महापालिकेने नेमलेल्या मक्तेदाराचा मक्ता रद्द करावा. पूर्वीप्रमाणे महापालिका यंत्रणेमार्फतच कचरा संकलन करण्यात यावे, अशी मागणी महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

कृती समितीचे अध्यक्ष कामगार नेते अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली आज महापालिका उपायुक्त तैमूर मुलाणी यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले. वास्तविक पाहता शहरातील कचरा संकलनासाठी महापालिकेची यंत्रणा बंद करुन कंत्राटदारांना तब्बल ६५ कोटीचे कंत्राट खाजगी कंत्राटदाराला दिले आहे. कचरा संकलनासाठी १८० घंटागाड्या व इतर वाहने सुध्दा कंत्राटदारांना दिले आहेत. २ हजार १५० रूपये प्रति टन एवढा दुपटीचा दर देवून ही कंत्राटी पध्दत सुरु केली. तेव्हापासून कचरा सकंलनाची सतत बोंबाबोंब सुरु आहे, असा आरोप निवेदनात केला आहे.



### आरोग्य निरीक्षकांना ५ हजार रुपये दंड कशासाठी?

कचरा संकलनाची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असताना आरोग्य निरीक्षक यांना रुपये ५ हजार रुपये दंड कशासाठी ? हे तर ''चोर सोडून संन्याशाला फाशी'' या म्हणी प्रमाणे होईल. उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी आरोग्य निरीक्षकांवर दंडात्मक कारवाईचा आदेश चुकीचा आहे. कचरा का साचतो ? याचा अभ्यास करावा. आरोग्य निरीक्षकांना ५ हजार रुपये दंड करण्याची कार्यवाही रद्द करावी अन्यथा संघटनेला तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा कामगार नेते अशोक जानराव यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

### कामगारांना किमान वेतन दिले जात नसल्याचा आरोप

मक्तेदाराकडून घंटागाडीवरील कामगारांना वेळेवर पगार होत नसल्याने कामगारांकडून दोन-चार दिवस काम बंद केल्याने कचरा साचतो. मक्तेदार कामगारांना वेळेवर पगार देत नसतो. कामगारांना किमान वेतन देत नाही. मक्तेदारीमुळे भ्रष्टाचार वाढलेला आहे असा आरोप करत यामध्ये महानगरपालिका अधिकाऱ्यापासून कोणा कोणाचे हात ओले होत आहेत.याची कसून चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी निवेदनात केली आहे.

कचरा संकलन करणे, डम्पिंग करणे ही सर्व कामे खाजगी कंत्राटदाराने स्वतः ची यंत्रणा उभी करुन करायची आहेत. कंत्राटदार आणि महापालिका प्रशासन यांच्यात तसा लेखी करार झालेला आहे. आरोग्य निरीक्षकावर पाच हजार रुपये ५ हजार रुपये दंड करण्याऐवजी मक्तेदाराचा मक्ता रद्द करुन पूर्वी प्रमाणेच कचरा संकलन महापालिकेच्या यंत्रणेमार्फत करावा अथवा पिंपरी - चिंचवड महापालिकेप्रमाणे खाजगी मक्तेदार नेमावेत. तीन पाळीत कचरा उचलला पाहिजे.

घंटागाड्या घरोघरी जाऊन कचरा गोळा करतात मग रस्त्यावर जागोजागी कचऱ्यांचे ढीग का साचले जात आहेत ? याचा सखोल अभ्यास करावा. १८० घंटागाड्या फारच अपुऱ्या आहेत. त्यातील ही काही गाडया रस्त्यावरच बंद पडतात. शहराची लोकसंख्या, शहराचे क्षेत्रफळ विस्तार पाहता १८० घंटागाड्या फारच अपुऱ्या आहेत. अनेक लहान मोठ्या झोपडपट्ट्याची संख्या सुमारे १५७ आहेत. शहरात दररोज ३५० ते ४०० टन कचरा उत्पन्न होतो. त्यापैकी २०० ते २५० टन कचरा संकलन होवून डम्पिंग केला जातो. निवेदन देतेवेळी कार्याध्यक्ष शेषराव सिरसट यांच्यासह सुमारे ४५ आरोग्य निरीक्षक उपस्थित होते.



## गुजराती मित्र मंडळातर्फे सुनील दावडा यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

गुजराती मित्र मंडळातर्फे सुनील दावडा यांची पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठचे दिव्यांग कमिटीमध्ये सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष मुकेश मेहता यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी गुजराती मित्र मंडळाचे अध्यक्ष जयेश पटेल, मणिकांत दंड, चिमन पटेल व संदीप जव्हेरी, केशव रांभिया, विजय पटेल, रमेश गोरडीया, कौशिक शहा, कांति पटेल, संजय शहा, पारुल पटेल, अर्पिता बक्षी, लता मेहता, किर्ती दावडा उपस्थित होते.

## लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प सादरीकरण करण्यात आले.



या सादरीकरणासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी पर्यवेक्षक समितीमध्ये अध्यक्ष म्हणून मॉर्डन कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालय पुणेचे प्राचार्य डी. एस. काजळे व सचिव म्हणून डॉ. एस. एस. चौदंते हे लाभले होते. प्रारंभी प्राचार्य काजळे यांचे स्वागत लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप आदलिंगे यांच्या हस्ते व प्रा. चौदंते यांचे स्वागत प्रा. सायली बडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कृषीजैवतंत्रज्ञान अंतर्गत विविध विषयांवर त्यांचे संशोधन प्रकल्प सादर केले. प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने विविध पिकांचे टीशू कल्चर, सूक्ष्मजीवशास्त्रतील तंत्रज्ञानाचा वापर करून जनुकीय विविधता व पिकांचे संकर ओळखणे आदींचा समावेश होता. टीशू कल्चर प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने जिरॅनियम, ऊस लिंबू, डाळिंब, बांबू, साग, केळी, या पिकांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना कृषीजैवतंत्रज्ञान क्षेत्रात उतीसंवर्धन व सुक्ष्मजीवशास्त्राचा वापर करून पिकांची जैवविविधता कशी तपासली जाते, त्याचा वापर कशाप्रकारे पिकांच्या विविध जाती विकसित करण्यासाठी केला जातो, पिकांमध्ये संशोधन कशाप्रकारे केले जाते याविषयी विविध प्रकल्पांच्या माध्यमातून प्रात्यक्षिकांच्याद्वारे अनुभवता आले.

या कार्यक्रमाचे समन्वयन महाविद्यालयाचे प्रा. सायली बडेकर व प्रा. सागर महाजन यांनी व सुत्रसंचालन सोहम बोधले यांनी केले.

## सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये पालक सभेस प्रतिसाद

### टिचर्स गार्डीयन, टी जी मिटींग्सची प्रभावी संकल्पना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षातील विक्रम, धवण, रमण, कलाम, कल्पना, रामानुजन या सहा डिव्हिजन विद्यार्थी, पालक, शिक्षक मेळाव्यात पालकसभेचा वाढता प्रतिसाद आणि संख्या खूप असल्याने सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रात पालक मेळावा पार पडला.

यातून पालकांची आपल्या पाल्यांविषयी असलेली जबाबदारीची जाणीव दिसून आली. मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलगुरू एस. एच पवार यांची उपस्थिती होती. संस्था सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, जीएसईचे विभाग प्रमुख किरण पाटील यांची मंचावर उपस्थिती होती. पालक प्रतिनिधी आणि मान्यवरांच्या उपस्थिती दीपप्रज्वलन झाले. प्रास्ताविक प्रा. सुवर्णा क्षीरसागर यांनी केले.

जीएसईचे विभाग प्रमुख प्रा. किरण पाटील यांनी पालकांना प्रभावीपणे मार्गदर्शन केले. या मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या टाईम मॅनेजमेंट आणि महाविद्यालयातील हजेरीवर लक्ष देण्यावर चर्चा झाली. कार्यक्रम समन्वयक म्हणून डॉ.ए.ए. कांबळे यांनी काम पाहिले. शिस्तपालन विषयावर डॉ. व्ही.व्ही. खरात, डॉ. आय. एम. चंद्रकी यांनी मार्गदर्शन केले. दोन्ही सत्रातील सूत्रसंचालन विद्यार्थी मनस्वी पुजारी, साकेत कांबळे, आरती गायकवाड यांनी केले. संस्था सचिव संजय नवले म्हणाले, दहा वर्षापासून एकच प्राचार्य असल्याने महाविद्यालयाची प्रगती झाली असल्याचे सांगितले. सर्वोत्कृष्ट प्राचार्य, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय, सर्वोत्कृष्ट संस्था असे पुरस्कार मिळाले आहेत.



### आयुष्य जगायला शिकवणारी संस्था

तृतीय वर्षातील निवडक विद्यार्थ्यांने सिंहगडविषयी मनोगत व्यक्त केले. गौरी शिंदे, निखिल घोडके यांनी सिंहगडमधून शिक्षण तर मिळालेच पण क्वालिटीचे शिक्षण मिळाले. सुप्त कलागुणांना शोधून त्यास आकार देण्यासाठी प्रत्येक वेळी एक पाऊल पुढे टाकल्याचे म्हटले. कॅपस डायरेक्टर संजय नवले प्रत्येक विद्यार्थ्यांची काळजी घेत असल्याचे सांगताना युवा महोत्सवातील एक उदाहरण निखिल घोडके यांनी सांगितले. महाविद्यालय मिळालेले पुरस्कार आणि येथील नैसर्गिक वातावरण पाहून कॅप्टन महेश क्षीरसागर या पालकाने पुणे सोडून सिंहगड सोलापूरला प्राधान्य दिल्याचे सांगितले. प्रातिनिधिक स्वरूपात काही पालकांनीही आपले मनोगत व्यक्त केले.



## सदगुरु बहुउद्देशीय सामाजिक संस्थेची दिवाळी अनाथ आणि बेघरांसोबत साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

दिवाळी हा सण प्रकाशपर्व म्हणून देशभरात उत्साहात साजरा केला जातो. पालकांच्या प्रेमाला पोरके झालेल्या अनाथांना आपुलकीचा हात द्यावा या उद्धेशाने फराळाचे वाटप करून त्यांनाही दिवाळीच्या आनंदात सहभागी करून घेत येथील सदगुरु बहुउद्देशिय सामाजिक संस्थेने निलम नगर येथील शांताई अनाथ आश्रमात मुलांसोबत दिवाळी साजरी केली.

याप्रसंगी सदगुरु बहुउद्देशिय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री वंजारे-बनसोडे, संगप्पा कांबळे व राहूल उडाणशिव यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले.तसेच याप्रसंगी रस्त्यावरून फिरणारे तसेच सिव्हिल हॉस्पिटल समोरील अनाथांनाही यावेळी संस्थेच्या वतीने वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री वंजारे-बनसोडे, राजू नामन, तुकाराम द्यावरकोंडा आदीजण उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी गणेश मिसाळ, मल्येश जोगळेकर आदींनी परिश्रम घेतले.

# वर्तमानाचे भान बाळगा, आर्थिक नियोजनाशिवाय प्रगती अशक्य

## माजी कुलपती जफर सरेशवाला; एशियन मायनॉरिटीज् युनिव्हर्सिटीचा पायाभरणी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

ज्ञानाच्या आधारे जीवनाने प्रगती केली आहे. त्याच ज्ञानाच्या आधारे समाजातील विषमता मिटवू, स्त्रीयांवरील अन्याय रोखू, सामाजिक सांस्कृतीक व वर्णिय विषमता रोखत स्वातंत्र्याचे रक्षण करणारी कोनशीला विद्यापीठ कार्यस्थळावर उभी करुन वळसंग येथे एशियन मायनॉरीटी युनिव्हर्सिटीचा पायाभरणी सोहळा पार पडला.

ग्लोबल एज्युकेशनल अँड हेल्थ ऑर्गनायझेशन सोलापूर, एशियन सेंटर फॉर सोशल स्टडीज व मासिक गुलबूटेच्या वतीने नियोजित एशियन मायनॉरिटी युनिव्हर्सिटीच्या पायाभरणी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे औचित्य साधून दि. हेरिटेज लॉन, सोलापूर येथे सकाळी दहा ते रात्री दहा पर्यंत अल्पसंख्यांक शैक्षणिक समन्वय परिषद पार पडली.

परिषदेचे उदघाटक म्हणून बोलताना माजी कुलपती जफर सरेशवाला यांनी वर्तमानाचे भान बाळगा, राजकीय परिस्थिती बदलली आहे. वर्तमानाशी मेळ घालणारे शिक्षण घेत आधुनिकतेकडे वाटचाल करा. अल्पसंख्यांकाची राजकीय व सामाजिक स्थिती शिक्षणाच्या अभावामुळे खालावत चालली आहे. सांस्कृतीक पातळीवर आपण कोण आहोत हे आपण विसरत चाललो आहोत. आर्थिक नियोजनातील मगासलेपणा, कौटुंबिक जीवनाचे खालावणारे स्तर या बाबी आपली सामाजिक प्रतिमा निर्धारीत करत आहेत. आधुनिक शिक्षण घेऊनच आपण यातून बाहेर पडू शकतो, असे सांगितले. अध्यक्षीय भाषणाआधी सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, हैदराबादचे आमदार आमीर अली खान यांनी नवीन विद्यापीठाच्या उभारणीस शुभेच्छा दिल्या. उद्घाटनानंतर मुस्लिम समाजातील शिक्षणाची स्थिती, आधुनिक शिक्षणाची गरज, मुस्लिम शिक्षण संस्थांची स्थिती या विषयावर तीन सत्रात परिषद संपन्न झाली या सत्रांमध्ये अलीगड विद्यापीठाचे प्रा. सऊद आलम कासमी, प्रा. शाहीद खोत, प्राध्यापक डॉ. शाफय कीदवाई, मौलाना सज्जाद नोमानी, समीर सिद्दीकी, मुबारक कापडी, खालीद सैफुद्दीन, आमीर अन्सारी, डॉ. अंजुम कादरी यांनी विचार व्यक्त केले.



### पायाभरणी एक ऐतिहासिक क्षण : आ. आमिर अली खान

अल्पसंख्यांक शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी सोलापूर सारख्या शहरामध्ये विद्यापीठाची उभारणी केली जात आहे, हे खूप महत्वाचे आहे. शिक्षणाशिवाय अल्पसंख्यांक समाज आजच्या स्थितीत बाहेर पडू शकत नाही. त्यामुळे सर्व प्रकारच्या परिवर्तनासाठी हे विद्यापीठ उभारणी ही समाजाची ऐतिहासिक गरज आहे. त्यामुळेच हा क्षण देखील ऐतिहासिक आहे. असे मत आमदार अमीर अली खान यांनी मांडले.

या परिषदेला कतर येथून आलेले हसन चौगुले मुफ्ती अमजद अली काजी, डॉ. मोहम्मद अली पाटणकर, इकबाल मेमन ऑफिसर, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड चे सचिव मौलाना मोहम्मद उमरैन मेहफूज रहमानी, लखनऊ जिल्हा पोलीस अधिक्षक सलमान ताज पाटील हे उपस्थित होते. उर्दू अकादमीचे सय्यद शोएब हाश्मी, सय्यद सरवर चिश्ती (अजमेर), डॉ. गझनफर अली (नवी दिल्ली), डॉ. साऊद आलम कास्मी (अलीगड) हे उपस्थित होते. शिक्षण परिषदेचे सुत्रसंचालन मोईज़ सिराज अहमद यांनी केले. शिक्षण परिषद यशस्वी करण्यासाठी सरफराज अहमद, ॲड. महिबूब कोथिंबीरे, सी. ए. मौलाना शेख, जुबेर शेख, अक़ीद शेख, अल्ताफ कुडले, अल्ताफ जकलेर, गनी कुरेशी, प्रा. गौस शेख, सरफराज अहमद, मुर्तज धोटेघर, अली हसन, मुदस्सर पिरजादे, इरफ़ान पटेल, अ. समी सय्यद, मोहम्मद माझ, अब्दुल्लाह शेख, वाइज़ सय्यद, जुनेद अत्तार, अहमद सरवर यांनी परिश्रम घेतले.

### नवीन विद्यापीठ स्थापनेची तळमळ आदर्श ठरेल : हसन चौगुले

सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या नेतृत्व करणारा व्यक्ती शैक्षणिक पातळीवर प्रगल्भ विचार करणारा असेल. तर तो समाजाला एक नवे शैक्षणिक व सांस्कृतिक भान देवू शकेल. आसिफ इक्बाल यांनी विद्यापीठ स्थापनेसाठी घेतलेला पुढाकार या दृष्टीने महत्वाचा आहे. नव्या नेतृत्वाच्या निर्मितीसाठी तो गरजेचा आहे. त्यामुळे त्यांचे हे पाऊल आदर्श ठरेल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पालखी सोहळा, दिंडीधारकांनी आगाऊ प्लॉटची मागणी नोंदवावी

## कार्तिकी यात्रा सोहळा; ६ नोव्हेंबरपासून प्लॉट नोंदणी : प्रांताधिकारी सचिन इथापे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ नोव्हेंबर-**

कार्तिकी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा १२ नोव्हेंबर २०२४ रोजी साजरा होत आहे. कार्तिकी यात्रेत येणाऱ्या शेकडो दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस् भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. प्रथम येणाऱ्या पालखी, दिंडी धारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार असून ०६ नोव्हेंबर पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात येणार आहे.





संबंधितांनी आगाऊ प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

कार्तिकी यात्रेला येणाऱ्या पालख्या, दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर ( ६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. त्यामुळे या ठिकाणी भाविकांची प्रचंड गर्दी होते.या ठिकाणी एकूण ४९७ प्लॉटस् असून त्यापैकी वापरायोग्य ४५० प्लॉटस् आहेत.

हे प्लॉटस् भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी नायब तहसीलदार सुधाकर धाईंजे यांची सेक्टर मॅनेजर म्हणून म्हणून नियुक्ती केली आहे.भाविकांना प्लॉटस् वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत.

दिंडी, पालखी समवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर ६५ एकर येथे प्लॉटस्चे वाटप करण्यात येणार आहे. कार्तिकी एकादशीच्या सोहळ्या अगोदर दिंडी, पालखीतील भाविकांनी प्लॉटसाठी मागणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रथम येणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

### यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन

या ठिकाणी भाविकांना मूलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसीलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र,९७६७२४८२१०), तसेच सहाय्यक बी.ए वागज (मो.क्र. ७७५६०१२५७८) व प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३ ) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### पंढरपुरात ८, १२, १६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची खर्च तपासणी

**पंढरपूर, दि.५ नोव्हेंबर -**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणा-या सर्व उमेदवारांची निवडणूक खर्च लेखा तपासणी ८,१२ व १६ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात येणार आहे. सदर खर्च तपासणी वेळी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील कलम ७७ मधील तरतुदीनुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या निवडणूक खर्चाचे अभिलेखे उपलब्ध करून देणे अपरिहार्य आहे. त्यानुसार प्रथम खर्च लेखा तपासणी शुक्रवारी ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं ५ वाजेपर्यंत, व्दितीय खर्च लेखा तपासणी मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत तर तृतीय खर्च लेखा तपासणी शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत शेतकी भवन, पंचायत समिती, पंढरपूर येथे करण्यात येईल. पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक खर्च निरीक्षक के. पी. जेयकर हे वरील दिनांकास व वेळेस शेतकी भवन, पंचायत समिती, पंढरपूर येथे खर्च तपासणीकरीता उपलब्ध राहणार आहे. जे उमेदवार खर्चाचे लेखे तपासणीकरीता सादर करणार नाही, त्यांच्यावर निवडणूक आयोगामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन पंढरपूर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.



### हातीदच्या सरपंचपदी शिवसेनेच्या संगीता घाडगे बिनविरोध

**सांगोला, दि. ५ नोव्हेंबर-**

हातीद (ता. सांगोला) येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी शिवसेनेच्या संगीता बबन घाडगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर शिवसेनेच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी फटाके फोडून गुलालाची मुक्त उधळण करीत जल्लोष साजरा केला. दरम्यान आ.शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते नूतन सरपंच संगीता घाडगे यांचा सत्कार करण्यात आला. हातीद ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच शालन भगत यांनी पदाचा राजीनामा दिला होता. सोमवारी ग्राम पंचायत कार्यालयात मंडलाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा बरबडे पाटील यांच्या उपस्थितीत सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी शिवसेनेच्या संगिता घाडगे यांच्या एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी शालन भगत, उपसरपंच संतोष अधटराव, प्रदीप घाडगे, कुलदीप घाडगे, संतोष कोळी, तानाजी घाडगे, संभाजी चव्हाण, भाऊसो घाडगे, सूर्यकांत घाडगे, संजय केदार, अशोक घाडगे, नानासो घाडगे, गणेश घाडगे, आदिनाथ घाडगे, सुरज घाडगे, विकास घाडगे, वैभव घाडगे, प्रतीक घाडगे, मयूर घाडगे, नामदेव घाडगे, राजकुमार कदम, प्रदीप घाडगे, प्रवीण घाडगे, राहुल घाडगे, ग्रामसेवक बाबासाहेब नरळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### अभिजीत पाटील यांची पिराची कुरोली, पटवर्धन कुरोलीत सभा

**पंढरपूर, दि. ५ नोव्हेंबर-**

विद्यमान आमदारांनी माढ्यात कोणताही विकास केला नाही. महापुरुषांचे पुतळेही उभा करू शकले नाहीत. शेतकऱ्यांच्या उसाला दर दिला नाही. करकंबमध्ये नगरपरिषद होऊ दिली नाही. माढ्याला पिण्याचे पाणीसुद्धा ते देऊ शकले नाहीत. यामुळे येथील जनता त्रस्त झाली आहे. एमआयडीसीचा प्रश्न एका वर्षात पूर्ण करून दाखवतो. या माध्यमातून या भागातील वीस हजार तरुणांच्या हाताला काम देण्याची भूमिका पार पाडेन. मी आमदार झाल्यानंतर विधानसभेतील पहिल्या भाषणांत मराठा आरक्षण या विषयी प्रश्न उपस्थित करीन असा विश्वास अभिजीत पाटील यांनी दिला. माढा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांची रविवारी मतदारसंघातील पिराची कुरोली, देवडे, खेडभोसे, शेवते, तरटगाव आणि पटवर्धन कुरोली येथे सभा पार पडली. यावेळी हजारो नागरिकांच्या उपस्थितीत हलगीच्या कडकडाटासह फटाक्याच्या आतिषबाजी करत मोठ्या उत्साहात अभिजीत पाटील यांचे स्वागत करण्यात आले.

# श्रीक्षेत्र अक्कलकोटमध्ये दीपावली सुट्टीमुळे प्रचंड गर्दी

## तीर्थक्षेत्र मास्टर प्लॅन राबविण्यास कधी मुहूर्त लागणार; भाविकांमधून सवाल




**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ नोव्हेंबर-**

दीपावली सुट्टीनिमित्त अक्कलकोट तीर्थक्षेत्री स्वामी भक्तांची प्रचंड गर्दी झाल्याचे दिसून येत आहे. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान परिसरात लाखोंच्या संख्येने भाविक श्रीक्षेत्र अक्कलकोटमध्ये दाखल होत आहेत. भाविकांची दर्शन रांग फत्तेसिंह चौकाकडे वाढत आहे. बुधवारपेठ समाधी मठ, गुरुमंदिर परिसरात भाविकाची प्रचंड गर्दी होत आहे. वाढत्या वाहनांमुळे अक्कलकोट तीर्थक्षेत्र मास्टर प्लॅन राबविण्यास, पालखी मार्ग रुंदीकरणास कधी मुहूर्त लागणार अशी भावना भाविकांतून व्यक्त होत आहे.

अक्कलकोट तीर्थक्षेत्री दत्त अवतार श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांच्या संख्येत दिवसेंदिवस प्रचंड वाढ होत असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. जसेजसं काळ पुढे सरकत आहे तसे प्रत्येक वर्ष-दिवसागणिक येणाऱ्या भाविकांच्या संख्येत प्रचंड वाढ होत आहे. राज्यासह परराज्यातून, परदेशातून श्रींच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत आहे. पहाटेपासूनच श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व समाधी मठ (चोळप्पा), गुरु मंदिर अन्नछत्र मंडळ, राजेराय मठ येथे भाविकांची मोठी गर्दी होत आहे. श्रींच्या दर्शनानंतर भाविकांनी महाप्रसादाकरिता अन्नछत्र मंडळात गर्दी होत आहे. दर्शनासाठी गुरुमंदिर, बाळप्पा मठ, एकमुखी दत्त मंदिर, शिवपुरी-यज्ञनगर, श्री खंडोबा मंदिर, श्री तुळजाभवानी मंदिर, राजेराय मठ, शमी विघ्नेश गणेश मंदिर आदी ठिकाणी दर्शनासाठी तर अन्नछत्र मंडळात कपिला गाय, स्वामींची उभी मूर्ती येथे सेल्फीसाठी गर्दी होत आहे.

पोलिसांचा मोठा फौजफाटा मंदिर परिसरात वाहतूक सुरळीत, सुरक्षित करण्यासाठी मग्न होता. निवडणूक काळामुळे अतिरिक्त सशस्त्र सुरक्षा बलही मंदिर परिसरात तैनात आहे. मंदिर परिसरात चारचाकी, ऑटोरिक्षांना काही अंतरावर प्रवेशबंदीची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याने भाविकांचा वावर असुरक्षित वाटत होता. दिपावली काळात रोज सुमारे १ लाखापेक्षा अधिक भाविक अक्कलकोट क्षेत्री दर्शनार्थ दाखल होत आहेत.

### या बाबींची पूर्तता व्हावी

पंढरपूर, तुळजापूर, शेगाव, शिर्डी तीर्थक्षेत्राच्या धर्तीवर अक्कलकोट क्षेत्री मोठे रस्ते भाविकांना प्रसाधनगृहे, स्वच्छता, पिण्याचे पाणी, भूमिगत विद्युत केबल यंत्रणा, ड्रेनेज कामे त्वरित हाती घ्यावी लागणार असल्याची प्रतिक्रिया स्वामीभक्त नरेश अहिर पुणे, संभाजी जाधव ठाणे, वैभव पवार यांनी व्यक्त केली.



# अन्नछत्र मुंबईकरांसाठी शक्ती, भक्तीस्थळ : आ. चित्रा वाघ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ नोव्हेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्मार्ट उपक्रम हाती घेतल्याने तीर्थक्षेत्र अक्कलकोटच्या विकासात भर पडत असून, अन्नछत्र हे आम्हा मुंबईकरांचे धार्मिक शक्ती-भक्ती स्थळ असल्याचे मनोगत नूतन आमदार चित्राताई वाघ यांनी व्यक्त केल्या.

त्या श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी श्री तुळजाभवानी मता मंदिरात जाऊन आमदार चित्राताई वाघ यांनी दर्शन घेतले. याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपा महिला आघाडीच्या सुरेखा होळीकट्टी, भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, आरपीआय (आठवले गट) तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, सो.म.पा.माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, दुधनी कृषी उत्पन्न बजार समितीचे उप सभापती सिद्धाराम बाके, नागराज कुंभार हे उपस्थित होते.

यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मंडळाचे विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, प्रविण देशमुख, न्यासाचे पुरोहित अप्पू पुजारी, अमित थोरात, बाळासाहेब घाडगे, निखिल पाटील, प्रविण घाडगे, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, गणेश भोसले, संतोष माने, गोरख माळी, बाबुशा महिंद्रकर, कल्याण देशमुख, सतीश महिंद्रकर, चंद्रकांत हिबारे, दत्ता माने, मल्लिनाथ कोगनुरे, स्वामिनाथ गुरव, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, राजू पवार, प्रसाद हुल्ले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# पंढरपुरात चिन्हांचेही वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ नोव्हेंबर-**

पंढरपूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांना सोमवारी चिन्हांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे येत्या काळात प्रत्येक उमेदवाराला मतदारराजापर्यंत स्वतःचे चिन्ह पोहचविणे सोयीचे होऊन खरोखरच प्रचाराला वेग येणार आहे.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघात- उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून यामध्ये समाधान आवताडे (भाजपा, कमळ), दत्ता रामचंद्र वाडेकर (बहुजन समाज पार्टी, हत्ती), दिलीप काशिनाथ धोत्रे (मनसे, रेल्वे इंजिन), भगिरथदादा भारत भालके (काँग्रेस, हात), अनिल सुभाष सावंत ( राष्ट्रवादी श.प.पक्ष, तुतारी वाजवणारा माणूस), अशोक रंगनाथ माने (वंचित बहुजन आघाडी, गॅस सिलेंडर), पंकज हरिश्चंद्र देवकते (राष्ट्रीय समाज पक्ष, ट्रम्पेट), राजेंद्र बापू बेंदरे (महाराष्ट्र लोकहितवादी पार्टी, चालण्याची काठी), सुदर्शन रायचंद्र खंदारे (अखिल भारतीय सेना, टेबल), अब्दुलरोफ उर्फ रज्जाक जाफर मुलाणी (अपक्ष, शिवणयंत्र), अण्णा सुखदेव मस्के (अपक्ष, मुसळ आणि खलबत्ता), आशफान अब्दुल सय्यद (अपक्ष,बासरी), अमोल सुरेश गायकवाड (अपक्ष, ऑटोरिक्षा), तुळजाराम भीमराव बंदपट्टे (अपक्ष, बॅट), दर्शना श्रीगणेश माने देशमुख (अपक्ष, सफरचंद), निशिकांत बंडू पाटील (अपक्ष, बॅटरी टॉर्च), बिराप्पा मधुकर मोटे (अपक्ष, किटली), युसुफ राजमहंमद मुजावर (अपक्ष, एअर कंडिशनर), ॲड. बापू दादा मेटकरी (अपक्ष, शिट्टी), संजय हणमंत वाघमारे (अपक्ष, कपाट), विठ्ठल भीमराव बोरकडे (अपक्ष, जहाज), श्रीकांत श्रीमंत नलावडे (अपक्ष,ऊस शेतकरी), सिद्धाराम सोमण्णा काकणकी (अपक्ष, रोडरोलर ), ज्ञानेश्वर अरुण पंचवाघ (अपक्ष, प्रेशर कुकर).

# गौडगाव मंदिरात घुमला बजरंगबलीचा नारा

## दिवाळी पाडव्यानिमित्त राज्यासह परराज्यीतल भाविकांची मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ नोव्हेंबर-**

जय श्री राम, जय बजरंगबली, पवनपुत्र हनुमान की जय या जयघोषचा जयजयकार करीत दीपावळी पाडव्यानिमित्त गौडगांव येथील श्री जागृत मारुतीच्या दर्शन घेऊन राज्य व परराज्यातील हजारो भाविक भक्त जल्लोष साजरा केला.

दीपावळी सणाच्या निमित्ताने अक्कलकोट तालुक्यातील गौडगांव येथील रामदास स्वामी स्थापित दक्षिणमुखी श्री जागृत मारुती मंदिरात भविकांची मोठी गर्दी केली होती. मंदिरातील फुलाची विविध रंगाच्या आकर्षक सजावट व मारुतीचे गोजिरे रूप पाहून, मारूतीचे मनमोहक दर्शनाने भक्त सुखावले. मंदिराचे परिसर शेकडो पणत्यांच्या प्रकाशाने झगमगून निघाले होते. दिवाळी लक्ष्मीपूजन व पाडव्यानिमित्त



श्री जागृत मारुतीच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने आले होते. या पार्श्वभूमीवर मंदिर परिसराची केलेली सजावट मनमोहक दिसून आले. या सजावटीमुळे संपूर्ण मंदिराचे रुपडे बदलून आकर्षक दिव्यांनी उजळून निघाले होते. दिवाळी पाडव्याला मारुतीचे दर्शन केल्याने सुख प्राप्त होत असते, अशी भाविकांची अपार श्रद्धा आहे. त्यामुळे पाडव्यानिमित्त मारुतीच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भक्तांची मोठी गर्दी झाली होती. पहाटेपासून सुरू झालेली भाविकांची लगबग रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

यावेळेस मारुतीस अभिषेक, रुद्राभिषेक, होमहवन, महाआरती कार्यक्रम पार पडला. सकाळी पहाटेपासून सुरू झालेली गर्दी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. राज्य व परराज्यातून आलेल्या भाविकांनी मारुतीचे दर्शन शांततेत घेत होते. यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, सिद्राम वाघमोडे, प्रकाश मेंथे, चौडप्पा सोलापुरे, बिराप्पा पुजारी, शांतय्या स्वामी, प्रकाश सनकळ, ज्ञानेश्वर फुलारी, परमेश्वर सुतार, मल्लिनाथ शेरीकर, भारत नन्नवरे, शिवप्पा फुलारी व मंदिराचे सेवेकरी आर्दीनी परिश्रम घेतले.

### महाप्रसादाचाही भाविकांनी घेतला लाभ

हजारो भाविक भक्त श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचे लाभ घेऊन तृप्त झाले. या अन्नछत्राची महती राज्य व परराज्यात पोहोचलेली आहे. अन्नदान केल्याने पुण्य प्राप्त होत असते, म्हणून शासकीय, निम शासकीय, राजकीय उद्योजक, समाजसेवा व अन्या लोकांकडून महाप्रसादाच्या रूपातच अन्नदान दिले जाते. येणारे प्रत्येक भाविक भक्त अन्नछत्र मंडळातील महाप्रसाद घेऊन तृप्त होत असतात. महाप्रसाद घेण्यासाठी सकाळपासून सुरू झालेली गर्दी रात्री ८ वाजेपर्यंत सुरू होते.

# राज ठाकरे यांची आज मंगळवेढ्यात जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची बुधवारी ६ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार दिलीपबापू धोत्रे यांच्या प्रचारार्थ दुपारी १ वाजता मंगळवेढा शहरातील शिवप्रेमी चौक येथील आठवडा बाजार येथे जाहीर सभेचे आयोजन केले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार दिलीपबापू धोत्रे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून महाराष्ट्रात सर्वात अगोदर त्यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील सर्व गावे ते पिंजून काढत असून त्यांच्या सभांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. विविध पक्षाचे, गटाचे कार्यकर्ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये प्रवेश करीत आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते घरोघरी जाऊनदेखील प्रचार करीत आहेत. त्यांची प्रचाराची एक फेरी पूर्ण झाली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर प्रचाराला सुरुवात केली असून पहिल्या टप्प्यातच पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील उमेदवाराची सभा घेत असून बुधवारी मंगळवेढा येथे ते आहेत.

राज ठाकरे यांनी पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघांमध्ये वैयक्तिक लक्ष घातले असून गेल्या महिन्यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेस राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे हे देखील उपस्थित राहिले होते. दरम्यान धोत्रे यांनी उमेदवारी अर्ज भरताना हुन्नूर येथील श्री बिरोबा,





हुलजंती येथील महालिंगराया, मंगळवेढा येथे श्री संत दामाजी, संत चोखामेळा पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन पंढरपूर शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून उमेदवारी अर्ज भरला होता. पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील अनेक प्रश्नांना दिलीप धोत्रे यांनी वाचा फोडली असून जनतेचा त्यांना उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्यातच मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे ६ नोव्हेंबर रोजी मंगळवेढा येथे येत असून त्यांच्या भाषणाकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. या सभेला हजारोंची संख्येने नागरिक उपस्थित राहतील असा देखील विश्वास यावेळी दिलीप धोत्रे यांनी व्यक्त केला.

### मनसेने घडविले तीर्थाटन

निवडणुकीच्या अगोदर दिलीप धोत्रे यांनी हजारो हिंदू बंधू-भगिनींना काशी, आयोध्या, तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची आई अंबाबाई, आदमापूरला बाळूमामा तसेच हजारो मुस्लिम बांधवांना अजमेर, हजारो बौद्ध बांधवांना दीक्षाभूमी नागपूर यात्रा काढून दर्शन घडवले आहे.

# बार्शीत २० जण निवडणूक रिंगणात

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ नोव्हेंबर-**

बार्शी विधानसभा निवडणुकीसाठी दाखल अर्जापैकी ३१ उमेदवार पात्र ठरले. त्यापैकी ११ उमेदवारांनी माघार घेतल्याने आता आ. राजेंद्र राऊत व माजी मंत्री दिलीप सोपल यांच्यासह २० जण निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

मनोज जरांगे-पाटील यांच्याकडून इच्छुक असलेल्या बाजार समितीचे माजी संचालक साहेबराव देशमुख यांनी जरांगे-पाटील यांची सूचना धुडकावत उमेदवारी कायम ठेवली आहे. युवराज काटे, भाऊसाहेब आंधळकर, आनंद काशीद, विजय साळुंके आदींनी जरांगे यांच्या सूचनेमुळे अर्ज मागे घेतले. ३७ जणांनी अर्ज भरले होते. त्यापैकी ६ जण छाननीत अपात्र ठरले. उर्वरित ३१ पैकी भाऊसाहेब आंधळकर, कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांचे नातू नंदकुमार जगदाळे, परमेश्वर पासले, युवराज काटे, आनंद काशीद, विजय साळुंके, दिलीप साठे, प्रमोद घोडके, रामेश्वर कुलकर्णी, अनिल गावसाने, गुलमोहम्मद आतार या ११ जणांनी अर्ज माघार घेतली. आ. राजेंद्र राऊत, माजी मंत्री दिलीप सोपल, आनंद यादव, मधुकर काळे, मनोज कांबळे, आकाश दळवी, किशोर गाडेकर, मोहसीन तांबोळी, धनंजय जगदाळे, साहेबराव देशमुख, विनोद यादव, लालू सौदागर, अब्बास शेख, ईस्माईल पटेल, शरीफ शेख, समीर सय्यद, किरण मांजरे, मोहसीन पठाण, किशोर देशमुख, वर्षा कांबळे या २० जणांचा समावेश आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## मनसेचे उमेदवार महादेव कोगनुरे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन

**मंद्रुप, दि. ५ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार महादेव कोगनुरे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, प्रशांत इंगळे जैनुद्दीन शेख, रोहित कलशेट्टी व उमेदवार महादेव कोगनुरे यांच्या हस्ते करण्यात आले. सत्तार सय्यद, निलेश भंडारे, आकाश निंबाळकर, विशाल गुजले, पवन देसाई, यश महिंद्रकर, दिनेश हंचाटे, राहुल अक्कलवाडे, प्रदीप बंडे, अनिल भिसे, सुरेखा गोब्बुर, तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना व एमके फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





## श्री श्री गुरुकुलच्या वतीने साडी, फराळाचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ५ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुलच्या वतीने ग्रामपंचायत सफाई कर्मचारी, पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना साडी, ड्रेस व फराळाचे वाटप जेष्ठ सम ाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजुरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, बाळकृष्ण घोडके- पाटील, सिद्धाराम धमुरे, अविनाश मोकाशे, अजय अणदूरकर चंद्रकांत गुड्डु, गुणवंत मुळे, बाबू शेख, करबसप्पा धमुरे, शिवराज मुळे, मल्लिनाथ नरे,डॉ हरिदास मुंडे, सचिन गुड्डु, शिवाजी कांबळे, सुहास कंदले, मल्लिनाथ मुळे, दीपक मोकाशे, खंडू मुळे आदींच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले. यावेळी श्री श्री गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे यांच्या वाढदिवसानिमित्त खडकाळी मॉर्निंग ग्रुपतर्फे सत्कार करण्यात आला. सफाई कर्मचारी विकास कदम, बापू कांबळे, कुसुम गायकवाड, आशा शिंदे, सुनिता कांबळे, माया बनसोडे, गणपती कोरे, अशोक गळाकाटे, भागवत नन्नवरे, उमेश कदम, प्रकाश सोनवणे, बाबासाहेब सुरवसे, प्रवीण राठोड, बाबू गायकवाड, खंडू राठोड, भीमराव गायकवाड, सुभाष गायकवाड, मरगम्मा कोळी समाजातील महिलांना सुजाता चव्हाण यांच्या हस्ते शांताबाई लक्ष्मण कोळी, शितल बालाजी कोळी, फ ुलाबाई अण्णाप्पा कोळी, मारुबाई फुलचंद कोळी, गौराबाई सागर कोळी, पूजा राम कोळी, अंजू अर्जुन कोळी, पूजा सागर कोळी, दुर्गाबाई तमन्ना कोळी, ताई तमन्ना कोळी, ललिता अशोक कोळी, भिंगरी सुनील कोळी यांना साडी व फराळाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी अबोली वाघमारे, जयश्री आगलावे, मयुरी कुलकर्णी, जयश्री नाटेकर, अंजली बरजे, लक्ष्मण नरे, शिवराज भुजबळ, रामेश्वर सावंत, विशाल महाबोले, अर्जुन सोनटक्के, महेश मंगे, झाकीर शेख, अर्जुन माशाळकर, शिवाजी माने, ज्ञानेश्वर बंडगर यांनी परिश्रम घेतले.

# एक हजार ८०० अधिकारी अन् स्वयंसेवकांचा फौजफाटा

**● कार्तिकी वारीसाठी मंदिर समिती सज्ज; भाविकांना सोयीसुविधा मिळणार**
**● दर्शनरांग द्रुतगतीने चालवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना**






**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ नोव्हेंबर-**

कार्तिकी एकादशी मंगळवारी १२ नोव्हेंबर आहे. या यात्रेला अंदाजे ८ ते १० लाख वारकरी भाविक येतात. याच्या नियोजनासाठी १ हजार ८०० अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक तैनात करण्यात आले आहे. कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांना आवश्यक व मुबलक सोयी-सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामध्ये दर्शनरांगेत बॅरिगेटिंग करून त्यावर ताडपत्री शेड, जादा पत्राशेडची निर्मिती, आपत्कालीन गेट, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर व चहा वाटप करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली

लवकर दर्शन होण्यासाठी दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालविणे कामी आवश्यक त्या उपाय योजना राबविण्याच्या दृष्टीने भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजा बंद ठेवणे, महत्त्वाच्या व अति महत्त्वाच्या व्यक्तींच्या थेट दर्शनावर निर्बंध, ऑनलाइन दर्शन बुकिंग पास बंद ठेवणे, दर्शन रांगेत भक्तांची संख्या मोजणीचा कॅमेरा, घुसखोरी करणाऱ्या वर गुन्हा दाखल करणे व अनुभवी व प्रशिक्षित कमांडोची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय, परंपरेनुसार श्रींचा पलंग काढल्याने दैनंदिन २४ तास म ुखदर्शन व २२ तास पदस्पर्शदर्शन उपलब्ध होत आहे. या यात्रा कालावधीतील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या प्रथा व परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येत असून, श्रींचा पलंग काढणे, एकादशीच्या सर्व पुजा, महानैवेद्य, श्रींच्या पादुकांची मिरवणूक, महाद्वार काला व प्रक्षाळपूजेचे योग्य ते नियोजन करण्यात आले आहे. देणगी घेण्यासाठी जादा २० स्टॉलची निर्मिती व ऑनलाईन देणगीसाठी क्युआर कोड, आरटीजीएसची सुविधा, सोने-चांदी वस्तू दान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष तसेच नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा, चंद्रभागा वाळवंट पंढरपूर नगरपरिषद हद्दीतील ठिकाणची स्वच्छता देखील मंदिर समिती मार्फत करण्यात येत आहेत. या कामी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येत आहे.

### ● ११८ सीसीटीव्हींची असणार निगराणी

याशिवाय, आपत्कालीन व सुरक्षा व्यवस्थेकामी, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यासह, सिझफायर यंत्रणा, स्कायवॉकवर आपत्कालीन गेट व फोनची व्यवस्था, चंद्रभागा नदीपात्रात आपत्ती व्यवस्थापन पथकाची नियुक्ती, अत्याधुनिक ११८ सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, सार्वजनिक प्रसारण सूचना प्रणाली, चौकशी कक्ष, बॅग स्कॅनर मशीन, अपघात विमा पॉलिसी, मॅन काउंटिंग मशीन इ. व्यवस्था करण्यात आली आहे.

### ● दर्शन मंडपात प्रथमोपचार केंद्र

वैद्यकीय व्यवस्थेच्या दृष्टीने मंदिर परिसरामध्ये दोन अद्ययावत रुग्णवाहिका वैद्यकीय पथकासह, मंदिर समिती मार्फत श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथे प्रथमोपचार केंद्र, वैष्णव चॅरिटेबल व मेडिकल ट्रस्ट, मुंबई यांच्यामार्फत मंदिराच्या माळवदावर भाविकांसाठी मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून येणार आहे. तसेच दर्शनरांगेत शासनाच्या आरोग्य विभागामार्फत दर्शनमंडप व पत्राशेड येथे आयसीयू, बाजीराव पडसाळी, सारडा भवन इत्यादी ठिकाणी आरोग्य व्यवस्था असणार आहे.

### ● वाळवंटात महिलांसाठी चेंजिंग रुम

महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष व चंद्रभागा वाळवंट येथे चेंजिंग रूम उभारण्यात येत आहेत, चेंजिंग रूम चे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने महिला कमांडोची नियुक्ती करण्यात येत आहे.

### ● चार दिवस २४ तास भोजन व्यवस्था

श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडूप्रसाद व त्यासाठी पश्चिमद्वार, उत्तरद्वार व्यतिरिक्त श्री संत तुकाराम भवन येथे नवीन स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच दर्शनरांगेत शाबुदाणा आणि तांदळाची खिचडी व चहा तसेच मागील वर्षाप्रमाणे ४ दिवस पत्राशेड येथे २४ तास मोफत भोजन व्यवस्था करण्यात येत आहे.

### ● यांच्यावर जबाबदारी

या सर्व नियोजनासाठी सुमारे एक हजार ८०० अधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.



## माजी विद्यार्थ्यांचा सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ५ नोव्हेंबर-**

पिलीव येथील १९९५ या वर्षी दहावीमध्ये शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा गेट टुगेदरचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला.

पिलीव परिसरात आठवणी ९५ या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे गेल्या दहा वर्षांपासून सामाजिक उपक्रम राबविले जातात. सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी प्रत्येक जण काही रक्कम जमा करतात व यातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. यावेळी या आठवणी ९५ ग्रुपचे अध्यक्ष प्रा. संजय पाटील, उपाध्यक्ष नितीन शिंदे, सचिव सचिन गाटे, तसेच डॉ. राजेश चोरमले, अँटिकरप्शनचे संतोष मदने, इस्माईल पठाण, योगेश विरकर, युवा उद्योजक उमेश देशमुख, अविनाश जेऊरकर, विजय ढेरे, प्रगतशील बागायतदार सूर्यकांत मदने, संतोष जाधव, राहुल झिंजे, संग्राम पाटील, मधू शिंदे, चंद्रशेखर काळे, विजय सपाटे, योगेश शेंडगे, शंकर देशमुख, राणी गुजरे यांचा, गोल्डन गर्ल म्हणून राणी गुजरे यांचा तर गोल्डन मुलगा म्हणून राहुल झिंजे यांचा सन्मान करण्यात आला. पुढील वर्षी वक्तृत्व स्पर्धा तसेच इतर सामाजिक उपक्रम राबविण्याबाबत सखोल चर्चा झाली. सूत्रसंचालन सचिन गाटे यांनी केले तर आभार अध्यक्ष संजय पाटील यांनी मानले.

# लाडक्या बहिणींच्या विश्वासावर निवडणूक जिंकणार

**● ॲड. मीनल साठे : माढेश्वरी देवीला नारळ फोडून प्रचाराचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ५ नोव्हेंबर-**

माढा मतदारसंघाचे म हायुतीच्या अधिकृत उमेदवार ॲड. मीनलताई साठे यांचा प्रचार शुभारंभ श्री माढेश्वरी मंदिर येथे शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे, माढा तालुक्याचे माजी आमदार धनाजीराव साठे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. लाडक्या बहिणींच्या विश्वासावर ही निवडणूक मी जिंकरणारच असा विश्वास ॲड. मीनल साठे यांनी व्यक्त केला.

महेश साठे यांनी सांगितले की, माढा विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे सर्व पदाधिकारी ताकदीने मीनलताई साठे यांच्या पाठीशी उभा राहून विजयी करण्यासाठी प्रयत्न करतील. विधानसभेत पाठवण्यासाठी एक लाडकी बहीण म्हणून महायुतीने उमेदवारी दिली आहे. ती जबाबदारी आम्ही पूर्ण ताकदीने पार पाडून यांना विधानसभेत पाठवू. दादासाहेब साठे यांनी बोलताना सांगितले की, महायुतीच्या वरिष्ठ नेते मंडळींनी आमच्यावर विश्वास दाखवून आम्हाला तिकीट दिले, त्या विश्वासाला समर्थ राहून महायुतीचा प्रतिनिधी म्हणून त्यासाठी यांना विधानसभेत पाठवणार असून महायुती मधले घटक पक्षाचे विधानसभा मतदारसंघातील सर्व नेते मंडळी महायुतीचा धर्म पाळून आम्हाला मदत करतील असा विश्वास व्यक्त केला.

मीनलताई साठे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार व महायुतीचे सर्व नेते मंडळींनी एक लाडकी बहीण म्हणून मला संधी दिली. मतदारसंघातील सर्व मतदार लाडकी बहीण म्हणूनच मला विधानसभेत पाठवतील असा मला विश्वास आहे.

माढा तालुक्याचे माजी आम दार धनाजीराव साठे, शिवसेनेचे संपर्कप्रमुख महेश साठे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेश सरचिटणीस ॲड. सुप्रिया गुंड, युवती सेनेच्या जिल्हाध्यक्षा प्रियंका परांडे, युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रियदर्शन साठे, शिवसेनेचे पंढरपूर तालुकाध्यक्ष महादेव भोसले, प्रहार जनशक्तीचे रणजीत जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रफिक मुलाणी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा युवक उपाध्यक्ष शेखर कांबळे, पी. टी काळे, भाजपा उद्योग आघाडी पुणे जिल्हाध्यक्ष, माढा नगरपंचायतीचे सर्व नगरसेवक, सभापती महायुतीतील सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी, विविध गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विकासावर जनतेचा विश्वास

माढा शहरामध्ये नगरपंचायत माध्यमातून जो विकास केला, तो विकास माढा विधानसभामध्ये मी राबवणार असून मतदार माझ्याच पाठीशी खंबीरपणे उभे राहतील. कोणावर टीका न करता माझ्या कामाच्या जोरावर ही निवडणूक जिंकणार आहे. जनता विकासकामांवर विश्वास ठेवतील असे ॲड. मीनल साठे यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस सुप्रियाताई गुंड, शिवसेनेच्या युवती जिल्हाप्रमुख प्रियंका परांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



## संत चरित्र विशेषांकाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ नोव्हेंबर-**

भागवत धर्म प्रसारक मंडळ, पालखी सोहळा पत्रकार संघ, नामदेव समाजोन्नती परिषद व नामदेव दरबार कमिटी श्री क्षेत्र घुमाण आयोजित श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या संत नामदेव महाराज रथ व सायकल यात्रेच्या संत चरित्र हिंदी विशेषांकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवनात करण्यात आले.

यावेळी संत ज्ञानेश्वर म हाराज संस्थानचे विश्वस्त योगी निरंजननाथ, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रमुख अक्षय म हाराज भोसले, भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे, खजिनदार मनोज मांढरे, पालखी सोहळा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष राजेंद्र मारणे, नामदेव समाजोन्नती परिषदेचे मुख्य विश्वस्त राजेंद्र पोरे उपस्थित होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी संत नामदेव रथ व सायकल यात्रेबाबत गौरोवोद्गार काढले. ते म्हणाले, विठ्ठलाच्या दर्शनाची मलाही आस आहे. या विठ्ठलाचे भक्त व संतांचे कार्य महान आहे. हे कार्य जगभर पोहोचले पाहिजे. भागवत धर्म प्रसारक मंडळ हिंदी भाषेत हे संत साहित्य प्रकाशित करीत आहे ही आनंदाची बाब आहे. योगी निरंजननाथ म्हणाले, भागवत धर्म प्रसारक मंडळाचे कार्य अद्वितीय आहे. संत ज्ञानोबाराय व नामदेवराय यांच्यानंतर इतिहासात पहिल्यांदाच मराठी भाषिकांनी इतर राज्यांमध्ये जाऊन वारकरी पंथ कृतीतून आणि हिंदी भाषेच्या माध्यमातून उभा करीत आहेत.



## बार्शीत आ. राजेंद्र राऊतांचा विजयसंकल्प मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ५ नोव्हेंबर-**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बार्शीचे शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (आ.) व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार राजेंद्र विठ्ठल राऊत यांनी कार्यकर्त्यांसाठी विजय संकल्प मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात त्यांनी त्यांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना देत निवडणुकीत विजय खेचून आणण्याचा आत्मविश्वास व्यक्त केला.

आमदार राजेंद्र राऊत यांनी या कार्यक्रमात बोलताना सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा येत्या ८ तारखेला भगवंत मैदान येथे होणार असून, या सभेला सर्व कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे. निवडणुकीच्या दृष्टीने ही सभा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता त्यांना सडेतोड उत्तर देण्याची आपली सर्वांची जबाबदारी असून केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी काम करा व सरकारच्या माध्यमातून बार्शी शहर व तालुक्यात केलेल्या विकास कामांची माहिती प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे असे आवाहन आमदार राजेंद्र राऊत यांनी सर्वांना केले.

# दक्षिणच्या सर्वांगिण विकासासाठी निवडून द्या

**● वंचितचे संतोष पवार यांचे आवाहन; हत्तूर येथे प्रचाराचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ५ नोव्हेंबर-**

नागरिकांच्या मागणीनुसार काम न सत्ताधाऱ्यांकडून ज्या कामात पैसे जास्त मिळतात त्या कामांना प्राधान्य दिले जाते. दहा वर्षात दक्षिणमधील तरूण, शेतकरी व कष्टकरी यांच्याकडे दुर्लक्ष झाल्याने ते विकासापासून वंचित आहेत. म्हणून या निवडणुकीत जातीधर्मापेक्षा विकास कामाला मतदान करून दक्षिणच्या सर्वांगिण विकासासाठी निवडून देण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार तथा मार्ग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार यांनी केले.

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोष पवार यांच्या प्रचाराचे शुभारंभ हत्तूर येथील ग्रामदैवत श्री. सोमेश्वर आणि बनसिद्धेश्वर मंदिरात नारळ वाढवून करण्यात आला. यावेळी वंचितचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांब, महासचिव अनिरुद्ध वाघमारे, सरपंच स्वाती माने, अविनाश इंगळे, शहराध्यक्ष प्रशांत गोनेवार, बाळूमामा मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील, विनोद इंगळे, आतिश बनसोडे, तालुकाध्यक्ष सुरेश देशमुख, महिला आघाडी शहराध्यक्ष पल्लवी सुरवसे, बाळासाहेब सावंत, क्रांतीसूर्य प्रतिष्ठानचे महेश आठवले, सलीम मुल्ला, रियाज शेख, चंद्रशेखर गायगवळी, बाबासाहेब माने, प्रकाश पवार, गौर सेनेचे तुकाराम राठोड आदी उपस्थित होते. पवार म्हणाले की, दक्षिणमध्ये मोठ्या प्रमाणात सिंचन व्यवस्थेत सुधारणा होणे आवश्यक होते. देगाव जोडकालव्याचे काम झाल म्हणून सांगण्यात येते. मग पाणी का आला नाही? याचा खुलासा करावे. विकासापासून वंचित असणाऱ्या मतदारांनी निवडून दिल्यास एमआयडीसी, दररोज पाणीपुरवठा, गाव तिथे बस सुविधा, महिला सक्षमीकरण व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचे पवार यांनी सांगितले. आतिश बनसोडे यांनी प्रास्ताविक केले.




### धनगर समाजासोबत आंबेडकर

आरक्षणाच्या लढाईत बाळासाहेब आंबेडकर हे धनगर समाजाच्या सोबत राहिले आहेत. वंचितांच्या विकासासाठी लढणाऱ्याला मतदान केला तरच झोपडीतील माणसांचे विकास होईल, असे चंद्रशेखर गायगवळी म्हणाले.

## विधानसभा निवडणुकीत आचारसंहितेचे पालन करा

**निरीक्षक ऋतुराज रघुवंशी**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ५ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीत दक्षिण सोलापूर मतदारसंघात उमेदवार व कार्यकर्त्यांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन निरीक्षक ऋतुराज रघुवंशी यांनी केले.

ते दक्षिणमधील पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते. यावेळी खर्च निरीक्षक तेजराम मीना, निवडणूक निर्णय अधिकारी सुमित शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी ऋतुराज रघुवंशी म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. उमेदवारांनी प्रचार वाहन व सभेची परवानगी वेळेपूर्वी काढून घेणे आवश्यक आहे. मतदान केंद्रावर मोबाईल बंदी असणार आहे. त्यामुळे मतदान केंद्रावर मोबाईल वापरू नये. तसेच निवडणूक खर्च वेळोवेळी खर्च पथकाकडे सादर करून आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन रघुवंशी यांनी केले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माजी विद्यार्थ्यांनी २६ वर्षानंतर जुन्या आठवणींना दिला उजाळा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ नोव्हेंबर -**



प्रतिभा निकेतन विद्यालयात इयत्ता १० वी च्या १९९७-९८ बॅचच्या विद्यार्थ्यांनी स्नेह मेळावा व गुरुवर्यांचा गौरव सोहळा रविवारी (ता.३) रोजी विद्यालयाच्या सभागृहात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य करबसप्पा ब्याळे होते. यावेळी उपमुख्यध्यापक उल्हास घुरघुरे, पर्यवेक्षक विवेकानंद परसाळगे, बालाजी बिदे, माजी मुख्याध्यापक सच्चिदानंद अंबर, डी.के. शेळके, कांत हुलसुरे, काशिनाथ मिरगाळे, प्रविण गायकवाड, प्रा.डॉ. केशव कुलकर्णी, बाबुराव जाधव, प्रल्हाद सगर, रमेश अष्टगी, तुकाराम उंबरे, शिवशरण तांबडे, मंगल शिंदे, प्रल्हाद काळे, चंद्रशेखर कोराळे, ज्ञानेश्वर वाघमारे, दत्ता मुदकण्णा, चंद्रशेखर चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.

२६ वर्षांनी विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा शाळा भरवून गुरुवर्यांचे पुष्पवृष्टी करून स्वागत केले.

विद्यार्थ्यांनी छडीचा मार खाऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला.



### संक्षिप्त वृत्त...



### आलुर येथील उपसरपंचासह अनेकांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**उमरगा, दि.५ नोव्हेंबर -**

आलुर (ता. उमरगा) येथील उपसरपंच जितेंद्र पोतदार, आनंद बोळदे, धुळाप्पा बब्बे, शिवाजी राठोड, गोपा पवार, कल्लाप्पा कुंभार आदी शिवसैनिकांनी मंगळवार दि.५ रोजी माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड यांच्या हस्ते उबाठा गटातून शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी शेतकरी सेना जिल्हा संघटक विलास भगत, ज्येष्ठ नेते भिमराव वरनाळे, माजी नगरसेवक शेखर मुदकन्ना, राजू माने, युवा सेना शहरप्रमुख मुरूम भगत माळी, शिवराज समन, लक्ष्मण तावडे, ब्रम्हानंद उमशेट्टे, रोहन बिराजदार, सोमनाथ सुतार, शिवाजी पवार, नागेश गणेशकर, पाटील, प्रवीण पोतदार आदी उपस्थित होते.

## नळदुर्गमध्ये किरकोळ भांडणातून पत्नीची चाकूने भोसकून हत्या



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ नोव्हेंबर -**

चारीत्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीची धारदार शस्त्राने वार करुन निर्घृण हत्या करण्याची दुर्दैवी घटना नळदुर्ग येथे दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. पत्नीची हत्या केल्यानंतर पतीने स्वतावरही शस्त्राने वार करुन घेतल्याने तोही गंभीर जखमी झाला आहे सध्या त्याच्यावर सोलापुर येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेने नळदुर्ग शहरात खळबळ उडाली आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की नळदुर्ग येथील घरकुल मध्ये अब्दुल वहीद बिलाल कुरेशी वय ४५ व त्यांची पत्नी सुलताना अब्दुल वहीद कुरेशी (वय ४०) हे आपल्या मुलांसह राहतात. कुटुंबाच्या उपजिवेकेसाठी घरकुल शेजारी असणाऱ्या नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयासमोर त्यांनी चहाची टपरी लावली होती.

गेल्या अनेक दिवसांपासुन त्यांची चहाची टपरी याठिकाणी आहे. अब्दुल वहीद बिलाल कुरेशी हा आपली पत्नी सुलताना अब्दुल वहीद कुरेशी यांच्या चारीत्र्यावर संशय घेत होता. त्यामुळे त्यांच्यात भांडणे होत होती. दि.५ नोव्हेंबर रोजी नेहमीप्रमाणे त्यांची चहाची टपरी सुरु होती. दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास या नवरा-बायकोमध्ये भांडण सुरु झाले हे भांडण इतके विकोपाला गेले की, संतप्त झालेल्या अब्दुल वहीद बिलाल कुरेशी याने त्याची पत्नी सुलतानावर कात्री व चाकुने सपासप वार केले.

यामध्ये सुलतानाचा जागीच मृत्यु झाला पत्नी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहुन अब्दुल यानेही स्वतावर वार करून घेतले. यामध्ये तोही गंभीर जखमी झाला आहे. या घटनेची माहिती तेथील नागरीकांनी पोलिसांना दिली घटनेचे गांभीर्य ओळखुन नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक ईश्वर नागरे, साळुंके व पोलिस उपनिरीक्षक गिते हे तात्काळ घटनास्थळी जाऊन गंभीर जखमी झालेल्या अब्दुल वहीद बिलाल कुरेशी याला समोरच असणाऱ्या उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले याठिकाणी त्याच्यावर प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी त्याला सोलापुर येथील रुग्णालयात रेफर करण्यात आले.

याबाबतचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

### चारित्र्याच्या संशयावरून घडली घटना...

चारित्र्याच्या संशयाचे भुत डोक्यात शिरल्यानंतर माणुस कुठल्या थराला जातो याचा प्रत्येक्ष अनुभव याठिकाणी पाहायला मिळाला. एक कुटुंब आपल्या संसाराचा गाडा व्यवस्थित चालवीत असतांना अचानक पतीच्या डोक्यात पत्नीच्या चारित्र्याचे भुत संचारते आणि त्यातुन अशा प्रकारची हृदयद्रावक घटना घडते आणि यामुळे अख्या कुटुंबाची वाताहत होते. पत्नी मयत झाली आहे तर पती गंभीर जखमी होऊन मृत्युच्या दारात उभा आहे. अब्दुल व सुलताना यांना दोन मुले, दोन मुली आहेत.

## शिवसेना उमेदवार तानाजी सावंत यांच्या प्रचार दौऱ्यास सुरुवात



### मतदारांशी प्रत्यक्ष साधला संवाद...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ नोव्हेंबर -**

परंडा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पक्षाचे अधिकृत उमेदवार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी दि.५ नोव्हेंबर २०२४ रोजी झंजावती प्रचाराला सुरुवात केली असुन शिवसेना शिंदे गटाची उमेदवार म्हणून परंडा तालुक्यातील भोंजा, कुंभेजा, खानापूर, रुई, दुधी, ढगपिंपरी या गावात प्रचार दौरा केला.

यावेळी शिवसेनेचे खमहायुतीचे उमेदवार तानाजीराव सावंत यांचे ठीक ठिकाणी जल्लोषात स्वागत करून औक्षण करण्यात आले आहे.

यावेळी भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, आरपीआय आदी मित्र पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी प्रचार दौरा केला आहे. यावेळी प्रत्यक्ष म तदाराशी भेटून संवाद साधण्यात आला.

यावेळी प्रचार दौऱ्यात शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता साळुंखे आरपीआयचे संजय बनसोडे, म ाजी जिल्हाप्रमुख गौतम लटके, अण्णासाहेब जाधव, पंचायत समि तीचे माजी सदस्य गुलाब शिंदे, बळीराम हिवरे, बापू हावळे, बालाजी खर्चे, राजेंद्र कुलकर्णी, नवनाथ साठे, डॉ. नाना गरड आदीसाह महायुतील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## ड्रायव्हरची मतदान अधिकारी म्हणून नेमणूक !

### निवडणूक विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर?

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सर्व उमेदवार व्यस्त असताना, निवडणूक विभागाच्या काम काजातील एक गंभीर त्रुटी समोर आली आहे. जिल्ह्यातील मतदान केंद्रावर अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेल्यांमध्ये काही अशा व्यक्तींचा समावेश आहे, ज्यांचा निवडणुकीच्या प्रक्रियेशी दूरदूरचा संबंध नाही. अशाच एका प्रकरणात, जिल्हा परिषदेच्या आरोग्य खात्यात महिंद्रा पिकअप वाहन चालवणाऱ्या तानाजी तुपे यांची मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

तानाजी तुपे, हे लातूर येथील स्टोअर रूममधून औषधं व गोळ्या आणून जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांवर पोहोचवतात. त्यांचे शिक्षण कमी असून, निवडणुकीसंबंधी कोणताही अनुभव नाही. तरीही, त्यांना परंडा येथे मतदान अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे आणि त्यांना निवडणूक प्रक्रियेचे प्रशिक्षण घेण्याची सक्ती करण्यात आली आहे.

तानाजी यांनी याबाबत आपली नाराजी व्यक्त करत सांगितले की, मी अडाणी माणूस आहे, निवडणुकीत मला काही कळत नाही, पण साहेबांनी इलेक्शन ड्युटीचा आदेश दिला आहे.

तुपे यांच्यासारखे आणखी काही ड्रायव्हर देखील मतदान अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहेत. ज्यामुळे निवडणूक विभागाच्या कामकाजाबाबत प्रश्नचिन्ह निम र्ण झाले आहे.

निवडणूक विभागाच्या या निर्णयावर टीका होत असून, फक्त बोटावर शाई लावायची आहे, त्यास शिक्षणाची गरज काय? या निवडणूक अधिकाऱ्यांच्या विधानामुळे ही बाब अधिक गाजत आहे. या प्रकारामुळे जिल्ह्यातील निवडणूक प्रक्रियेत गोंधळ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## शेतकऱ्यांबाबत असंवेदनशील सरकारला पायउतार करा : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**



सध्या होत असलेली निवडणूक ही महाराष्ट्राचे भवितव्य ठरवणारी असून महायुती सरकार शेतकऱ्यांबाबत असंवेदनशील आहे. या सरकारला पायउतार करा, मत आ. कैलास पाटील यांनी निवडणुकीच्या प्रचार दौऱ्यात वाठवडा, (ता. कळंब) येथे झालेल्या कॉर्नर सभेत मांडले.

आ. पाटील म्हणाले, पहिले अडीच वर्षांमध्ये महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर होते. परंतु त्यातील दोन वर्षे कोविडच्या संकटात गेली. त्यामुळे आम्हाला फक्त सहा महिनेच काम करण्याची संधी मिळाली. मात्र, त्या कालावधीत देखील आम्ही शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्यानंतर सत्तेवर आलेले महायुती सरकार हे शेतकऱ्यांच्या मुळावर उठलेले आहे. या सरकारने शेतकऱ्यांचे हित बाजूला ठेवून केवळ राजकीय फायद्यासाठी धोरणे आखली आहेत.

शेतकऱ्यांच्या अडचणींवर प्रकाश टाकत त्यांनी पुढे म्हटले: महायुती सरकारने केलेली वचनबद्धता फोल ठरली आहे. शेतकऱ्यांना वीजपुरवठ्याच्या सम स्येत अडकवले आहे, हमीभावाच्या नावाखाली शेतम ालाची विक्री ठप्प झाली आहे, आणि पिकविम्याचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत.

या सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या फसव्या घोषणा केल्या, मात्र प्रत्यक्षात त्यांचा काहीच उपयोग झाला नाही. सततच्या नापिकीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे, आणि सरकार शेतकऱ्यांना आधार देण्यात पूर्णतः अपयशी ठरले आहे.

महाविकास आघाडीच्या धोरणांवर विश्वास व्यक्त करत, आ. पाटील म्हणाले: महाविकास आघाडीने जेव्हा सत्तेत होते.

तेव्हा आम्ही शेतकऱ्यांसाठी ठोस पावले उचलली होती. कोविड काळात देखील आम्ही शेतकऱ्यांच्या मालाला चांगला दर मिळवून देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यानंतर आलेल्या महायुती सरकारने शेतकऱ्यांना दुय्यम वागणूक दिली आहे. यामुळे आज शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत.

यावेळी रामलिंग आव्हाड, अण्णासाहेब तनमोर, बिभीषण देशमुख, भारत इरपतगिरे, हनुमंत साळुंखे, बालाजी आल्टे, नारायण गवळी, काका राऊत, विजय इंगळे, वकील पठाण, अमृत टेकाळे, आकाश पवार, सल्लाउद्दीन बेग, फकीर सय्यद, संदेश पवार, बाप्पा येवनकर, खंडू आल्टे, अमित आल्टे, राजाभाऊ आल्टे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिव-तुळजापूर रेल्वेमार्ग; सात किलोमीटरचे पायाभूत काम पूर्ण

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

धाराशिव-तुळजापूर या अनेक वर्षांपासून प्रलंबित राहिलेल्या रेल्वेमार्गाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. १० पोकलेन मशीन, ८० हायवा टिप्पर आणि ३०० कामगारांच्या सहाय्याने रात्रंदिवस काम सुरू आहे. एकूण तीस किलोमीटर अंतराच्या रेल्वेमार्गापैकी सात किलोमीटरचे पायाभूत काम पूर्ण झाले आहे. कामच वेग असाच कायम राहिल्यास,आपण ठरविलेल्या उद्दिष्टानुसार पुढील २४ म हिन्यांच्या आत कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्रापर्यंत रेल्वेमार्गाचे काम नक्की पूर्ण होईल असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले तुळजापुर रेल्वेचे स्वप्न आता प्रत्यक्ष साकार होत आहे. एकूण ८४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाच्या कामाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. धाराशिव ते तुळजापूर या पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटर ब्रॉडगेज रेल्वेमार्गाच्या कामास सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रारंभ झाला. वाहन व यंत्रांचे नारळ फोडून आपण पूजन केले होते. सध्या उपळा ते सांजा दरम्यान सहा किलोमीटर अंतराचे तर पळसवाडी परिसरात एक किलोमीटरचे पायाभूत काम पूर्ण झाले आहे. पुढील कामही मोठ्या वेगात सुरू आहे. या नवीन रेल्वेमार्गाचे काम खरतर २०१९ सालीच सुरू होणे अपेक्षित होते. मात्र त्यावेळी ठाकरे सरकारने राज्याच्या वाट्याचा पन्नास टक्के निधी उपलब्ध करून दिला नव्हता. त्यामुळेच अडीच वर्षे हे काम रखडले होते. राज्यात आपले महायुती सरकार आल्यानंतर या रेल्वेमार्गासाठी ४५२.४६ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्ष कामाला गती आली आहे. सुरूवातीला पाच वर्षात हे काम पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले होते. मात्र आता तीन टप्प्यांत कमी कालावधीत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्याचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित दोन टप्प्यांचे कामही लवकरच हाती घेण्यात येणार असल्याची माहितीही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. पुढील दोन वर्षांच्या आत पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. ज्या गतीने आत्ता काम सुरू आहे, ते पाहता ठरविलेल्या उद्दिष्टानुसार नक्की काम पूर्ण होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पहिल्या टप्प्यातील कामासाठी धाराशिव तालुक्यातील नऊ आणि तुळजापूर तालुक्यातील १५ गावांमधील ४९४.२६ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. पुढील टप्प्यात बोगद्याच्या कामांना हाती घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



धाराशिव-तुळजापूर या ३० किलोमीटर रेल्वेमार्गावर तीन नवीन रेल्वेस्थानके उभारली जाणार आहेत. धाराशिव ते सांजा या १० किलोमीटर अंतरावर सांजा येथे पहिले रेल्वे स्थानक असणार आहे. सांजा ते वडगाव या १२ किलोमीटर अंतराच्या टप्प्यावर दुसरे रेल्वेस्थानक तर वडगाव ते तुळजापूर या आठ किलोमीटर अंतरावर तिसरे स्थानक उभारले जाणार आहे. या रेल्वेमार्गावर एकूण चार स्थानके असणार आहेत. त्यात धाराशिव येथील सध्या अस्तित्वात असलेल्या मुख्य रेल्वेस्थानकाचाही समावेश आहे. मुख्य रेल्वेस्थानकाच्या पुनर्विकासासाठी नुकतेच नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २१ कोटी रुपयांचा निधी सुपूर्द केला असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात एका ३५ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली आहे. गावातील एका तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केला आणि जातीवाचक शिवीगाळ देखील केली. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून बेंबळी पोलिसांनी आरोपी तरुणावर गुन्हा दाखल केला आहे.

## परंडा विधानसभेसाठी बहुरंगी लढत

**तभा वृत्तसेवा/बळीराम जगताप**
**वाशी, दि.५ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये २४३ विधान सभा परंडा विधानसभा मतदारसंघात ४२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते त्यातील २१ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून त्यामध्ये २१ उमेदवार राहिलेले असून बहुरंगी लढत अटळ आहे.

खरी लढत प्रा.डॉ. तानाजीराव सावंत शिवसेना धनुष्यबाण व माजी आमदार राहुल महारुद्र मोठे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तुतारी वाजवणारा माणूस यामध्ये होणार आहे. या लढतीम ध्ये बहुजन समाजवादी पार्टीचे महादेव लोखंडे यांचे चिन्ह हत्ती आहे. मनसेचे राजेंद्र कपाट यांचे चिन्ह रेल्वे इंजिन आहे. डॉ. राहुल घुले यांचे चिन्ह शिट्टी असून समाजवादी पार्टीचे अ‍ॅड. रेवण भोसले सायकल चिन्हावर लढत देत आहेत. पाच उमेदवार हे आपापल्या पक्षातर्फे बरीच मते घेणार आहेत. त्याचा तोटा कोणास बसेल हे आता तरी सांगता येणार नाही.

खरी लढत प्रा.डॉ. तानाजीराव सावंत व माजी आमदार राहुल भैया मोटे यांच्यामध्ये असून त्या दोघांपैकी कोणाची मते मनसेचे राजेंद्र गपाट, वंचितचे प्रवीण रणबागुल, बहुजन पार्टीचे महादेव लोखंडे, रासपचे डॉ. राहुल घुले, समाजवादी पार्टीचे अ‍ॅड. रेवण भोसले हे उमेदवार बरीच मते घेणार असल्याने त्याचा तडाखा कोणास बसणार हे मात्र मतदार ठेवणार आहेत. सध्या परंडा विधानसभामध्ये बहुरंगी लढत होणार असल्याची दिसून येत आहेत. जरांगे-पाटलांचा उमेदवार नसल्याने मराठा समाजाची मते कोणाच्या पारड्यात पडतात यावर जय पराजय अवलंबून आहेत.

## मुरुम पोलीसांची अवैद्य गुटखा वाहतूकीवर कारवाई; २७ लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.५ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील कोथळी गावच्या चेक पोस्ट येथे दि.३ नोव्हेंबर रोजी रविवार म ध्यरात्री कर्नाटकातून महाराष्ट्रात येत असलेल्या गुटख्याच्या वाहनावर मुरुम पोलिस ठाणेचे उपनिरीक्षक डी.डी. गव्हाणे यांनी मोठया शिताफीने अवैद्य वाहतूक होणाऱ्या वाहनावर मोठी कारवाई करुन अंदाजे १९ लाखांचा गुटखा जप्त करून मोठी कामगीरी बजावली आहेत. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

याबाबत माहिती अशी की, दि.३ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री साडे बाराच्या सुमारास (एमएच २३/एयु ५८१०) क्रमांकाचे बंद बॉडीचे पिकअप वाहन गुटख्याचा मोठासाठा घेऊन कर्नाटकातून म हाराष्ट्रात वाहतूक होत असल्याची बातमी उपविभागीय पोलीस अधिकारी शेलार यांना गुप्त बातमीदाराने दिली होती. यावरून उपविभागीय पोलीस अधिकारी शेलार यांच्या आदेशानुसार म ुरूम पोलीस ठाण्याचे (पोलीस अधिकारी दहिफळे नव्हे) तर दबंग पोलिस उपनिरीक्षक डी.डी. गव्हाणे यांनी कोथळी गावच्या चेक पोस्ट येथे वाहन पकडण्याच्या हेतूने सापळा रचला. चेक पोस्ट येथे रात्री साडेबाराच्या सुमारास सदर वाहन चेक पोस्टवर आला या वाहनाची पोलिसांनी झडती घेतली असता गाडीत तंबाखूजन्य गुटखा पदार्थचा मोठा साठा आढळून आला. त्यामुळेच सदर वाहन मुरूम पोलीस ठाण्यात आणून पंचासमक्ष तपासणी करून तब्बल १९ लाखाच तंबाखूजन्य गुटखा व आठ लाखाचे वाहन असे २७ लाखाच मुद्देपाल जप्त केले आहेत.

ऐन निवडणूक पार्श्वभूमीवर उपनिरीक्षक गव्हाणे यांनी केलेल्या या धाडसी कारवाई बद्दल त्यांच्या नावाबद्दल लोकांत कौतुक होत आहे. मुळात असे अवैद्य वाहतूक यामागे नेमहीच सुरू असतात पण उपनिरीक्षक गव्हाणे यांनी केलेल्या या धाडसी कारवाई बद्दल चांगली चर्चा असताना पोलिस वर्तुळात मात्र नाराजगी दिसून येते आहे.

दरम्यान कारवाईत पकडण्यात आलेल्या वाहनाच्या चालकाने म्हणजे निहाल माजिद काजी (रा. धाराशिव) व गुटखा पदार्थ मालक रिजवान शेख या दोन्ही इसमाने अवैद्य गुटखा वाहतूक आणि विक्री करत असल्याचे निष्पन्न झाल्याने या दोघाविरुद्ध मुरूम पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक गव्हाणे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# तुळजापूरमध्ये बनावट मुद्रांक प्रकरण : चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ नोव्हेंबर -**

बनावट मुद्रांक तयार करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी तुळजापूर पोलीस स्टेशनमध्ये चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तुळजापूरचे दुय्यम निबंधक बालाजी ज्ञानोबा मादसवा (वय ४९) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी बालाजी मादसवा यांच्या माहितीनुसार, आरोपींनी संगणमत करून बनावट मुद्रांक तयार केले आणि त्याचा शासकीय कामकाजासाठी वापर केला. त्यामुळे शासनाची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाली आहे. या गुन्ह्यात आरोपी म्हणून तेजाबाई पांडुरंग जाधव (रा. पापनास, तुळजापूर), दिगंबर पांडुरंग जाधव, शुभांगी संतोष नवगिरे आणि संतोष चंदर नवगिरे (तिघेही रा. वेताळनगर, तुळजापूर) यांची नावे समोर आली आहेत. तक्रार दाखल झाल्यानंतर ५ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी १:५७ वाजता तुळजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५१४/२०२४ नोंदवला गेला. पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० (फसवणूक) आणि ३४ (समान हेतू) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल करण्यासाठी फिर्यादीने तुळजापूर पोलिस ठाण्यात हजर होऊन अधिकृतरित्या तक्रार दिली. या प्रकरणाची तपासणी पोलीस उपनिरीक्षक थोटे यांच्या ताब्यात आहे.

आरोपींनी संगणमत करून बनावट मुद्रांक तयार केले आणि ते तुळजापूरच्या भूमी अभिलेख आणि नगरपरिषद कार्यालयात शासकीय कामांसाठी वापरले. या प्रकरणामुळे शासनाला आर्थिक नुकसान सहन करावे लागले. आरोपींचा यापूर्वी गुन्हेगारी इतिहास नसला तरी त्यांच्यावर गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. या प्रकरणातील सर्व आरोपी अद्याप पोलिसांच्या तपासाअंतर्गत आहेत आणि पुढील कारवाई सुरू आहे.

तुळजापूर पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून त्वरित गुन्हा दाखल केला असून, पोलिस उपनिरीक्षक थोटे तपासाचे नेतृत्व करत आहेत. पोलिसांनी घटनास्थळाची तपासणी केली असून, संबंधित साक्षी-पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. आरोपींनी शासकीय दस्तऐवजांची फसवणूक करण्यासाठी बनावट मुद्रांक कसे तयार केले, याचा तपास केला जात आहे.

## रोख रक्कम व प्रतिबंधित पदार्थाच्या जप्तीच्या कार्यवाहीसाठी समिती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने निवडणूकविषयक कामे सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विविध कक्ष गठीत करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेले फिरते गस्त पथक व स्थिर सर्वेक्षण पथक यांच्याकडून रोख रक्कम, मद्य, मादक पदार्थ व अमली पदार्थ ताब्यात घेण्यात येत आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या बाबीबाबतची तपासणी करून जप्तीची कार्यवाही करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी व तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी समिती गठीत केली आहे.

समितीचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, उपाध्यक्ष जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव तर सचिव म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा वित्त अधिकारी सचिन इगे, जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक चिन्मय दास, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक गणेश बारगजे व पोलीस निरीक्षक अमोल भुजबळ यांचा समावेश करण्यात आला आहे.

## दिग्गजांची निवडणूकीतून माघार; मतदार संघात उत्साह झाला कमी

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.५ नोव्हेंबर -**

तुळजापुर विधानसभा मतदार संघात बंडखोरी करुन उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या दिग्गज उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतल्याने या मतदार संघातील निवडणुकीमधील उत्साह कमी झाला असुन आता या मतदार संघात खरी लढत महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. धीरज पाटील या दोन पाटलांमध्येच होणार आहे. वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ. स्नेहा सोनकाटे यांना धनगर, ओबीसी तसेच वंचितचे मतदान किती मिळते यावर या निवडणुकीत कोण बाजी मारणार याचा फैसला होणार आहे.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीची उमेदवारी ॲड. धीरज पाटील यांना जाहीर झाल्यानंतर नाराज झालेले काँग्रेसचे जेष्ठ नेते व माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश कार्यकारीणी सदस्य अशोक जगदाळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे जीवनराव गोरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करुन कुठल्याही परीस्थितीत आता माघार न घेता निवडणुक लढविणार असल्याचे जाहीर केले होते. त्यामुळे निवडणुक रंगतदार, चुरशीची होणार असल्याचे दिसुन येत होते. मात्र उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दि.४ नोव्हेंबर रोजी काँग्रेससह राष्ट्रवादी काँग्रेसला आपल्या बंडखोरांना समजविण्यात यश आले त्यामुळे मोठा गाजावाजा करुन उमेदवारी अर्ज दाखल केलेले माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे अशोक जगदाळे व जीवनराव गोरे या मातब्बर उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेऊन आपल्या तलवारी म्यान केल्या. निवडणुकीपुर्वीच निवडणुकीतुन माघार घ्यायची होती तर या दिग्गज उमेदवारांनी उमेदवारी अर्ज का दाखल केले असा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे. मधुकरराव चव्हाण, अशोक जगदाळे व जीवनराव गोरे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने या मतदार संघात आता खरी लढत महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील व महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड.धीरज पाटील यांच्यात अतिशय चुरशीची व अटीतटीची होण्याची शक्यता आहे. या मतदार संघात एकुण २३ उमेदवार असले तरी लढतीमध्ये महायुती, महाविकास आघाडीच्या उमेदवारांसह वंचित बहुजन विकास आघाडीच्या डॉ. स्नेहा सोनकाटे, समाजवादी पक्षाचे देवानंद रोचकरी व अपक्ष म्हणुन लढत असलेले आण्णासाहेब दराडे हे आहेत.



वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ. स्नेहा सोनकाटे या धनगर, ओबीसी व वंचितचे मतदान आपल्याकडे किती वळवितात यावर या निवडणुकीमध्ये त्यांचे भवितव्य ठरणार आहे. समाजवादी पक्षाचे उमेदवार देवानंद रोचकरी यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवत निवडणुकीत रंगत आणली आहे.

या मतदार संघाचे विद्यमान आमदार व महायुतीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या साठी ही निवडणुक अतिशय महत्वाची व पुढील काळात त्यांचे राजकीय अस्तितत्व टिकवुन ठेवण्यासाठी अतिशय महत्वाची आहे. कारण कांही महिन्यांपुर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांचा फार मोठ्या मतांच्या फरकाने दारुण पराभव झाला आहे. त्यामुळे आपले राजकीय अस्तीतत्व टिकवुन ठेवण्यासाठी या निवडणुकीत राणाजगजितसिंह पाटील यांना विजयीच व्हावे लागणार आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी ही निवडणुक अतिशय महत्वाची आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. धीरज पाटील यांची ही पहिलीच विधानसभा निवडणुक आहे. त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीत धाराशिव लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार ओम राजेनिंबाळकर यांना तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन तब्बल ५३ हजारांचे मताधिक्या मिळाले होते. हे मताधिक्य टिकवुन ठेवण्याचे आवाहन त्यांच्यासमोर आहे.

त्यामुळे आपला विजय निश्चित आहे या भ्रमात त्यांनी राहु नये कारण लोकसभा निवडणुकीतील राजकीय वातावरण विधानसभा निवडणुकीत राहत नाही हा आजपर्यंतचा इतिहास आहे. वास्तविक पाहता ही निवडणुक महायुती व महाविकास आघाडी या दोघांसाठी अतिशय महत्वाची आहे.

## महिलेस मारहाण

**नळदुर्ग, दि.५ नोव्हेंबर -**

नळदुर्ग येथील इंदिरानगर झोपडपट्टी येथे राहणाऱ्या आनंद सुनिल पवार याने ५२ वर्षीय कल्पना गायकवाड यांना उधारी मागण्याच्या कारणावरून मारहाण केल्याची घटना ३ नोव्हेंबर रोजी घडली.

पवार याने गायकवाड यांना खंडोबा मंदिर रोडवर शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली. आणि जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेची तक्रार गायकवाड यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात दिली असून पवार विरोधा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## वाशीत भाऊबीजेनिमित्त मैदानी कुस्ती स्पर्धा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ नोव्हेंबर -**

वाशी (जि. धाराशिव) येथे दर साल प्रमाणे यावर्षी भाऊबीजेच्या दिवशी रविवारी कुस्तीचे मैदान अत्यंत वातावरणात खेळीमेळीच्या वातावरणात व कुस्ती कोण जिंकेल अशा उत्खंडित संपन्न झाली.

कुस्तीच्या मैदानात १० रुपयांपासून १ हजार ७०० रुपयापर्यंत एकूण तीन लाख रुपयांचे बक्षिसे पैलवानास वाटप करण्यात आले. कुस्ती साठी पैलवान जामखेड, पाटोदा, कुर्डूवाडी, पुणे, सोलापूर, निमगाव येथून आलेली होती. दुपारी दोन वाजल्यापासून ते रात्री आठ वाजेपर्यंत कुस्त्या चालू होत्या. दहा हजारांच्या पाच कुस्त्या लावण्यात आल्या होत्या. त्यातील सुजित भोसले व प्रशांत चंदनकर यांची अटीतटीची कुस्ती झाली. तसेच गणेश काळे व अविनाश गावडे यांची पंधरा हजाराची कुस्ती ही अटीकटीची झाली व शेवटी १७ हजार रुपयाची पंडितराव चेडे आबा यांची कुस्ती संदीप लटके जामखेड व बाळू पैलवान पाटोदा यांच्यामध्ये झाली. त्यामध्ये संदीप लटके हा पैलवान विजेती ठरला

कुस्तीचा आखाडा पार पाडण्यासाठी भारत मोरया, नागनाथ नाईकवाडी, सदाशिवराव जगताप, बळीराम जगताप कुस्तीप्रेमी नागरिकांनी परिश्रम घेतले.

## दिपावली आनंद द्विगुणित करणारा सण : इच्छागिरी महाराज

### मिटकर कुटुंबियांकडून सामूहिक पूजा...

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.५ नोव्हेंबर -**

मिटकर कुटुंबियांच्यावतीने गावात सामूहिक वाहन पूजन उपक्रम हा कौतुकास्पद असून, दिपावलीचा आनंद द्विगुणित करणारा आहे, असे प्रतिपादन सोमवारगिरी मठाचे मुख्य महंत इच्छागिरी महाराज यांनी वागदरी येथे आयोजित कार्यक्रमात केले. पुढे बोलताना इच्छागिरी महिराज म्हणाले की, धर्म आपणास जिवन जगण्याची जिवन पध्दती शिकवतो. धर्म संस्कृती नुसार वाहनास लक्ष्मीची उपमा देण्यात येत. लक्ष्मी पूजनाच्या निमित्ताने गावातील वाहनांची एकत्र पूजन केल्याने एकत्रित सण साजरा केल्याचा आनंद मिळतो.

प्रारंभी शिवाजी महाराज चौकातील मुख्य ध्वजारोहणानंतर गावातील सर्व प्रकारची वाहने वाजत गाजत, फटाक्यांच्या आतिषबाजीत, हलग्याच्या कडकडाटात महादेव मंदिरात एकत्र आणली गेली. राज्य पोलीस प्राधिकरणचे उमाकांत मिटकर व महाराजांच्या हस्ते मंत्रोच्चारात सामूहिक वाहन पूजन झाले. सर्व वाहनचालकांना मानाचा पंचा देण्यात आला.

महादेव मंदिरात झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात उत्कृष्ट सजावट केलेल्या टुव्हिलर, फोर व्हीलर व इतर अवजड वाहनांना प्रत्येकी तीन हजारांची तीन बक्षीस देण्यात आली.टू व्हीलरमध्ये मदन चव्हाण, ट्रॅक्टरमध्ये नेताजी वचणे, अवजड वाहनांमध्ये दिगंबर गायकवाड यांनी क्रमांक पटकावला.कार्यक्रमाची बक्षिसे, उपरणे व इतर खर्चाचे प्रायोजकत्व सरपंच तेजाबाई मिटकर यांनी घेतले होते. या कार्यक्रमासाठी जळकोट येथील प्रयाग मल्टीस्टेटचे चेअरमन सचिन कदम, ब्रम्हानंद कदम, संचालक पार्वती कन्या प्रशाला, प्रमोद सावंत, एच.आर. हेड, एमक्यूअर फार्मास्यूटिकल पुणे, श्रीकृष्ण कदम, सहशिक्षक, दिनकर कलाल, संचालक, ज्ञानदीप क्लासेस, श्रद्धानंद स्वामी, मुख्याध्यापक यांची प्रमुख उपस्थिती होती. यांनीच वाहनांचे परीक्षण केले.

कार्यक्रमाला गावातील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.



## गोजवाडा येथे उज्वल गोजवाडा सन्मान सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.५ नोव्हेंबर -**

वाशी तालुक्यातील गोजवाडा येथे दि.२ नोव्हेंबर रोजी उज्वल गोजवाडा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये शिक्षण, शेती, आणि विविध क्षेत्रात यशस्वी ठरलेल्या गावातील युवकांचा सन्मान सोहळा कार्यक्रम गावकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षक डी.एस. शिंदे, धाराशिव जिल्हा उद्योग केंद्राचे अश्रूबा नागटिळक उपस्थित होते.

ग्रामस्थ आणि पालकांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून मेहनतीच्या कहाण्या सांगत, पालकांवरील त्यांचे ऋण व्यक्त केले. पालकांच्या कष्टांमुळेच आज इथपर्यंत पोहोचू शकलो, असे यावेळी आवर्जून सांगत विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचं श्रेय कुटुंबियांना दिले. तसेच आपल्याला मोठे करणारे गाव ही आपली खरी ओळख आहे; म्हणून आपण सगळ्यांनी मिळून गावासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे यावेळी विद्यार्थ्यांनी बोलताना सांगितले. या सन्मान सोहळा कार्यक्रमात रोहीत यादव टॅक्स असिस्टंट धाराशिव, चंद्रकांत जाधव मुंबई पोलिस, प्रकाश थोरबोले इंडियन रेल्वे, अक्षय थोरबोले असिस्टंट इंजिनिअर, कृषकांत पाटील कॉलेज मुंबई, बालाजी थोरबोले डिस्ट्रिक्ट कोर्ट पुणे, शैलेश कोळी डिस्ट्रिक्ट कोर्ट पुणे, लक्ष्मन थोरबोले पि.एच.डी, राम थोरबोले मॅनेजर बँक ऑफ महाराष्ट्र, श्रीनाथ तोडकर, बाबू थोरबोले, अनमोल थोरबोले, ईश्वरी थोरबोले मद्रास, शुभम थोरबोले मुंबई तसेच कृषी, शिक्षण विविध क्षेत्रात यशस्वी झालेल्या सर्वांना याप्रसंगी सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे तालुक्यात सर्वत्र कौतुक केले जात असून यापुढे दरवर्षी दिवाळीत उज्वल गोजवडा सन्मान सोहळा आयोजित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

सन्मान सोहळा कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष गावच्या सरपंच स्वाती पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मन्मथेश्वर आश्रम देवस्थानची आज किलज ते कपिलधार पायी पदयात्रा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.५ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील किलज येथील बारा ज्योतिर्लिंग अवतार मन्मथेश्वर आश्रम देवस्थानच्यावतीने प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी दि.६ नोव्हेंबर रोजी किलज ते कपिलधार पायी पदयात्रा निघणार आहे. पायी पदयात्रेचे हे २१ वे वर्ष आहे.

श्री.१०८ वसुंधरा रत्न, राष्ट्रसंत प.पू. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व श्री.ष.ब्र. १०८ शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांची पायी दिंडी सोहळा निघणार आहे. या पालखीचे मानकरी शि.भ.प. हरी बेळ्ये हे आहेत. बुधवार दि.६ ते दि.१५ नोव्हेंबरपर्यंत पायी पदयात्रा जाणार आहे. किलज येथील बेळये वस्ती येथून पालखीचे प्रस्थान होणार आहे. काक्रंबा, वडगाव, आळणी फाटा, नाथवाडी, पारडी फाटा, विजोरा, वानगाव फाटा ते कपिलधार या तीर्थक्षेत्रस्थानी पोहोचणार आहे.

## विठ्ठलसाईचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ नोव्हेंबर -**

तालुक्यातील मुरूम येथील श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याचा हंगाम २०२४-२५ साठीचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा पाडव्याच्या मुहूर्तावर कारखान्यात शनिवारी उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी संपदा शरण पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

कारखान्याचे चेअरमन तथा माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाच्या हंगामासाठीची यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.

यावर्षी कारखाना कार्यक्षेत्रात लागण व खोडवा मिळून ६ हजार हेक्टर ऊसाची नोंद झाली आहे. यापासुन जवळपास ४ लाख मेट्रिक टन ऊसाचे उत्पादन होईल असा अंदाज आहे. यासाठी पुरेशा वाहतुक यंत्रणेचे नियोजन करण्यात आले आहे. कारखाना कार्यक्षेत्रातील ऊसाची उपलब्धता व गेटकेन विभागातील उपलब्ध होणाऱ्या ऊस विचारात घेवून कारखान्याच्या संचालक मंडळाने ४ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

कारखान्याच्या गळीत हंगामाच्या मोळी पुजन कार्यक्रम सोमवारी (ता.४) रोजी आयोजित करण्यात आला आहे. या हंगामात कार्यक्षेत्रातील व कारखाना लगतच्या गेटकेन विभागातील ऊसाचे गाळप करून गाळपास आलेल्या ऊसास योग्य भाव देणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन बसवराज पाटील यांनी यावेळी दिली.

यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील, गीता पाटील, श्वेता पाटील, स्मिता पाटील, कारखान्याचे व्हाईस चेअरमन सादीकसाहेब काझी, कारखान्याचे संचालक केशव पवार, माणिक राठोड, शब्बीर जमादार, विठ्ठल बदोले, राजीव हेबळे, दत्तू भालेराव, शिवलींग माळी, ॲड. विरसंगप्पा आळंगे, ॲड. संजय बिराजदार, प्राचार्य डॉ. दिलीप गरूड, संगमेश्वर पत्रिके, कार्यकारी संचालक एम.बी. अथणी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी कारखान्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

## जिल्ह्यात ६६ उमेदवार निवडणूक रिंगणात; तुळजापूरात सर्वाधिक २३ उमेदवार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ नोव्हेंबर -**

येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघात ६६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहे.आज ४ नोव्हेंबर रोजी नामांकन अर्ज मागे घेण्याच्या दिवशी ९८ उमेदवारांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. सर्वाधिक २३ उमेदवार तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहे.

अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या २४०- उमरगा विधानसभा मतदारसंघात १० उमेदवार निवडणूक रिंगणात असून १८ उमेदवारांनी नामांकन अर्ज मागे घेऊन निवडणुकीतून माघार घेतली आहे. निवडणुकीच्या रिंगणात असलेले उमेदवाराचे नाव, पक्ष व चिन्ह पुढीलप्रमाणे. ज्ञानराज चौगुले शिवसेना (शिंदे गट) धनुष्यबाण, प्रवीण स्वामी शिवसेना (उबाठा) मशाल, सुनंदा रसाळ बहुजन समाज पार्टी (हत्ती), राम गायकवाड वंचित बहुजन आघाडी (गॅस सिलेंडर), शिवप्रसाद काजळे, मराठवाडा मुक्ती मोर्चा (ऑटो रिक्षा), सातलिंग स्वामी प्रहार जनशक्ती पार्टी (बॅट), संदीप कटबु, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रोड रोलर), अजयकुमार देडे अपक्ष (ट्रंपेट), उमाजी गायकवाड, अपक्ष (टेबल) व श्रीरंग सरवदे अपक्ष (शिट्टी).

२४१- तुळजापूर विधानसभा मतदारसंघात २८ उमेदवारांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली असून आता २३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे. निवडणुकीच्या रिंगणात असलेले उमेदवार, त्यांचा पक्ष आणि चिन्ह कंसात पुढीलप्रमाणे. कुलदीप धीरज कदम पाटील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (हात), राणाजगजीतसिंह पाटील भारतीय जनता पार्टी (कमळ), अण्णासाहेब दराडे प्रहार जनशक्ती पार्टी बॅट, शब्बीर सल्लाउद्दीन तांबोळी ऑल इंडिया मजलीस ए इन्कीलाब ई मिल्लत (एअर कंडिशनर), धनंजय मुरलीधर तर्कसे पाटील राष्ट्रीय समाज पक्ष (शिट्टी), धीरज पंडित पाटील आदर्श संग्राम पार्टी (लिफाफा), भैयासाहेब नागटिळे आझाद समाज पार्टी (कांशीराम) किटली, देवानंद रोचकरी समाजवादी पार्टी- (सायकल), शरद पवार संभाजी ब्रिगेड पार्टी (टिलर), सचिन शेंडगे जनहित लोकशाही पार्टी (कपाट), डॉ. स्नेहा सोनकाटे वंचित बहुजन आघाडी (गॅस सिलेंडर), अमीर इब्राहिम शेख अपक्ष (दूरध्वनी), अमेर सरदार शेख अपक्ष (संगणक), उज्वला गाटे अपक्ष (बॅटरी टॉर्च), काकासाहेब राठोड अपक्ष (अंगठी), योगेश (टेबल), तात्या पंढरीनाथ रोडे अपक्ष (स्नॅपर), दत्तात्रय कदम अपक्ष (ऑटो रिक्षा), धनाजी हुबे अपक्ष (स्टम्प्स), ॲड. पूजा देडे अपक्ष (हिरा), मन्सूर अहमद मकसूद शेख अपक्ष (जहाज), गणेश रोचकरी अपक्ष (ट्रंपेट), सत्यवान सुरवसे अपक्ष (द्राक्षे).



२४२- उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात ३१ उमेदवारांनी माघार घेतली असून १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे. यामध्ये अजित पिंगळे, शिवसेना (शिंदे गट) धनुष्यबाण, कैलास घाडगे पाटील शिवसेना (उबाठा) मशाल, देवदत्त मोरे महाराष्ट्र नवनिर्माण सेना (रेल्वे इंजिन), लहू खुणे, बहुजन समाज पार्टी (हत्ती), प्रणित डिकले वंचित बहुजन आघाडी (गॅस सिलेंडर), डॉ. रमेश बनसोडे भारतीय जनविकास आघाडी (ऑटो रिक्षा), सिराज उर्फ पापा सय्यद टिपू सुलतान पार्टी (किटली), श्रीहरी माळी राष्ट्रीय समाज पक्ष (शिट्टी), अशोक कसबे अपक्ष (कोट), दत्ता तुपे अपक्ष (सफरचंद), नितीन काळे अपक्ष (भेंडी) व विक्रम काळे अपक्ष (विजेचा खांब).

२४३- परांडा विधानसभा मतदारसंघातून २१ उमेदवारांनी माघार घेतली असून २१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. यामध्ये निवडणूक लढविणारे उमेदवार, पक्ष व चिन्ह पुढीलप्रमाणे आहे. प्रा.डॉ.तानाजी सावंत (शिवसेना शिंदे गट) धनुष्यबाण, महादेव लोखंडे बहुजन समाज पार्टी (हत्ती), राजेंद्र गपाट महाराष्ट्र नवनिर्माण सेना (रेल्वे इंजिन), राहुल मोटे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरद पवार गट (तुतारी वाजवणारा माणूस), आर्यनराजे शिंदे राष्ट्रीय समाज दल (आर) अंगठी, प्रवीण रणबागुल वंचित बहुजन आघाडी (गॅस सिलेंडर), डॉ. राहुल घुले राष्ट्रीय समाज पक्ष (शिट्टी), ॲड. रेवण भोसले समाजवादी पार्टी (सायकल), शाहाजहान पैगंबर शेख, बहुजन महापार्टी (हिरा), अरुण जाधवर,अपक्ष (किटली), असिफ जमादार अपक्ष (गळ्याची टाय), गुरुदास कांबळे अपक्ष (चपला), जमीलखा पठाण अपक्ष (ट्रंपेट), दिनेश मांगले अपक्ष (ऊस शेतकरी), विनयराज देशमुख अपक्ष (ऑटो रिक्षा), नुरजहा सोहेल शेख अपक्ष (प्रेशर कुकर), बंडू पोळ अपक्ष (रोड रोलर), राहुल मोटे अपक्ष (ग्रामोफोन), लक्ष्मीकांत आटूळे अपक्ष (चिमणी), सोमनाथ कदम अपक्ष (डंबेल्स) व संभाजी शिंदे अपक्ष (एअर कंडिशन्स) या उमेदवारांचा समावेश आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ९ रोजी जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ नोव्हेंबर**

भाजपा महायुती उमेदवार तसेच लोकसभा पोटनिवडणूक उमेदवाराच्या प्रचारार्थ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची नांदेड येथे दी.९ नोव्हेंबर रोजी सभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.




लोकसभा पोटनिवडणूक उमेदवार डॉ. संतुक हंबर्डे यांच्या प्रचार कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी खासदार हेमंत पाटील, उमेदवार संतुक हंबर्डे, राष्ट्रवादीचे जीवन घोगरे, प्रवीण साले, चेतन्यबापू देशमुख, संतोष पांडागळे, किशोर देशमुख, बालाजी बच्चेवार यांची उपस्थिती होती.

दी. ९ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. असर्जन परिसरातील मोदी मैदानात ही सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेची तयारी जोमात सुरू आहे. वृद्ध व महिलांसाठी विशेष आसन व्यवस्था तसेच व्हीआयपी पासेसची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर सध्याचे वातावरण पाहता डॉक्टरांची टीम देखील तैनाग करण्यात आली आहे. या सभेला दीड लाख लोक उपस्थित राहतील या अंदाजानुसार आसनाची व्यवस्था करण्यात आली आहे. सभेसाठी सर्व समित्या कामाला लागल्या असल्याची माहिती खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे यांनी दिली. शासनाने राबविलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लोकांना फायदा झाला असून यामुळे मतदारांमध्ये महायुतीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. लाडकी बहीण योजना असेल किंवा मराठा आरक्षण असेल याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत होत असून या सर्व योजनांचा फायदा मतदानाच्या माध्यमातून महायुतीला होईल असा विश्वास खासदार अशोक चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केला.

# लखमापूर येथे श्री शिव महापुराण कथा व तुलशी विवाह कार्यक्रमाचे भव्य आयोजन

## १३ रोजी भव्य कलशयात्रा, शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.०५ नोव्हेंबर**

लखमापूर गावामध्ये प्रथमचः परमपुज्य धर्माचार्यश्रीकृष्णाकुमार पांडेय (शास्त्री) श्रीक्षेत्र काशी (वाराणसी) यांच्या सुमधूर वाणीतून श्री शिव महापुराण कथा व तुलशी विवाह कार्यक्रमाचे दि.०६ ते १२ नौव्हेंबर २०२४ या कालावधीत दरम्यान दु.१ ते ४ वा.पर्यंत स्थानिक उमा महेश्वर आश्रम लखमापूर याठिकाणी भव्य आयोजन करण्यात आले असून, दि.१३ नोव्हेंबर रोजी भव्य कलश यात्रा व श्रीकृष्ण विवाह शोभायात्रा काढण्यात येणार आहे.या कार्यक्रमासाठी प.पु.महंत श्री प्रयागराज गीरी (बापू) महाराज यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या आयोजनाच्यामाध्यमातून दि.०६ रोजी रात्री ८ ते १०. ह.भ.प. पंकजपाल महाराज यांचे किर्तन, दि.०७ रोजी रात्री ८ ते १०. ह.भ.प. रामेश्वर महाराज खोडे इसापुर यांचे किर्तन, दि.०८ रोजी रात्री ८ ते १०. ह.भ.प.नारायणदास पडोळे महाराज राष्ट्रीय किर्तनकार यांचे किर्तन, दि.०९रोजी रात्री ८ ते १०. ह.भ.प. मधुकरराव खोडे महाराज इसापुर यांचे किर्तन दि.१० रोजी रात्री ८ ते १०. ह.भ.प. लक्ष्मणदास काळे महाराज यांचे किर्तन, दि.११ रोजी रात्री ८ ते १०. ह.भ.प.सौ. मिराबाई गंगाधरराव सोनुले व संच यांचा भजनाचा व भारुडाचा कार्यक्रम, दि.१२/११/२०२४ सकाळी १० वा. तुलशी विवाह राहील. तर दि.१३ नोव्हेंबर रोजी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या दरम्यान दररोज श्री शिवकथेनुसार प्रसंगानुरूप वेशभूषेत सुप्रसिध्द भारूडकार व झांकीदर्शक माणिछकराव नेवारे व्दारा झांकी प्रदर्शन आयोजित केले जाणार आहे. या भक्तिमय श्री शिव महापुराण व तुलशी विवाह कार्यक्रमाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक प.पु.शेषभुषण श्री रमेशजी महाराज यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### सर्पमित्र राजेश मुंडकर तर्फे वन्यजीव प्रेमींना मिठाई वाटप

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील आदमपूर येथील तरूण तथा पुणे येथील वन्य,पशुपक्षी सामाजिक संरक्षण संस्थेचे सदस्य सर्पमित्र राजेश मुंडकर यांच्या तर्फे दिवाळी पर्वानिमित्त वन्यजीव रक्षक प्रेमींना दि.०३ नोव्हेंबर रोजी मिठाई वाटप करण्यात आली. आपापसांत मित्र परिवारासह प्रेम द्विगुणीत करण्यासाठी हा छोटासा उपक्रम राबविण्यात आला.नात्यांमध्ये वरचेवर गोडवा निर्माण व्हावा आणि समाजात एक वेगळा संदेश जावा हा हेतू सफल झाला. प्रसंगी सर्पमित्र राजेश मुंडकर,वन्यजीव प्रेमी जाफर आदमपूरकर,सर्पमित्र राजेश वाघमारे,सर्पमित्र सतीश मोरे,सर्पमित्र सुमित नाईक,सर्पमित्र माधव कोळनुरे, प्रथमेश स्वामी व वन्यजीव प्रेमी यावेळी उपस्थित होते.

### दिनेशअप्पा आवडके यांची काँग्रेस पक्षाच्या नांदेड जिल्हासरचिटणीसपदी निवड

**मुक्रमाबाद**-मुखेड येथे माजी आमदार तथा नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोंगरेकर यांच्या मुखेड येथिल जनसंपर्क कार्यालयात मुखेड कंधार विधानसभा मतदार संघाचे, काँग्रेस



पक्षाचे अधिकृत उमेदवार हणमंतराव पाटील बेटमोंगरेकर यांच्या उपस्थितीत मुक्रमाबाद विभागाचे युवा नेते दिनेश अप्पा आवडके यांची नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हा सरचिटणीस पदी निवड करण्यात आली असून हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या हस्ते निवडिचे नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोंगरेकर काँग्रेसचे प्रदेश सचिव श्रावण रपनवाड, काँग्रेस तालुका अध्यक्ष मुखेड राजु पाटील रावनगावकर,जिल्हा प्रवक्ता काँग्रेस दिलीप कोडगिरे, चंद्रशेखर गायकवाड,तालुका उपाध्यक्ष मुखेड संदीप पाटील इटग्याळकर, माधवराव पाटील उंद्रिकर, जयराम पाटील गवते, गणेश अकुलवाड, मारोती मंग्याळे, तुकाराम पाटील सुडके, आकाश पाटील उंद्रिकर, अच्युतराव पाटील बिल्लाळीकर, नीळकंठ पाटील खतगावकर व आदी मान्यवर उपस्थित होते.तर त्यांच्या या निवडीबद्दल चांदसाब कुरेशी, शफी कुरेशी, निखील गोगा, रफी बामणीकर, कैलास आवडके आदिनी अभिनंदन करुन अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

### डॉ.माका राहूल यांच्या वतीने दिवाळीनिमित्त मिठाई वाटप

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील मौजे आदमपूर येथे गेली कित्येक वर्षापासून वैद्यकीय सेवा देणारे डॉ.माका राहूल गुरूबसअप्पा देगलूरकर



यांच्या वतीने परिसरातील विशेष व्यक्तिमत्त्वांना दिवाळीनिमित्त मिठाई वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. येथील डॉ.माका राहूल यांनी आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळून सामाजिक उपक्रम राबवून नेहमी प्रोत्साहन देण्यात अग्रेसर असता.गेल्या कित्येक वर्षांपासून ते कैलास क्लिनिकचा शुभारंभ आदमपूर गावात करून आतापर्यंत त्यांनी हजारो रूग्णांना सेवा दिलेली आहे. विविध प्रसंगी रूग्णांसाठी शिबीर भरवून सुद्धा त्यांनी आपले कार्य तळागाळात पोहोचविले आहेत.त्यांच्या या उपक्रमाचे परिसरातील हितचिंतकांनी स्वागत व अभिनंदन केले आहे.

# धर्माबाद तालुक्यातील रामपूर येथे भाजपच्या प्रचाराकांना लिंगायत समाजाच्या युवकांनी हुसकावल

## नायगाव मतदारसंघात नाराजीचे सूर : जनते मध्ये जोरदार चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. ०५ नोव्हेंबर**

धर्माबाद शहरापासून अवघ्या दोन किमी अंतरावर असलेल्या मौजे रामपूर इथून सकाळी ९:३० च्या सुमारास ८९ नायगाव विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार राजेश पवार यांच्या प्रचारार्थ भाजपचे प्रदेश प्रवक्ता एडवोकेट शिवानंद हैबतपुरे हे आले असता रामपूर गावातील लिंगायत समाज बांधवासह धर्माबाद शहरातील लिंगायत समाज बांधवांनी त्यांना हुसकावून लावले आहेत. लिंगायत समाजातील युवकावर तत्कालीन आमदार राजेश पवार त्यांनी विनाकारण गुन्हे दाखल करून लिंगायत समाजाचा रोष ओढवून घेतला होता, अन्यायाविरुद्ध वाचा फोडण्यासाठी निवडणुकीमध्ये स्वतंत्र उमेदवार उभे केले असून जो आमदार लिंगायत समाज बांधवांवर गुन्हे दाखल करतो त्याची बाजू घेत बसव कथाकार ऍड. शिवानंद हैबतपुरे जे की ना मतदार संघातील आहेत ना ही जिल्ह्यातील आहेत 'मान ना मान मै तेरा मेहमान' अन करा जबरदस्तीचा रामराम'' फेम रामपूर ह्या ठिकाणी आल्याने लिंगायत समाज बांधवांनी त्यांना चांगलेच फटकारून गावाच्या बाहेर हाकलून दिले आहेत. फटकारलेला व्हिडिओ समाज माध्यमावर चांगलाच व्हायरल होत आहे.

लिंगायत समाजाचे कार्यकर्ते म्हणून वावरणारे ऍड. शिवानंद हैबतपुरे यांनी जनाची नाही तर नाही पण किमान मनाची तरी लाज बाळगत या ठिकाणी यायला नको होते पण पैश्याने विकल्या गेलेल्या हैबतपुरे याने येत लिंगायत समाजाच्या युवकांना आव्हान दिल्याने सदर प्रकार घडला आहे.

# शिरीश देशमुख गोरठेकर व शिवराज होटाळकरांचे माघार

## नायगांव विधानसभा मतदारसंघात डॉ.मिनल ताई खतगांवकर आ.राजेश पवार यांच्यात खरी दुरंगी लढत

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. ०५ नोव्हेंबर**

राज्यातील होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत राजकारणातील दिग्गज मंडळींनी नांदेड जिल्ह्यातील ८९ नायगांव विधानसभा मतदार संघामध्ये राजकिय आखाड्या त सारिपाटाचे डाव पेच टाकण्यात व्यस्त असतांनाच शिरिष श्रिनिवास देशमुख गोरठेकर,शिवराज होटाळकर या नाम निर्दिष्ट उमेदवारांनी दि.४ नोव्हेंबर रोजी उमेदवारी माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी. शरद चंद्र पवार गटांचे उमेदवार असलेले शिरीश श्रिनिवास देशमुख गोरठेकर व मनोज जरांगे पाटील(मराठा कार्ड घेऊन)रिंगणात उतरलेले उमेदवार शिवराज पा.होटाळकर यांच्यासह १४ उमेदवारांनी आपली उमेदवारी माघार घेतली आहे.



आता नायगांव विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या आखाड्यात उर्वरित आता १० उमेदवार राहिले आहेत.

नायगांव विधानसभा मतदारसंघातून शिरिष श्रिनिवास देशमुख गोरठेकर व शिवराज पाटील होटाळकरांनी आपले उमेदवारी अर्ज माघार घेतल्याने नायगांव विधानसभा मतदार संघातील समीकरण आता वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. माधव संभाजी विभुते व अखिल भारतीय काँग्रेस आयचे उमेदवार डॉ.मीनल ताई निरंजन खतगांवकर व राजेश पवार यांच्यात असली तरी खरी ही लढत डॉक्टर मीनल ताई निरंजन खतगावकर व आमदार राजेश संभाजी पवार यांच्यातच दूरंगी लढतीचे चित्र आता स्पष्टपणे दिसुन येत आहेत. शिवराज पाटील होटाळकरांच्या नामनिर्दिष्ट उमेदवारांनी उमेदवारी माघार घेतल्यामुळे मावळ्यात अस्वस्थता पसरली आहे. तर दुसरीकडे होटाळकरांच्या भविष्यातील सुवर्ण संधी गेली. मनोज दादा जरांगे मराठा योध्दा समर्थक तथा जि.प.चे मा. शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकरांनी गेल्या काही मागील महिन्यांपासून संवाद यात्रेच्या माध्यमातून नायगांव विधानसभा मतदार संघात निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली होती. मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने आपली उमेदवारी दाखल केली होती.ऐन वेळी वरिष्ठ पातळी वरुन आलेल्या आदेशान्वये त्यांनी उमेदवारी मागे घेतल्यानंतर होटाळकरांनी आपल्या समर्थकासह व मावळ्यांना घेऊन नायगांव येथे सह विचार सभेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी शिक्षण सभापती शिवराज पाटील होटाळकरांना कै. डी बी पाटील व रमेश पाटील होटाळकरांची आठवण झाली अश्रु अनावर झाले.माघारीचा आदेश आला नसता तर मी तुमचा आमदार झालो असतो. आपल्यासाठी अहोरात्र परिश्रम करणारे कार्यकर्ते, मित्रपरिवार बरोबरच आपले ज्येष्ठ बंधू कै. डि. बी.पाटील होटाळकर व रमेश पाटील यांचे स्मरण करून ते त्यांचे मन गहिवरून आले डोळे पाणावलेले होते.

# गुरुवारी नांदेड उत्तर मतदारसंघातील उमेदवारांची प्रथम तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ नोव्हेंबर**

भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने ८६ नांदेड उत्तर मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी गुरुवार ७ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ या कालावधीत कै. डॉ. शंकरराव चव्हाण, नियोजन भवन, कॅबिनेट हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, परिसर नांदेड येथे खर्च निरीक्षकासमोर आयोजित केली आहे. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वत: किंवा त्याच्या, तीच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला, तीला नामनिर्देशित करण्यात आले आहे.

त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे असे ८६ नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी ललितकुमार वऱ्हाडे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# विश्वंभर पवार यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबास केली ३० हजारांची आर्थिक मदत



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ नोव्हेंबर**

संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशाचे पालन करून ८५ भोकर विधानसभा मतदारसंघातील नामनिर्देशन पत्र मागे घेऊन इंजि. विश्वंभर पवार यांनी सायाळ ता. भोकर येथील कामाजी लंगोटे या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना १५ हजार रुपयांची मदत करून या कुटुंबाची दिवाळी साजरी केली.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी इंजि. विश्वंभर पवार यांनी अपंग व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत करण्याची आपली परंपरा सुरूच ठेवली. तसेच मौजे सोनारी ता. भोकर येथील क्षीरसागर कुटुंबातील सदस्याचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याची माहिती मिळताच त्यांनाही इंजि.विश्वंभर पवार यांनी १५,००० रुपये देऊन दिवाळी साजरी केली. इंजि.विश्वंभर पवार हे मागील १५ वर्षांपासून सामाजिक भावनेतून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत करत आहेत. यावेळी आनंद पाटील शिंदीकर, रवी गेन्तेवार, दर्शन पाटील डुरे, माधव पाटील व्यवहारे, विजय पाटील सोळंके, चेतन पाटील सोनारीकर, संजय हेमंत आमदरीकर, सचिन सुंकळेकर नांदेकर, नामदेव जाधव, बंटी पाटील, भानू पाटील, भारत तोडे, धम्मपाल तोडे यांच्यासह सायाल येथील दिलीप साखरे, देवराव पाटील डुरे, राजू राजेवाड, माधव पाटील डुरे, गणेश येलुरे, लक्ष्मण डुरे, योगेश पाटील डुरे, गंगाधर आलेवाड उपस्थित होते. सोनारी येथील ज्येष्ठ नागरिक व सर्व बंधू भगिनी उपस्थित होत्या.

# विवेक देशमुख, विनय गिरडे यांची शिवसेना जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती

## हदगाव,हिमायतनगर, किनवट -माहूर आणि नांदेड दक्षिण कार्यक्षेत्राची जबाबदारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ नोव्हेंबर**

हदगाव -हिमायतनगर विधानसभा मतदारसंघातून शिवसेना जिल्हाप्रमुख बाबुराव कदम कोहळीकर यांना व नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातून जिल्हाप्रमुख आनंदराव बोंढारकर यांना विधानसभेची उमेदवारी मिळाल्यानंतर आता हदगाव-हिमायतनगर , किनवट- माहूर जिल्हाप्रमुख पदी विवेक देशमुख आणि नांदेड दक्षिण , लोहा कंधार शिवसेना जिल्हाप्रमुख पदी विनय गिरडे यांची वंदनीय हिंदूहृयद्यसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांच्या



आदेशानुसार जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या स्वाक्षरीचे पत्र देण्यात आले . दोन्ही नवनियुक्त जिल्हाप्रमुखांना आमदार हेमंत पाटील यांनी नियुक्ती पत्र देऊन शुभेच्छा दिल्या.

वंदनीय हिंदूहृयद्यसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण याचा सक्रियपणे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तसेच शिवसेना पक्ष वाढ संघटन मजबुतीकरणासाठी जिल्हा व तालुका स्तरावर प्रमुख जबाबदाऱ्या दिल्या जातात. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या तत्वानुसार आजवर शिवसेना कार्य करत आहे . आणि पुढेही करणार यात दुमत नाही . यंदाच्या विधानसभा निवडणुकीत हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघातून बाबुराव कदम कोहळीकर यांना उमेदवारी मिळाल्यामुळे आणि नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातून जिल्हाप्रमुख आनंदराव बोंढारकर यांना उमेदवारी मिळाल्यामुळे जिल्हा प्रमुख पदाची जागा रिक्त झाली होती त्यामुळे दोन्ही कार्यक्षेत्रातत विवेक देशमुख व विनय गिरडे यांची नियुक्ती करून पक्षवाढीची जबाबदारी देण्यात आली आहे.यावेळी माजी जिल्हाप्रमुख बाबुराव कदम कोहळीकर ,जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, युवासेना जिल्हाप्रमुख साई विभूते , माजी सरपंच सुदिन बागल,माजी सरपंच अमोल गोडबोले, माजी नगरसेवक संजय इंजवाड ,माजी नगरसेवक सिद्धार्थ गायकवाड, वैजनाथ देशमुख , प्रभू कपाटे ,प्रदिप हणमंते राजू लांडगे नागोराव गिरडे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महायुतीचे उमेदवार आ.भीमराव केराम यांच्या प्रचारार्थ फडणवीस यांची गुरुवारी जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०५ नोव्हेंबर**

भाजप महायुतीचे उमेदवार आ.भीमराव केराम यांच्या निवडणूक प्रचारार्थ राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा गुरुवारी दि. ७ रोजी किनवटच्या हु.गोंडराजे शंकरशहा रघुनाथशहा विचारमंचावर आयोजित करण्यात आली आहे. महायुतीच्यावतीने पुन्हा उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आ.भीमराव केराम यांनी प्रचार कार्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा गुरुवारी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली आहे.या जाहीर सभेस महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह मतदारांनी



उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड किशोर देशमुख, जिल्हा सरचिटणीस संदीप केंद्रे, किनवट मंडळ प्रभारी श्री निवास नेम्मानीवार, विधानसभाप्रमुख बाबूराव केंद्रे, राष्ट्रवादीचे विधानसभाप्रमुख वैजनाथ करपुडे पाटील, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा संध्या राठोड,युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार, भाजप किनवट तालुकाध्यक्ष बालाजी आलेवार, माहूर तालुकाध्यक्ष कांतराव घोडेकर, शिवसेनेचे किनवट तालुकाप्रमुख बालाजी मुरकुटे, माहूर तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक, राष्ट्रवादीचे किनवट तालुकाध्यक्ष संजय सिडाम, माहूरचे तालुकाध्यक्ष अमित राठोड, किनवट माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, भाजपा नेते अनिल तिरमानवार, शहराध्यक्ष संतोष चनमनवार, माहूर शहराध्यक्ष पुरुषोत्तम लांडगे, किनवट भाजप तालुकाध्यक्षा उषा धात्रक, माहूर तालुकाध्यक्षा सुजाता जोगदंड, किनवट शहराध्यक्षा गंगुबाई परेकार, माहूर शहराध्यक्षा निर्मला जोशी, युवा मोर्चाचे किनवटचे तालुकाध्यक्ष अक्षय बेदरे, माहूरचे तालुकाध्यक्ष, विनायक मुसळे, पीआरपीचे विनोद भरणे, आरपीआयचे विवेक ओंकार यांनी केले आहे.

# भिमराव पांचाळे यांच्या मैफिलीने दिवाळी पहाटचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ नोव्हेंबर**

दिवाळी संध्या २०२४ उपक्रमात जगद्विख्यांत गझलगायक, गझलनवाज भीमराव पांचाळे यांची मैफल बंदाघाट येथे संपन्न झाली. गोदावरीचा रम्य काठ, दिवाळीचा झगमगाट असलेला खुला रंगमंच, प्रेक्षकांनी खचाखच भरलेला बंदा घाट, भीमरावांच्या गझलेचे आर्त स्वर आणि निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांचे उत्साहवर्धक निवेदन असा आगळा वेगळा माहोल असलेल्या मैफलीने रसिकांची मने जिंकली. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, नांदेड वाघाळ मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत गझलेचा हा सोहळा नांदेडकरांनी अनुभवला.

मैफलीची सुरुवात अंदाज आरश्याचा वाटे खरा असावा, या इलाही जमादार यांच्या प्रसिध्द गझलेने झाली. माणसांचे विविध स्वभाव व त्याचा स्वतःशी होणारा संवाद या बाबी प्रकर्षाने भीमरावांच्या तलम रेशमी स्वरातून नमूद झाल्या. संगीता जोशी यांनी लिहिलेल्या, जीवनाला दान द्यावे लागते, या गझलेने खऱ्या जीवनातील वेदनेचा निचोड रसिकांसमोर पेश झाला.

नीता भीसे यांची, मी किनारे सरकतांना पाहिले. मी मला आदक्रंदतांना पाहिले ही गझल स्त्री जीवनातील सुख- दुःखाचा धांडोळा घेणारी ठरली. माधुरी चव्हाण जोशी यांच्या करते थोडी स्वप्ने गोळा, स्वप्नांचे वय कायम सोळा सखे जरी तू सती पार्वती हरेक शंकर नसतो भोळा या बागेश्री पांचाळे हिने गायलेल्या गझलेने स्त्रीची कुचंबना व पुरुष जातीचा स्वभाव अधोरेखीत केला. फर्याद आजर यांची जावो शिशेका बदन लेक तर इलाही जमादार यांची एक ओळ मराठी व एक ओळ उर्दू



असलेल्या ए सनम आँखोको मेरी खुबसुरत साज दे, येवूनी स्वप्नात माझ्या एकदा आवाज दे, अशी व्दिभाषीक गझल भिमरावांनी सादर केली. स्वर्गीय सुरेश भट यांच्या आसवांचे जरी हसे झाले, हे तुला पाहीजे तसे झाले पाहिले दुःख मी तुझे जेव्हा दुःख माझे लहानसे झाले' ही गझल बागेश्रीने सादर केली. रोशनीचे कायदे पाळायचे या खावर यांच्या गझलेने अख्या मानवी जीवनाचा आलेख मांडला. या सुरेख गझल मैफीलीचा समारोप ए.के.शेख यांच्या गरीबाच्या लग्नाला नवरी गोरी काय काळी काय, महागाईने पिचलेल्यांना होळी काय दिवाळी काय या सर्वसामान्य माणसाची व्यथा मांडणारी गझल भीमरावांनी सादर केली. या गझलेला रसिकांची प्रचंड दाद मिळाली. या मैफीलीचे खुमासदार निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी आपल्या खास शैलीतून विविध किस्से सांगत केले. तर त्यांना निवेदनात सुरेख साथ महाराष्ट्रातील ख्यातकीर्त गझलकार तथा अभिनेते किशोर बळी यांनी दिली. या मैफीलीत खास परभणीहुन आलेले उबाळे, सुरज कदम, निळकंठ पाचंगे, ख्यातकिर्त गायक अनिकेत सराफ यांची विशेष उपस्थिती होती. या मैफलीत साथ संगतीत तबला साथ डॉ. देवेंद्र यादव, हार्मोनियम साथ सुधाकर अंबुसकर, गिटार साथ संदीप कपूर, बासरीवादनाची साथ प्रशांत अग्निहोत्री यांनी केली.

मैफिलीच्या यशस्वीततेसाठी नांदेड वाघाळा शहर मनपाचे अपर आयुक्त गिरीष कदम, गुरुव्दारा बोर्ड व्यवस्थापक आर. डी. सिंग, नागरी संस्कृती समितीचे कार्याध्यक्ष बापू दासरी, डॉ. नंदकुमार मुलमुले, वसंत मैय्या, अँड. गजानन पिंपरखेडे, विजय बंडेवार, विजय होकर्णे, प्रा.सुनील नेरलकर, देविदास फुलारी उमाकांत जोशी, हर्षद शहा, लक्ष्मण संगेवार, पत्रकार विजय जोशी, पत्रकार चारुदत्त चौधरी, ज्येष्ठ पत्रकार शंतनू डोईफोडे, मकरंद दिवाकर आदींनीं परिश्रम घेतले.

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## लातूर ग्रामीण मतदारसंघामध्ये तिरंगी लढत

**तभ वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ५ नोव्हेंबर-**

लातूर ग्रामीण मतदार संघामध्ये विद्यमान आमदार धीरज देशमुख आणि विधान परिषदेचे भाजपाचे आमदार रमेश कराड यांच्यामध्ये प्रमुख लढत होत असली तरीही उमेदवारी अर्ज निवडणूक रिंगणामध्ये असलेल्या १८ उमेदवारापैकी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संतोष नागरगोजे यांच्या उमेदवारी अर्ज असल्याने ही निवडणूक तिरंगी होत असल्याचे दिसून येत आहे.

या निवडणुकीमध्ये १८ उमेदवारांची उमेदवारी कायम राहिली आहे यामध्ये २३४- लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ धिरज विलासराव देशमुख- इंडियन नॅशनल काँग्रेस (हात),रमेश काशीराम कराड- भारतीय जनता पार्टी (कमळ), संतोष गणपतराव नागरगोजे- महाराष्ट्र नवनिर्माण सेना (रेल्वे इंजिन),डॉ. नितीन वाघे- संपूर्ण भारत क्रांती पार्टी (ट्रम्पेट), बालकिशन शंकर आडसूळ- राष्ट्रीय समाज पक्ष (शिट्टी), डॉ. अजनीकर विजय रघुनाथराव - वंचित बहुजन आघाडी (गॅस सिलेंडर), समाधान बळीराम गोरे- पिपल्स पार्टी ऑफ इंडिया-डेमॉक्रॅटिक (संगणक), समाधान भारत शिंदे- महाराष्ट्र स्वराज्य पार्टी (पेनाची निब सात किरणासह). अमन ईश्वर सुरवसे- अपक्ष (एअर कंडिशनर). गडगळे राजकुमार मारोती- अपक्ष )कपाट). झेटे सचिन विठ्ठल- अपक्ष (ऊस शेतकरी). बावणे डॉ. दत्ता - अपक्ष (टीलर). दिपक राजाभाऊ इंगळे- अपक्ष (खाट). नंदकिशोर शंकरराव साळुंके- अपक्ष (स्पॅनर). पंकज रावसाहेब देशमुख- अपक्ष (ऑटो रिक्शा). बालाजी रामराव मोरे- अपक्ष (टेबल). लक्ष्मीकांत माणिकराव जोगदंड- अपक्ष (गॅस शेगडी). सुमीत्रा ऊर्फ स्वाती विक्रम जाधव पाटील- अपक्ष (बॅट)



## संक्षिप्त वृत्त



### वलांडी येथे पोलीस प्रशासनाच्यावतीने पथसंचलन

**वलांडी, दि. ५ नाव्हेंबर-**

तालुक्यातील येथे वलांडी येथे उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा उपविभाग नितीन कटेकर तसेच देवणी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डोके, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप गोंड पोलीस उपनिरीक्षक नारायण डप्पडवाड पोलीस उपनिरीक्षक पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती रूट मार्चचे आयोजन करण्यात आले होते. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सूव्यवसथा अबाधित ठेवण्यासाठी हा रूट मार्च काढण्यात आला होता. हा रूट मार्च छ. शिवाजी महाराज चौक ते आंबेडकर चौक होत हणुमान मंदीर ते छ. शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आले. वलांडी येथे रूट मार्चमध्ये पोलीस स्टेशनचे ४ अधिकारी व १२ आमलदार तसेच बीएसएफचे तीन अधिकारी व ४५ जवान यांनी सहभाग घेतला होता.



### हलगरा येथे अल्पसंख्यांक समाजातील युवकांचा भाजपात प्रवेश

**निलंगा, दि. ५ नोव्हेंबर-**

तालुक्यातील हलगरा येथील अल्पसंख्यांक समाजातील असंख्य युवकांनी माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आ. निलंगेकर यांच्या नेतृत्वात निलंगा विधानसभा मतदारसंघाचा विकास होत आहे. मागील काळात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली असून याचा लाभ समाजातील प्रत्येक घटकाला मिळत आहे. त्यामुळे मतदारसंघातील नागरिकांचा भाजपाकडे ओढा आहे. जातीपातींच्या पलीकडे जाते आ. निलंगेकर यांना सर्व स्तरातून पाठिंबा मिळत आहे. विधानसभेच्या प्रचारासाठी आ. संभाजीराव पाटील हलगरा येथे आले असता गावातील अल्पसंख्यांक समाजाच्या असंख्य युवकांनी भाजपात प्रवेश घेतला. भाजपात प्रवेश घेणाऱ्यांमध्ये जलील इसाक शेख,शेख अहेमद महेताब, विशाल रमेश जाधव, इमाम फकीर मुक्ता, मिरझा अहेमद बंग, सलाउद्दीन सौदागर, अली येरोळे, फयाज सलीम अत्तार,हुसेन गौस खुरेशी,अस्लम फारुख पीरजादे,अल्ताफ बाबुमियां पटेल, विलास रफत अंबेवाले, अलावोद्दीन नजीर अंबेवाले,बालाजी मोतीराम मंत्री, रियाज अयुबसाब चिकले,फकीर अहेमद पीरजादे, सलाओद्दीन जब्बारसाब अंबेवाले यांचा समावेश आहे.आ.संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या नेतृत्वात काम करत मतदारसंघ आणि तीनही तालुक्यांचा विकास करून घेण्यासाठी आम्ही भाजपात प्रवेश करत असल्याचे या मंडळींनी सांगितले.आ.निलंगेकर यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत करत त्यांचा योग्य सन्मान करण्याची ग्वाही दिली. प्रवेश घेणाऱ्यापैकी जलील इसाक शेख यांना युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष तर सलाउद्दीन जब्बरसाब आंबेवाले यांना युवा मोर्चाचे निलंगा तालुका सरचिटणीस म्हणून नियुक्ती देण्यात आली. यावेळी शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, प्रशांत मसलगे, मंगेश बिराजदार, प्रकाश बेंडले, महेश मसलगे, सिद्धेश्वर बिराजदार यांच्यासह तालुक्यातील महायुतीचे असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

### संघाव्वा मोहोळकर यांचे निधन

**निलंगा, दि. ५ नोव्हेंबर-**



शहरातील जेष्ठ नागरिक संघाव्वा मारुती मोहोळकर यांचे शनिवार दि २ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ११० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मोहोळकर चौक,कुंभार मळा, उदगीर मोड निलंगा येथील शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्या सामाजिक कार्यकर्ते गोविंद मोहोळकर यांच्या आई तर सामाजिक कार्यकर्ते महेश मोहोळकर, माधव मोहोळकर यांच्या आजी होत.

### जिजाबाई सूर्यवंशी यांचे निधन

**निलंगा, दि. ५ नोव्हेंबर-**



तालुक्यातील माकणी थोर येथील ज्येष्ठ नागरिक जिजाबाई पांडुरंग सूर्यवंशी यांचे रविवारी रात्री ११. ३० वा. सुमारास अल्पशा आजाराने वयाच्या ८२ या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार दिनांक ४ नोव्हेंबर रोजी माकणी थोर येथे नंदनवन स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मयत जिजाबाई या माकणी थोर गावचे उपसरपंच पत्रकार तुकाराम सूर्यवंशी यांच्या मातोश्री होत.

# पाच वर्षांतील ५० कामे सांगतो, तुम्ही १० वर्षांतले एकतरी सांगा

### आ. अभिमन्यू पवार यांचे खुले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ५ नोव्हेंबर-**

विकासाच्या मुद्यावर आपण खुली चर्चा करायला आपण कधीही तयार आहोत. केवळ विरोध म्हणून विरोधी पक्षाच्या उमेदवारास खऱ्या अर्थाने मत मागण्याचा अधिकार आहे का? असा सवाल उपस्थित केला. कधीकाळी दहा वर्ष आमदार राहिलेल्यांनी औशाच्या जनतेला काय दिले हे सर्वांना माहिती आहे.त्यांनी दहा वर्षांत केलेले एकतरी काम सांगावे मी पाच वर्षांत केलेले पन्नास कामे सांगतो, असे खुले आवाहन आमदार अभिमन्यू पवार यांनी दिले.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ कार्ला, कुमठा, पारधेवाडी, सिरसल, येळवट आदी गावातील मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते.सभापती चंद्रशेखर सोनवणे, गणेश कोळपाक, शिवाजी जाधव, धनराज काजळे, रामनारायण जकोटिया, बालाजी निकम, बाबासाहेब पाटील, वामन क्षीरसागर, महेश जाधव, बलभिम कुलकर्णी, विश्वास काळे,



भागवत जगताप, अशोक जगताप, हाणमंत रेड्डी, ब्रम्हानंद रेड्डी, जगदीश शिंदे, ओम घोडके, हाणमंत जाधव, विशाल कवे, गणेश कानडे,बंकट पाटील, नामदेव लोमटे, बाबुराव बिराजदार, सिताराम जाधव, राहुल लोमटे उपस्थित होते.मान्यवरांच्या उपस्थितीत विश्वास मारुती साखरे, माजी सरपंच शिवाजी निवृती पवार, नवनाथ लक्ष्मण शिंदे, ज्ञानेश्वार येळनुरे यांनी भाजपात प्रवेश केला,

आ.अभिमन्यू पवार म्हणाले,भाजपच्या काळात पोखरा योजने अंतर्गत शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून राज्यात चांगले काम सुरू होते. जलयुक्त शिवार योजनेतून सिंचनक्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात कामे मार्गी लागत होती. तर मुख्यमंत्री सहायता निधीतून गरजू लोकांना मदत होत असताना राज्यात आलेल्या उध्दव ठाकरे सरकारने या सर्व जनहिताच्या योजना चक्क बंद केल्या आहेत. एवढ्यावरच न थांबता महायुतीच्या सरकारने नव्याने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजना, १ रुपयात पीकविमा योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज आदी योजनाही महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर बंद पाडण्याचा डाव रचला असून या विधानसभेच्या निवडणुकीत अशा लोकांना मतदारांनी धडा शिकवावा. असे आवाहन आमदार पवार यांनी केले आहे.

आ. अभिमन्यू पवार पुढे म्हणाले, या पाच वर्षांत मतदारसंघातील प्रत्येक गावात विकासकामे पूर्ण होत असून सिंचन क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने तावरजा प्रकल्पावर बॅरेजेस उभारले जात आहेत. औसा, लामजना व कासारसिरसी येथे नूतन बसस्थानक उभारले आहेत. कासारसिरसी व किल्लारी येथे नव्याने अपर तहसील कार्यालयास मंजुरी, औसा येथे उप जिल्हा रुग्णालयास मंजूरी, औसा येथे सुविधायुक्त विश्रामगृह व गावोगावी शेतरस्ते आदी कामे होत असताना विरोधी पक्षाच्या उमेदवारांनी मागील दहा वर्ष आमदार म्हणून काम करताना औशाच्या जनतेसाठी काय काम केले आहे.मतदारसंघातील जनतेसाठी विधीमंडळात कधी आवाज उठवला आहे का ? हे मतदारांनी त्यांना विचारले पाहिजे. असे यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

## लातूर शहर विधानसभा मतदारसंघात तिरंगी लढत

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ५ नोव्हेंबर-**

लातूर शहर विधानसभा मतदारसंघांमध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी २३ उमेदवाराचे अर्ज कायम राहिल्यामुळे या मतदारसंघांमध्ये आघाडी आणि युतीसह वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार प्रमुख लढतीत असल्यामुळे ही निवडणूक तिरंगी होत आहे. चार नोव्हेंबर ही उमेदवारी परत घेण्याची अखेरची तारीख असल्यामुळे आज उमेदवार परती नंतर २३५- लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून अमित विलासराव देशमुख- इंडियन नॅशनल काँग्रेस (हात) डॉ. अर्चना पाटील चाकुरकर- भारतीय जनता पार्टी (कमळ) सिध्दार्थ महादेव सुर्यवंशी- बहुजन समाज पार्टी (हत्ती)अनिल गोरोबा गायकवाड- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया-ए (रोड रोलर). गौसोदिन उस्मान शेख- स्वराज्य सेना पार्टी (हिरा) घोणे नरसिंह पांडुरंग- निर्भय महाराष्ट्र पार्टी (सीसीटीव्ही कॅमेरा) पंकज जैस्वाल- पिपल्स पार्टी ऑफ इंडिया-डेमॅक्रेटीक (संगणक) भास्कर दत्तात्रय बंडेवार- बहुजन भारत पार्टी (ट्रम्पेट). रावसाहेब सिद्राम करपे- राष्ट्रीय समाज पक्ष (शिट्टी). विनोद सोमप्रकाश खटके- वंचित बहुजन आघाडी (गॅस सिलेंडर) सतीश राजेंद्र करंडे- महाराष्ट्र स्वराज्य पार्टी (पेनाची निब सात किरणांसह). संतोष संभाजी साबदे- जय हिंद जय भारत राष्ट्रीय पार्टी (रबर स्टॅम्प). अखतरमिया जलाल शेख- अपक्ष (पाटी). आनंद अंकुश लामतुरे- अपक्ष (काडेपेटी). आश्विन सुभाषराव नलबले- अपक्ष (ऑटो रिक्शा) ईलाही बशिरसाब शेख- अपक्ष (बॅट)नौशाद इकबाल शेख- अपक्ष (कपाट) प्रविण माणिकराव माने- अपक्ष (लिफाफा) प्रसाद सिद्राम कोळी- अपक्ष (नागरीक) बाबासाहेब गोरोबा सितापूरे- अपक्ष (अंगठी) मंगेश नागनाथ ईळेकर- अपक्ष (हेल्मेट) राजीव ऊर्फ राजकुमार दामोधरराव पाटील- अपक्ष (दूरदर्शन). लक्ष्मीकांत माणिकराव जोगदंड- अपक्ष (चालण्याची काठी)

## औसा विधानसभेच्या आखाड्यात १९ उमेदवार

### चिन्हाचे वाटप; प्रचाराच्या रणधुमाळीस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ५ नोव्हेंबर-**

औसा विधानसभेच्या रिंगणात दाखल करण्यात आलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्राच्या छाननीत ३६ उमेदवारांचे ४५ अर्ज वैध ठरले. यामुळे नेमके किती उमेदवार आखाड्यात राहतील याचा अंदाज लावला जात होता. मात्र १७ उमेदवारांनी माघार घेतल्याने १९ उमेदवार औसा विधानसभेच्या निवडणुकीच्या आखाड्यात उभा आहेत. या उमेदवारांना चिन्हाचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार घनश्याम अडसुळ यांनी दिली आहे.

या निवडणुकीत प्रा. डॉ. अनिल सुग्रीव कांबळे-बहुजन समाज पार्टी (हत्ती),अभिमन्यू दत्तात्रय पवार-भारतीय जनता पार्टी (कमळ),दिनकर बाबूराव माने- शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे (मशाल), नागराळे शिवकुमार गंगाधर महाराष्ट्र नवनिर्माण सेना (रेल्वे इंजीन),अनिल शिवाजी जाधव जनहित लोकशाही पार्टी (किटली),आकाश



आ. अभिमन्यू पवार



दिनकर माने

महादेव पुजारी न्यू राष्ट्रीय समाज पार्टी (ट्रम्पेट),

ज्योतिराम गुलाब शिंदे- निर्भय महाराष्ट्र पार्टी (सीसीटीव्ही कॅमेरा),

नौशाद इकबाल शेख स्वराज्य शक्ती सेना (हिरा),श्याम चंद्रकांत गोरे- राष्ट्रीय समाज पक्ष ऊस शेतकरी,भाई शिवाजी बाबूराव सुरवसे- पीझन्टस् अण्ड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया (ऑटो रिक्शा),उत्तम सदाशिव घोडके- अपक्ष (रोड रोलर),दगडू वसंत माने- अपक्ष (नागरिक),नरसिंग दिलीप जाधव- अपक्ष (चिमणी),



नागनाथ ग्यानु मुगळे अपक्ष (शिट्टी),नितीन उत्तरेश्वर पवार- अपक्ष (शिवण यंत्र),मनोहर आनंदराव पाटील- अपक्ष (बॅटरी टॉर्च), राजेंद्र पंडू मोरे- अपक्ष (बॅट),शिवाजी केराप्पा कुंभार- अपक्ष (गॅस सिलेंडर),हणमंत व्यंकट कारले अपक्ष (पेनाची निब सात किरणांसह)उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभा आहेत. यामुळे निवडणूक चुरशीची होणार असल्याचा अंदाज बांधला जात आहे.

## संत गणेशनाथ महाराज संजीवन समाधी सोहळा

### उजनीत १५ दिवसीय उत्सव; विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ५ नोव्हेंबर-**

दिपावली पाडव्या शुभ मुहूर्तावर श्री संत गणेशनाथ महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा व यात्रा महोत्सवास सुरुवात झाली असून यावर्षी सालाबादप्रमाणे कीर्तन, शास्त्रीय संगीत गायन वादनाचा कार्यक्रम, जंगी कुस्त्या,हरिजागर अशा अनेक कार्यक्रमाचे आयोजन यावर्षी करण्यात आले आहे.



यावर्षी शनिवार दि. २ रोजी हभप तुकाराम शहाजी काटे महाराज यांच्या कीर्तनाने या उत्सवाची सुरुवात करण्यात आली आहे. याचबरोबर रविवार दि.३ रोजी मोहन महाराज भोंग, सोमवार दि.४ रोजी श्रीगुरू प्रा. बाळासाहेब महाराज देहुकर, मंगळवार दि. ५ रोजी मंगेश महाराज देहूकर, बुधवार दि.६ रोजी राजकुमार महाराज सपकाळ, गुरुवार दि. ७ रोजी कुमार पाटील महाराज गांजनखेडा, शुक्रवार दि,८ रोजी श्रीगुरू कान्होबा महाराज देहुकर, शनिवार दि. ९ रोजी हरिहर महाराज दिवेगावकर,रविवार दि.१०रोजी गणेश महाराज आळंदी, सोमवार दि.११ रोजी एकनाथ महाराज नाशिक, मंगळवार दि.१२ रोजी उत्तम महाराज आळंदी, बुधवार दि.१३ रोजी गणेश महाराज भगत पुणे,गुरुवार दि.१४ सुधाकर महाराज इंगळे सोलापूर,शुक्रवार दि..१५ रोजी शिवनाथ महाराज उजनी यांचे कीर्तन होणार आहेत.

गुरुवार दि. १४ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास नगरप्रदिक्षणा , सोंगव पहाटेच्या सुमारास तेरणेच्या काठावर जवळपास दोन तास शोभेची दारू उडविण्यात येणार आहे. शनिवार दि. १६ रोजी सकाळी ९ वा. नाथ मंदिरात भारुडाचा कार्यक्रम होणार आहे.यानंतर दुपारी पालखी प्रदिक्षणा व २ वा. तेरणेच्या वाळवंटात जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच मंगळवार दि. १२ रोजी सायंकाळी ९ वा. नाथ मंदिर सभागृहात पं. बाळासाहेब वाईकर, तुकाराम गोसावी, जगन्नाथ वाडेकर पंढरपूर यांचे गायन होणार आहे. पांडुरंग मुकडे, व्यंकट ढवण, राजगोपाल गोसावी तबल्याची साथ देणार आहेत.

**शास्त्रीय संगीत गायन, वादनाचे आयोजन**

यावर्षी शुक्रवार दि. १५ रोजी सायंकाळी ९ वा.पं. शौनक अभिषेकी पुणे यांचे शास्त्रीय गायन होणार असून पं. उदय कुलकर्णी, हार्मोनियमची साथ देणार आहेत, तर पांडुरंग मुकडे, व्यंकट ढवन व राजगोपाल गोसावी तबल्याची साथ देणार आहेत. रविंद्र खरे, सहकार निवडणुक आयुक्त डा. जगदीश पाटील, माजी कुलगुरु डा. अशोक ढवण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**जंगी कुस्त्यांचे मानकरी**

यावर्षी यात्रा समितीच्यावतीने शनिवार दि.१६ रोजी जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले असून सहकार निवडणुक आयुक्त डा. जगदीश पाटील, गणेशनाथ सेवा मंडळाचे अध्यक्ष धनराज पाटील, ओम पाटील जंगी कुस्त्यांचे मानकरी राहणार आहेत, अशी माहिती मंदिर समितीच्यावतीने देण्यात आली आहे.

# भूमिपुत्रांचा गावकऱ्याकडून झालेला सन्मान लाखमोलाचा

### न्यायाधीश सुनील भोसले; सद्भावना प्रतिष्ठानतर्फे भूमिपुत्रांचा गुणगौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ५ नोव्हेंबर-**

आपल्याच गावातील लोकांकडून आपला सत्कार होणे हे लाखमोलाचे आहे. यातून केवळ सत्कारमूर्तीलाच प्रेरणा मिळत नसून गावातील अनेक विद्यार्थी पालक यांना ही प्रेरणा देणारा हा उपक्रम आहे, असे मत नेवासा येथील न्यायाधीश सुनील भोसले यांनी व्यक्त केले.

उदगीर तालुक्यातील एकुर्का रोड येथील सद्भावना प्रतिष्ठानतर्फे रविवारी भूमिपुत्रांचा गुणगौरव सोहळा घेण्यात आला. यावेळी न्यायाधीश सुनील भोसले बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच चंद्रकला ज्ञानोबा कांबळे या उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुणे उमरगाचे डॉ. उदय मोरे, लातूर येथील राजमुद्रा कॅडमीचे संचालक महेश मोरे, आदर्श गाव जकेकुरवाडीचे सरपंच अमर सूर्यवंशी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. दयानंद माने आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर गावातील यूपीएससी, एमपीएससी, डॉक्टर, सेट नेट उत्तीर्ण झालेल्या भूमिपुत्रांचा त्यांच्या पालकांसह सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. दयानंद माने यांनी केले. सुत्रसंचालन रसूल पठाण यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा. रविकिरण कांबळे यांनी मानले.



**या भूमिपुत्रांचा झाला सन्मान**

व्यंकटेश गंगाधर शेवाळे (बी. टेक यूपीएससी, आयएफएस), विकास शिवराज जाधव (एम. एस.सी. एमपीएससी एस.टी.आय.), रोहन देविदास जाधव( बी. ई. मेकॅनिक आरसीएफ), डॉ. व्यंकट प्रल्हादराव पाटील (एम. ई. पीएचडी), डॉ. दयानंद रामराव माने( एम. ए. इंग्लिश पीएचडी), डॉ. शांतीसागर किशनराव बिरादार एम. ई. पीएचडी), डॉ. विद्यासागर किशनराव बिरादार( एम.एस. सी. ॲग्री, पीएचडी), डॉ. तानाजी कामाजी उदगीरकर एम. ए. पीएचडी), डॉ. मनीषा प्रकाश भारती (एम. ई. पीएचडी), डॉ. बालाजी मधुकर एकुर्केकर( एम. ए. अर्थशास्त्र, पीएचडी), डॉ. राजेश दत्तात्रय भारती (एम. टेक. पीएचडी), संजय हनुमंतराव ऐलवाड ( एम. ए. एम. जे. साहित्यिक), डॉ. हर्षवर्धन विजय पाटील( एम. डी. मेडिशिन), डॉ. रजनी तातेराव कांबळे( बीएमएस पीजी कॉस्मो.), डॉ. नमिता तातेराव कांबळे (एम.डी.), डॉ. जयदीप सुरेश जाधव( एमडी पर्सुइंग), एमबीबीएस चे शिक्षण घेत असलेले ऋषभ संजय जाधव, शोएब मौलासाब पठाण,अखिब मौलासाब पठाण, डॉ. शुभम किशन शेवाळे, श्रीशैलेश किशन शेवाळे, कुणाल सुरेश भारती, कोमल शिवाजी काकडे (बीएमएस), विशाखा गंगाधर शेवाळे-भानवसे (एमएससी मायक्रोटेके, नेट-सेट जीआरएफ, शास्त्रज्ञ), अंजुम रसूल पठाण एमएससी रसायनशास्त्र, सेट), समर्थ विद्यालय (मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान जिल्ह्यात तृतीय), शितल उत्तम जाधव (१२ वी विज्ञा शाखेत प्रथम), रेणुका हनुमंत गादीमोड १२ वी कला शाखेत प्रथम), सरस्वती निळकंठ शेवाळे( १० वी वर्गात प्रथम).